पुणे, सोमवार, १६ सप्टेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 278 • वर्ष ३ रे, अंक २७८ • किंमत ₹ ६ • पाने : १२


# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS





## At a Glance

### पुण्यातून शरद पवार गटाचे ४१ उत्सुक



**पुणे :** विधानसभा निवडणूक शरद पवार यांच्या पक्षाकडून निवडणूक लढवण्याचा मानस पुण्यातील ८ मतदारसंघातील एकूण ४१ उमेदवारांनी व्यक्त केला आहे. या उमेदवारांच्या मुलाखतीचे वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. » पान ७ वर

### प्रवाशांना मनस्ताप

**मुंबई :** मुंबईतील इंडिगो एअरलाईन्सबाबत सातत्याने नवनवीन अपडेट्स समोर येत असतात. अशातच आज इंडिगो विमानतळावर हवाई प्रवाशांचा मोठा खोळंबा झाल्याची माहिती मिळत आहे. मुंबइहून दोहा-कतारला जाणारे इंडिगोचे विमान तब्बल ६ तासानंतर रद्द करण्यात आले. त्यामुळे या विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी इंडिगोबाबत » पान ७ वर

### कोलकाता येथे अचानक स्फोट

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या कोलकाता येथील तलतल्ला परिसरात आज, शनिवारी दुपारी एसएन बॅनर्जी रोडवर रस्त्याच्या कडेला ठेवलेल्या स्टीलच्या टिफिनचा अचानक स्फोट होऊन एक जण गंभीर जखमी झाला. बापी दास असे जखमीचे नाव असून त्याच्या हाताला स्फोटात गंभीर इजा झाली आहे. त्याला तात्काळ » पान ७ वर

### निपाहमुळेच त्या तरुणाचा मृत्यू

**नवी दिल्ली:** केरळमधील मलप्पुरममध्ये २४ वर्षीय तरुणाचा उपचार सुरु असताना मृत्यू झाला होता. त्याला निपाह विषाणूची लागण झाली होती, अशी माहिती केरळच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी दिली.

आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज म्हणाल्या, मलप्पुरम » पान ७ वर

## नितीन गडकरी यांचा दावा, वर्तुळात विविध प्रतिक्रिया

# पंतप्रधानपद हे ध्येय नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पंतप्रधानपद हे माझ्या आयुष्यातील ध्येय नाही. मी माझ्या तत्वांशी आणि पक्षसंघटनेशी एकनिष्ठ आहे. मी पंतप्रधानपदासाठी या तत्त्वांशी आणि पक्षाशी प्रतारणा करणार नाही, असा गौप्यस्फोट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर येथे बोलताना केला होता. आपल्याला विरोधी पक्षातील एका नेत्याने पंतप्रधानपदाची ऑफर दिल्याचे त्यांनी सांगितले होते. यावर आता राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया येत आहेत.

नितीन गडकरी म्हणाले की, काही दिवसांपूर्वी एक घटना अचानक घडली. मी या घटनेमधील नेत्याचे नाव सांगत नाही. पण त्याने मला सांगितले होते की, तुम्ही पंतप्रधान होणार असाल, तर आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ. पण त्यावर मी त्यांना विचारले की, तुम्ही मला पंतप्रधानपदासाठी का पाठिंबा देणार आहात आणि मी तो पाठिंबा का घ्यावा? मी संबंधित नेत्याला स्पष्टपणे सांगितले की, पंतप्रधानपद हे माझ्या आयुष्यातील ध्येय नाही. भारतीय लोकशाहीचा आधार असलेली ही मूल्ये आहेत, असे वक्तव्य नितीन गडकरी यांनी केले. ही चर्चा नेमकी कुणाशी झाली? तसेच कधी झाली? याचे तपशील त्यांनी दिले नाहीत. मात्र त्यांचे हे वक्तव्य आता चर्चेत आले आहे.


विशेष म्हणजे २०१४ मध्ये आणि २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी पंतप्रधानपदाच्या संभाव्य उमेदवारांच्या चर्चेत नितीन गडकरी यांचेही नाव होते. नागपूरमधून तीन वेळा खासदार म्हणून निवडून आल्यानंतर गडकरी हे भाजपमधील आघाडीच्या नेत्यांपैकी एक आहेत. गडकरी यांनी २०२४ ची लोकसभा निवडणूक नागपुरातून जिंकली आहे.



“मी यासंदर्भात ऐकले नाही. नितीन गडकरी यांच्यासारख्या नेत्याची देशाला गरज आहे. ते जर प्रधानमंत्री झाले तर आम्हाला आनंद होईलच. एक मराठी माणूस एवढ्या मोठ्या पदावर बसेल. नितीन गडकरी यांचे कर्तृत्व सुद्धा खूप मोठे आहे आणि ते गलिच्छ राजकारण करत नाहीत. सत्तेसाठी त्यांनी कधी आपली भूमिका बदलली नाही ही त्यांची खासियत आहे. त्यांचे खूप मोठे मन आहे. विकासात ते कधीच राजकारण करत नाहीत.
— सुप्रिया सुळे, खासदार



“आज सकाळी संजय राजाराम राऊतने नितीन गडकरी यांच्या संदर्भात मुक्तफळं उधळली आहेत. पण ज्याच्या रक्तातच गद्दारी आहे, दलाली आहे त्या माणसाला नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, आनंद दिघे आणि भाजपा पक्षाचे निष्ठवान कार्यकर्ता हा कधीच कळणार नाही. त्यामुळे त्याने त्याच्या थोबाड्यातून त्यांचे नाव घेऊ नये.
— नितेश राणे, आमदार



“नितीन गडकरी हे भाजपतले एक सर्वमान्य असे नेते आहेत. पंतप्रधानपदासाठी तडजोड करा, असे त्यांना कुणी सांगितले असेल, असे मला वाटत नाही. या देशात हुकूमशाही, एकाधिकारशाही सुरु आहे, आणीबाणी लावण्याचा प्रयत्न सुरु आहे त्याच्याशी तडजोड करु नका, अशी भूमिका विरोधी पक्षातल्या नेत्याने त्यांच्याकडे मांडली असेल तर त्यात काही चुकीचे नाही.
— संजय राऊत, प्रवक्ता उबाठा

### एक देश एक निवडणूक लागू होणारच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली:** भाजपप्रणीत रालोआ सरकार आपल्या कार्यकाळातच 'एक देश, एक निवडणूक' फॉर्म्युला लागू करू शकते. या सुधारणेला सर्व पक्षांचा पाठिंबा मिळेल, असा विश्वास रालोआला असल्याचे सूत्रांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाला १०० दिवस पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ही माहिती समोर आली आहे. सत्ताधारी आघाडीतील एकजूट उर्वरित कार्यकाळापर्यंत कायम राहणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. त्याची अंमलबजावणी या कार्यकाळात नक्कीच होईल. ही चर्चा वास्तववादी ठरणार आहे, असेही त्याने स्पष्ट केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या महिन्यात स्वातंत्र्यदिनी » पान ७ वर

# हेच का मविआचे हिंदुत्व भाजपचा ठाकरेंना सवाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** कर्नाटकातील पोलिस व्हॅनमध्ये ठेवण्यात आलेल्या गणेशमुर्तीचे छायाचित्र चांगलेच व्हायरल झाले असून, यावरून आता भाजपने महाविकास आघाडीला आणि विशेषत: उद्धव ठाकरेंना धारेवर धरले आहे. हेच का मविआचे वेगळे हिंदुत्व? असा सवाल भाजपकडून ठाकरेंना करण्यात आला आहे.

मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनीसुद्धा पोस्ट करत उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. ते म्हणाले की, कर्नाटकात काँग्रेसने मत्सरासुर या राक्षसाचा अवतार धारण केला असून, थेट गणपती बाप्पालाच या काँग्रेसी असूराने अटक केली आहे. हिंदू धर्म, राम, साधू तसेच देव देवतांचा अवमान करणाऱ्या काँग्रेसला जनता चांगलाच धडा शिकवेल. मत्सरासुर राक्षस कितीही माजला तरी त्याचा वध नक्की होतो. महाराष्ट्रात याच काँग्रेसने उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वात सार्वजनिक गणेशोत्सवावर बंदी आणली होती. पण खुर्चीसाठी फितूर झालेले आणि काँग्रेसच्या हिंदू विरोधी कळपात सामिल झालेल्या उबाठा सेनेला जनाची नाही, तर किमान मनाची तरी लाज वाटतेय का? आता उबाठा सेना तातडीने रस्त्यावर उतरून जुतेमारो आंदोलन करणार का? असा सवाल त्यांनी ठाकरेंना केला आहे. तसेच भाजप आमदार प्रविण दरेकर यांनीसुद्धा या घटनेवर निषेध व्यक्त केला आहे.

### प्रेशर मोड नको...



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणेश विसर्जन मिरवणुकीत पुणे शहर पोलिसांनी शहरातील मंडळांना प्रेशर मोड टाळण्याचे आवाहन केले आहे. या मोडमुळे कर्णकर्कश आवाज होतो त्याशिवाय तो त्रासदायक ठरतो. त्यामुळेच प्रेशर मोड वाजवू नका, असे पोलिसांनी म्हटले आहे.

गणेश मंडळे आणि डीजे यांनी सर्वोच्च न्यायालय आणि राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने घालून दिलेल्या ध्वनिप्रदूषण नियमांचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पोलिस उपायुक्तांनी म्हटले आहे. यात नमूद केले आहे की, प्रेशरमोड मोठा आवाज निर्माण करतो, ज्याचा आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. अन्यथा डीजे जागेवरच जप्त करण्यात येणार आहेत.

# पुणे रेल्वेस्थानकात अत्याधुनिक सुरक्षा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे रेल्वे विभागाच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) इंदू राणी दुबे यांच्या म्हणण्यानुसार, पुणे रेल्वे स्थानकाची सुरक्षा पुढील तीन ते चार महिन्यांत सुधारण्यात येणार आहे. दुबे यांनी आगामी योजनांची तपशीलवार माहिती दिली, ज्यात प्रगत फेशियल रेकग्निशन कॅमेरे बसवणे तसेच प्रवाशांची सुरक्षा वाढवण्यासाठी आणि बेकायदेशीरपणे विकल्या जाणाऱ्या तिकिटांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये वाढ यांचा समावेश आहे.

सध्या, पुणे रेल्वे स्थानकावर ५६ कार्यरत सीसीटीव्ही कॅमेरे असून, अलीकडेच अतिरिक्त १६ बसवण्यात आले आहेत.




दुबे यांनी त्यांच्या सुरक्षा योजनेचा एक भाग म्हणून रिअल-टाइम मॉनिटरिंग हायलाइट केले असून, सर्व कॅमेऱ्यांचे फुटेज थेट कार्यालयात उपलब्ध होत आहे. त्यामुळे स्टेशनच्या प्रमुख भागांवर सतत लक्ष ठेवणे शक्य होते.

» सुरक्षा

रेल्वे विभागाने चेहरे ओळखण्याचे स्वतःचे तंत्रज्ञान पुणे रेल्वे स्थानकावर बसवण्याचे निश्चित केले आहे. त्याचा वापर केला जाणार आहे. या प्रकल्पाचा करार झाला » पान ७ वर

# मायक्रोसॉफ्टची आणखी ४५३ कोटींची जमीन खरेदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मायक्रोसॉफ्ट या दिग्गज कंपनीने, हिंजवडी येथे जमीन विकत घेतल्याच्या काही आठवड्यांतच, त्याच परिसरात आणखी १६.४ एकर जमीन ४५३ कोटी रुपयांना खरेदी केली आहे. अमेरिकेचे मुख्यालय असलेल्या कंपनीच्या भारतातील उपस्थितीला बळ मिळाले आहे.

या महिन्याच्या सुरुवातीला ६६,४५० चौरस मीटरच्या भूखंडासाठी २७.१८ कोटी मुद्रांक शुल्क भरून नवीनतम व्यवहार झाला आणि तो नाशिकस्थित विवा हायवेज लिमिटेडकडून खरेदी करण्यात आला. नाशिक येथील कंपनीचे संचालक राजेंद्र चिंदुलाल बुरड, महेंद्र भोपालसिंग मेहता आणि अनुप सुभाषचंद्र कटारिया आहेत.




ऑगस्टमध्ये, कंपनीने हिंजवडीतील सुमारे १६.४ एकर जमीन ५२० कोटींमध्ये खरेदी केली होती, ज्याची नोंदणी ६ सप्टेंबर रोजी पूर्ण झाली. २०२२ मध्ये, टेक जायंटने पिंपरी-चिंचवडमध्ये २५ एकर ३२८ कोटींना खरेदी केली होती.

पुणे, मुंबई आणि चेन्नई येथे स्थापन केलेल्या प्रमुख सुविधांसह, डेटा सेंटर ऑपरेशन्स बळकट करण्याच्या कंपनीच्या व्यापक धोरणाचा हे अधिग्रहण भाग असल्याचे दिसून येते. या जमिनीच्या विकासानंतर रोजगाराच्या संधी देखील वाढू शकतात.

### विक्रोळीनजीक अपघात, ६ जखमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पूर्व द्रुतगती महामार्गावरील विक्रोळी नजीक गोदरेज कंपनीच्या परिसरात आज (रविवार) सकाळच्या वेळेत कारचा भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये सहाजण गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या सर्व जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातग्रस्त इनोव्हा गाडी भरधाव वेगात असल्यामुळे हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे.

प्रचंड वेगात असलेल्या या इनोव्हा गाडीच्या चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि कार काही अंतरापर्यंत फरफटत जाऊन सर्व्हिस रोडलगतच्या दुभाजकावर आदळली. ही गाडी दुभाजकाला धडकल्यानंतर तेथील स्ट्रीट लाईटचा खांबही खाली कोसळला.

## ३४५ किलोंचा मोदक

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**अर्पण:** ३४५ किलोंचा मोदक दीपक केटरर्सचे दीपक शहा यांच्याकडून श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती बाप्पा चरणी अर्पण करण्यात आला. यावेळी विश्वस्त पुनीत बालन, तसेच केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित होते.

### सात पिस्तूल, १४ काडतुसे जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पिंपरी-चिंचवड पोलिसांनी मध्य प्रदेशातील अवैध शस्त्र पुरवठादारासह पाच जणांना अटक केली आहे. पोलिसांनी आरोपींकडून सात पिस्तूल, १४ जिवंत काडतुसे आणि दोन मॅगझिन जप्त केली.

गुन्हे शाखेला मिळालेल्या माहितीच्या आधारे सहायक निरीक्षक अभिनय पवार, उपनिरीक्षक भरत गोसावी यांच्या पथकाने सापळा रचून १२ सप्टेंबर रोजी तिघांना अटक केली. आरोपी प्रदीप ऊर्फ अक्षय बाळासाहेब ढगे (वय २८), सुरज अशोक शिवले (वय २४, रा. आपटी, ता. शिरूर) आणि नवल वीरसिंग झामरे (वय २३, रा. बुऱ्हाणपूर, मध्य प्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध आळंदी पोलिस ठाण्यात भारतीय शस्त्रास्त्र कायद्यानुसार » पान ७ वर


## एकत्रित अंतिम मसुदा २२ तारखेला देणार: हर्षवर्धन यांची माहिती

# साखर नियंत्रण आदेशात दुरुस्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्र सरकारने प्रस्तावित केलेल्या साखर (नियंत्रण) आदेश २०२४ मध्ये सुमारे १५ दुरुस्त्या असून, याबाबत साखर उद्योगाकडून २४ सप्टेंबरपर्यंत सूचना, हरकती मागविण्यात आल्या आहेत. देशातील सहकारी व खासगी साखर कारखान्यांच्या मागण्यांचा एकत्रित अंतिम मसुदा चार दिवसांत तयार करून तो २२ सप्टेंबरला केंद्राला राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या वतीने देण्यात येणार असल्याची माहिती महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी दिली.





या कायद्यामध्ये साखर कारखान्यांना २० टक्के ज्यूट पॅकिंगच्या केलेल्या सक्तीसारख्या बदलास साखर उद्योगाचा विरोध आहे. तर काही बदलांवर एकमत, काहींवर मतभिन्नता, संमिश्रता आणि सकारात्मकता असल्याचेही त्यांनी सांगितले.

या वेळी महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे यांच्यासह महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे उपाध्यक्ष प्रतापराव ओहोळ, संचालक कल्याणराव काळे आदी उपस्थित होते. महासंघाच्या पुढाकाराने पुण्यात शनिवारी या विषयावर व्यापक चर्चा झाली.

त्यामध्ये महासंघासह, राज्य सहकारी साखर कारखाना संघ, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन (डीएसटीए), वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन पुणे, इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (इस्मा), सात राज्यस्तरीय साखर असोसिएशनचे » पान ७ वर

#रा

### राहुल गांधी हेच दहशतवादी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते रवनीत सिंह बिट्टू यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना दहशतवादी म्हटले आहे. राहुल यांच्यावर टीका करताना बिट्टू म्हणाले की, राहुल गांधी यांनी शीखांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केला आहे. शीख कोणत्याही पक्षाशी संबंधित नाहीत आणि हे पेटवण्याचा हा प्रयत्न आहे. राहुल गांधी हे देशातील नंबर वन दहशतवादी आहेत. जे लोक नेहमी मारण्याच्या गप्पा मारतात, जहाजे आणि रेल्वे उडवून देण्याची भाषा करतात, ते राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ पुढे आले आहेत. अशा परिस्थितीत » पान ७ वर

# स्वारगेट ते कात्रज मेट्रोचे विस्तारीकरण

पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन




- अनंत चतुर्दशीच्या दिवशी मेट्रो प्रवासी सेवा १७ सप्टेंबर सकाळी ६ ते १८ सप्टेंबर सकाळी ६ अशी सुरू असणार आहे.
- १८ सप्टेंबर सकाळी ६ वाजेपासून प्रवासी सेवा सुरळीत म्हणजे सकाळी ६ ते रात्री १० अशी सुरू असेल. म्हणजे १७ सप्टेंबर सकाळी ६ ते १८ सप्टेंबर रात्री १० अशी पुणे मेट्रोची प्रवासी सेवा अखंड सुरू असणार आहे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवाजीनगर ते स्वारगेट भूमिगत मार्गाचे मेट्रोचे काम पूर्ण झाले असून, स्वारगेट ते कात्रज या भुयारी मार्गाच्या विस्तारीकरणाला मंजुरी मिळाली आहे. भूमिगत मेट्रो मार्ग आणि नव्या विस्तारीकरणाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २७ सप्टेंबर रोजी होणार आहे. तसेच सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या मैदानावर पंतप्रधान मोदी यांची सभा होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

» पान ७ वर

## ४८ तास : अवजड वाहनांना बंदी

# शहरातील १७ प्रमुख रस्ते राहणार बंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** गणेश विसर्जन मिरवणूकीच्या पार्श्वभूमीवर सोमवारी मध्यरात्रीनंतर शहरात अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. विसर्जन मिरवणुकीचा समारोप झाल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात येईल. विसर्जन मिरवणुकीचा प्रारंभ मंगळवारी (१७ सप्टेंबर) सकाळी साडेदहाच्या सुमारास होणार आहे. मिरवणूक सुरू होण्यापूर्वी मध्यभागातील लक्ष्मी रस्ता, छत्रपती शिवाजी रस्ता, टिळक रस्ता, शास्त्री रस्ता, केळकर रस्ता, बाजीराव रस्ता, कुमठेकर रस्ता गणेश रस्ता, जंगली महाराज रस्ता, कर्वे रस्ता, फर्ग्युसन रस्ता, भांडारकर रस्ता, पुणे-सातारा रस्ता, सोलापूर रस्ता, प्रभात रस्ता, बगाडे रस्ता गुरू नानक या रस्त्यांवरील वाहतूक विसर्जन मिरवणुकीची सांगता होईपर्यंत बंद राहणार आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिली.

जंगली महाराज रस्त्यावरील झाशीची राणी चौक, छत्रपती शिवाजी रस्त्यावरील काकासाहेब गाडगीळ पुतळा, मुदलीयार रस्त्यावरील दारूवाला पुल, लक्ष्मी रस्त्यावरील संत कबीर पोलीस चौकी, सोलापूर रस्त्यावरील सेव्हन लव्हज चौक, सातारा रस्त्यावरील व्होल्गा चौक, बाजीराव रस्त्यावरील वीर सावरकर पुतळा चौक, लाल बहादुर शास्त्री रोडवरील सेनादत्त पोलीस चौकी, कर्वे रस्त्यावरील नळस्टॉप, फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावरील गोखले स्मारक चौकातून वाहतूक वळविण्यात (डायव्हर्शन पॉईंट) येणार आहे.

विसर्जन मिरवणुकीसाठी यंदाही वाहनचालकांसाठी वर्तुळाकार मार्ग सुरु ठेवण्यात येणार आहे. कर्वे रस्ता- नळस्टॉप चौक- विधी महाविद्यालय रस्ता- सेनापती बापट रस्ता- गणेशखिंड रस्ता- वेधशाळा चौक- संचेती रुग्णालय- अभियांत्रिकी महाविद्यालय चौक, मंगळवार पेठेतील शाहीर अमर शेख चौक- मालधक्का चौक- बोल्हाई चौक-नरपतगिरी चौक-नेहरु रस्ता-संत कबीर चौक-सेव्हन लव्हज चौक- मार्केट यार्ड वखार महामंडळ चौक- शिवनेरी रस्ता- सातारा रस्ता- व्होल्गा चौक (लक्ष्मीनारायण चौक)- मित्रमंडळ चौक- सिंहगड रस्ता-शास्त्री रस्ता- सेनादत्त पोलीस चौकी- म्हात्रे पूल-नळस्टॉप चौक असा वर्तुळाकार मार्ग राहणार आहे.

### शहरात ४८ तास अवजड वाहनांना बंदी...

● गणेश विसर्जन मिरवणूकीच्या पार्श्वभूमीवर सोमवारी मध्यरात्रीनंतर शहरात अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. विसर्जन मिरवणुकीचा समारोप झाल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात येईल.

### या मार्गावर 'नो' पार्किंग ...

● लक्ष्मी रस्ता, केळकर रस्ता, कुमठेकर रस्ता, बाजीराव रस्ता, टिळक रस्ता, छत्रपती शिवाजी रस्ता, शास्त्री रस्ता, जंगली महाराज रस्ता, कर्वे रस्ता, फर्ग्युसन रस्त्यावर वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. खंडोजीबाबा चौक ते वैशाली हॉटेल चौक दरम्यानच्या उपरस्त्यांवर वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे.




Selected

## ऑक्सिजन पार्क पुन्हा बहरणार



**पुणे :** पुण्याला ज्या काही मोजक्या शुद्ध आणि निर्भीड ऑक्सिजन पुरवठा करणाऱ्या जागा शिल्लक आहेत त्यातील एक म्हणजे तळजाई टेकडी. या टेकडीवर ऑक्सिजन पार्क उभारण्यात आला आहे परंतु वेळोवेळी अक्षय पारखे निघा राखणे नवीन वृक्षांची लागवड करणे अशी कामे अनेक समाज उपयोगी आणि वृक्षप्रेमी संस्था करीत असतात आज गुलमोहर वर्ल्ड फाउंडेशनच्या वतीने येथे नव्या वृक्षांची लागवड करण्यात आली ऑक्सिजन देणाऱ्या अनेक झाडांची लागवड करत गणेशोत्सवाचा एक आगळा वेगळा उपक्रम येथे साजरा करण्यात आला. पुणे महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते, ऑक्सिजन मॅन म्हणून ज्यांना ओळखले जाते असे ज्येष्ठ नेते मा.सुभाषराव जगताप पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक मा. अविनाश बागवे यांच्या प्रमुख उपस्थित पाहुणे म्हणुन उपस्थित होते

कार्यक्रमाचे आयोजन फांऊडेशनचे अध्यक्ष अनिल हातागळे व उपाध्यक्षा सौ.जयश्री हातागळे यांनी केले होते. कार्यक्रमास पुणे शहर जिल्हा मातंग समाजाचे सचिव सनी डाडर, माजी सचिव निलेश वाघमारे, संजय केंदळे, उद्योजक हनुमंतराव कांबळे, सत्यशोधक बहुजन आघाडीचे प्रवक्ते शाम चंदनशिव, सामाजिक कार्यकर्ते दादा पाटोळे, बापू शिंदे, लहुजी समता परिषदेचे कार्याध्यक्ष अर्जुन लोखंडे, उपाध्यक्ष विलास पाटोळे, अंकुश हातागळे, आदि मान्यवर उपस्थित होते.

पुणे शहरात एकीकडे सिमेंटचे जंगल मोठ्या प्रमाणात उभे रहात आहे व यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे अशावेळी आपल्या भावी पिढीसाठी समाजातील सर्व घटकांनी वृक्षारोपण करून वसुंधरेचे रक्षण केले पाहिजे असे मत माजी नगरसेवक अविनाश बागवे यांनी व्यक्त करून फांऊडेशनच्या कार्याची स्तुत केली

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## पुढील शनिवार - रविवार 'पुरुषोत्तम'ची अंतिम फेरी

**पारितोषिक वितरण शनिवार, दि. 28 सप्टेंबर रोजी**

**पुणे :** महाराष्ट्रीय कलोपासक आयोजित पुरुषोत्तम करंडक स्पर्धेची अंतिम फेरी शनिवार, दि. २१ व रविवार, दि. २२ सप्टेंबर रोजी भरत नाट्य मंदिर येथे आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे जनक राजाभाऊ नातू यांचे यंदाचे जन्मशताब्दी वर्ष असून स्पर्धेचे ५९ वे वर्ष आहे.

**शनिवारी सादर होणाऱ्या एकांकिका :**


**वेळ : सायंकाळी ५ ते ८**
- सखा (आय. एम. सी. सी.)
- तेंडुलकर्स (म. ए. सो.चे सिनिअर कॉलेज)
- ११,१११ (फर्ग्युसन महाविद्याल)

**रविवारी सादर होणाऱ्या एकांकिका :**

**वेळ : सकाळी ९ ते ११**
- पार्टनर (स. प. महाविद्यालय, पुणे)
- तृष्णाचक्र (डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर)
- पाटी (विद्या प्रतिष्ठान कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, बारामती)

**वेळ : सायंकाळी ५ ते ८**
- देखावा (न्यू आर्टस् कॉमर्स ॲन्डसायन्स महाविद्यालय, अहमदनगर)
- बस नं. १५३२ (गरवारे वाणिज्य महाविद्यालय)
- बिजागरी (बी. व्ही. जी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी)

पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवार, दि. २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता भरत नाट्य मंदिर येथे आयोजित करण्यात आला असून पारितोषिक वितरण ज्येष्ठ नाटककार चं. प्र. देशपांडे यांच्या हस्ते होणार आहे.




## बक्षीसाची घोषणा

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**सन्मान :** पॅरिसमध्ये नुकत्याच पार पडलेल्या पॅरा ऑलिंपिक स्पर्धेत गोळा फेकमध्ये भारताला सिल्वर मेडल मिळवून देणाऱ्या सचिन खिलारीला युवा उद्योजक व श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीचे उत्सव प्रमुख पुनीत बालन यांच्या 'पुनीत बालन ग्रुप'कडून पाच लाखांचे बक्षिस जाहीर करण्यात आले आहे. तर याच स्पर्धेत या मोसमातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या संदीप सरगरला दोन लाखांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

## मिसेस पुणे फेस्टिव्हल स्पर्धेत मुटकुरे आणि पानसरे मानकरी



**पुणे :** ३६ व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये संपन्न झालेल्या मिसेस पुणे फेस्टिव्हल स्पर्धेत २३ ते ४० वर्षे वयोगटात श्रेया मुटकुरे व ४१ ते ५५ वर्षे वयोगटात माधवी पानसरे या प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरल्या. २३ ते ४० वर्षे वयोगटात तृप्ती राठोड आणि श्रद्धा सावेकर आणि ४१ ते ५५ वर्षे वयोगटात शजादी सय्यद आणि गीतांजली थोरात यांनी त्यांच्या गटात अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेचे उद्घाटन लायन्स कोथरूडचे अभय शास्त्री, संयोजिका ॲड. अमृता जगधने, मोहन टिल्लू यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले. पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, अभिनेते कबीर सिंग व मोहन टिल्लू यांनी विजेत्या महिलांना मुगुट प्रदान केले. अमृता कदम आणि दक्षा जाखडी या बेस्ट पर्सनॅलिटीच्या मानकरी ठरल्या. रवि बाला काकतकर, मिडास टच इन्स्टिट्यूटच्या डॉ. अंजली जोशी आणि अभिनेते कबीर सिंग यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. मिसेस पुणे फेस्टिव्हल ही विवाहित महिलांची सौंदर्य, व्यक्तिमत्व व बुद्धिमत्ता स्पर्धा बालगंधर्व रंगमंदिर येथे शनिवारी पार पडली. याप्रसंगी सहसमन्वयक अर्चना सोनावणे, मिस पुणे फेस्टिव्हलच्या संयोजिका सुप्रिया ताम्हाणे, नृत्य स्पर्धेच्या संयोजिका संयोगिता कुदळे, अतुल गोंजारी आणि श्रीकांत कांबळे हे उपस्थित होते.

### जे. एस . पी .एम. आणि टी. एस. एस. एम. नऱ्हे संकुलात इंडक्शन प्रोग्राम

# वसंत हंकारे यांचे प्रेरणादायक व्याख्यान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जे. एस . पी .एम. आणि टी. एस. एस. एम. नऱ्हे संकुलामध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या अभियांत्रिकी पदवी व पदविका तसेच आर्टस्, कॉमर्स व सायन्स च्या विद्यार्थ्यांचा इंडक्शन प्रोग्राम शनिवारी आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील प्रसिद्ध प्रेरणादायक वक्ते वसंत हंकारे लाभले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संकुल संचालक डॉ. शशिकांत थिटे यांनी संस्थेच्या वाटचालीबद्दल माहिती सांगितली व येत्या काळामध्ये संस्थेने हाती घेतलेल्या विद्यार्थी केंद्रित उपक्रमाविषयी माहिती सांगितली. तसेच सर्व विद्यार्थी व पालकांचे स्वागत करून विद्यार्थ्यांच्या भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे संस्थापक डॉ. तानाजी सावंत, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी विध्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी संस्था कटिबद्ध आहे असे सांगितले व शुभेच्छा दिल्या.

> "आपले आई-बाप म्हणजे आपल्या आयुष्याचे प्राथमिक शिक्षक. त्यांनी आपल्यासाठी कित्येक संकटे सहन केली स्वतःच्या स्वप्नांचा त्याग करून आपल्याला चांगली जीवनशैली दिली. त्यांची मेहनत आणि त्याग यांची जाणीव ठेवणे आणि त्यांच्या कष्टाचे योग्य मूल्यांकन करणे हे आपले कर्तव्य आहे."
> — वसंत हंकारे प्रेरणादायक वक्ते




### सदाशिव पेठेतील संयुक्त मित्र मंडळाचा उपक्रम

## पाच हजार सॅनिटरी पॅडचे वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** सदाशिव पेठेतील नागनाथ पार येथील संयुक्त मित्र मंडळाने या वर्षी महिलांच्या 'पाळी' या संवेदनशील विषयाला जीवंत देखाव्याच्या माध्यमातून वाचा फोडली असून, याचे निमित्त साधून महिला, मुलींना सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात येत आहे.

पाच हजार सॅनिटरी पॅडचे वाटप करून स्वच्छतेविषयी जनजागृती केली जात आहे. देखाव्याची संकल्पना, लेखन, नेपथ्य व दिग्दर्शन मंडळाचे सल्लागार पियूष शहा यांचे आहे. डॉ. पूनम शाह प्रमुख पाहुण्या म्हणुन म्हणुन उपस्थित होत्या.

मुलींना तरुणींना आणि महिलांना खूप सोप्या भाषेत आपण पाळी दरम्यान स्वच्छता कशी राखावी, काय काळजी घ्यावी, पाळी पुढे जाण्याकरिता गोळ्या घेऊ नये आणि मुळात पाळी म्हणजे कलंक पाप बिलकुल नाही.

देखाव्याच्या माध्यमातून खूप सोप्या भाषेत उत्तम सादरीकरण केले आहे. तसेच पाच हजार सॅनिटरी पॅडचे वाटप करत महिलांचा योग्य सन्मान करत आहेत. खऱ्या अर्थाने शाह आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांना तिच्या संवेदना समजल्या हे याचे उदाहरण आहे. या प्रसंगी कल्याणी सराफ, स्वाती ओतारी, प्रज्ञा केळकर, गंधाली शाह, डॉ. श्रीकांत गबाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

संयुक्त मित्र मंडळाचे अध्यक्ष निलेश पायगुडे, कार्याध्यक्ष हृषीकेश रिसबूड, जंयत बनकर, राजेश मारणे, आदित्य मारणे, चैतन्य मारणे आणि मंडळाचे सभासद व कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार पीयुष शाह यांनी मानले.

**पुणे :** दरवर्षी प्रमाणे गौरी गणपती सण घरोघरी उत्सहात साजरा झाला. धनकवडी येथील जोजारे परिवार दरवर्षी आकर्षक देखावे बनवत असतात. यावर्षी त्यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, चंद्रभागा नदी, भक्त पुंडलिक मंदिर, असा सुंदर पंढरपूर वारी देखावा साकारला आहे. हा देखावा तयारी साठी त्यांच्या घरातील सर्वांनी मेहनत घेतली, अशी माहिती अमर जोजारे यांनी दिली.



## गणेश विसर्जनाच्या दिवशी बसथांब्याचे तात्पुरते स्थलांतर

**पुणे :** गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीमुळे स्वारगेट चौक, डेक्कन चौक वाहतुकीसाठी बंद ठेवले जातात. यामुळे स्वारगेट व डेक्कन चौकातील बस थांबे तात्पुरते स्थलांतरीत केले जाणार आहेत. पीएमपीएमएलकडून गणेश विसर्जनाच्या दिवशी मंगळवारी



बसेसच्या सेवेत बदल केला आहे. स्वारगेट आणि डेक्कन या बसथांब्याचे या दिवशी तात्पुरते पर्यायी जागेत स्थलांतर केले जाईल. शाहू महाराज स्थानक (स्वारगेट) येथील बसेस या सातारा रस्त्याने कात्रज, मार्केट यार्डकरीता लक्ष्मी नारायण चौक येथून सुटतील. नटराज बसस्थानक येथून सिंहगड रोडकडे जाण्याकरिता पर्वती पायथा (स्वामी समर्थ मठ) येथून बसेस सोडल्या जातील. स्वारगेट स्थानकाबाहेर सोलापूर रस्त्याने पुलगेट, हडपसर करिता जाणाऱ्या बस वेगा सेंटर (स्वारगेट डेपो जवळ) येथून सोडल्या जातील. स्वारगेट स्थानकाबाहेर भवानी पेठ, नानापेठ, रास्तापेठ करिता जाणाऱ्या बस वेगा सेंटर (स्वारगेट डेपो जवळ) येथून सोडल्या जाणार आहेत. डेक्कन जिमखाना स्थानक, कोथरूड डेपो, माळवाडी, एनडीए गेटकडे जाणाऱ्या बस एसएनडीटी कॉलेज जवळून सोडल्या जातील.

## मिस पुणे फेस्टिव्हल स्पर्धेचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ३६व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये आज सोमवार दि. १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ ते रात्रौ ९ या वेळेत श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे मिस पुणे फेस्टिव्हल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून प्रख्यात गायिका व बँकर अमृता फडणवीस या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेतील विजयी युवतींना त्यांच्या हस्ते मुगुट परिधान करण्यात येणार आहे तसेच त्यांच्या हस्ते त्यांचा सत्कारही करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे, असे पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांनी कळवले आहे.

### तत्वज्ञ, शास्त्रज्ञ भूपेंद्र यांचे ऊर्जादायी मार्गदर्शन

# 'मेटा अवेकनिंग' मधून आत्मिक संजीवनीची अनुभूती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "जीवन एक नृत्यकला, उत्सव आहे. त्यामुळे आयुष्यातील चढ-उतारांतून मार्ग काढता आले पाहिजेत. आपल्यामधील क्षमता ओळखून सकारात्मक, तणाव-मुक्त जीवन जगण्याची कला अवगत करावी. चेहऱ्यावरील हास्य, मनातील समाधान आणि आत्मिक सुखाची अनुभूती घेत आनंदी जीवन जगावे," असा अनुभव जागतिक ख्यातीचे तत्वज्ञ-शास्त्रज्ञ, लेखक व अध्यात्मिक ऊर्जेचे प्रभावक भूपेंद्र यांनी दिला. आत्मबोध व दोन विचारांतील, दोन श्वासांतील शांतता आपल्याला यामध्ये वाहक म्हणून उपयुक्त ठरतात, असे त्यांनी नमूद केले.



वैज्ञानिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक याचा त्रिवेणी संगम असलेल्या 'मेटा अवेकनिंग' या कार्यक्रमातून पुणेकरांना आत्मिक संजीवनीची अनुभूती मिळाली. तत्वज्ञ-शास्त्रज्ञ श्री भूपेंद्र यांच्या ऊर्जादायी मार्गदर्शन व सहवासाने अनेकांच्या जीवनात आनंद पेरला. सर्कल ऑफ कॉन्सिएसनेस अँड हॅप्पीनेस कॅलिफोर्निया (अमेरिका) आणि सोल फाउंडेशन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने हॉटेल रामी ग्रँड येथे 'मेटा अवेकनिंग' कॉन्सर्टचे आयोजन केले होते. जवळपास २५० पुणेकरांनी यामध्ये सहभागी होत कॉन्सर्टची अनुभूती घेतली.

#रा

### 'स्व' ला ओळखा...

- स्वतःतील क्षमता आणि हिलिंगची शक्ती जाणून घ्यावी.
- प्रत्येक गोष्ट जशी आहे, तशी स्वीकारावी.
- स्वतःवर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःची ओळख करून घेणे अधिक महत्वाचे

> "ईश्वर, आत्मा आणि नशीब या विश्वास ठेवण्याच्या, तर जगण्यातील अडचणी, त्यावरील उपाय आणि स्वतःतील क्षमता या जाणून घेण्याच्या गोष्टी आहेत. निसर्गातून आपल्याला खूप शिकायला मिळते. वाघ किंवा गरुड जसा शिकार करताना ध्येयवादी असतो, त्याप्रमाणे आपण ध्येयवादी असायला हवे. भविष्याची चिंता करत बसण्यापेक्षा अनुभवलेल्या कठीण प्रसंगातून प्रेरणा घेत वाटचाल केली पाहिजे. प्रत्येकामध्ये 'जिनियस' दडलेला असतो.आपण स्वतःला ओळखून क्षमतांचा विकास करत 'जिनियस' बनण्याची गरज आहे."
> — श्री भूपेंद्र

# गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी पोलिसदल सज्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान अनुचित घटना टाळण्यासाठी शहर पोलिस दल सज्ज झाले आहे. विसर्जन मिरवणुकीदिवशी सात हजार पोलिस बंदोबस्तासाठी तैनात करण्यात येणार आहेत. संशयितांच्या हालचालींवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची करडी नजर राहणार आहे. शहरात मंगळवारी (ता. १७) सकाळी विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ होईल. ही मिरवणूक दुसऱ्या दिवशी बुधवारी दुपारपर्यंत सुरू राहील. या कालावधीत अनुचित प्रकार घडू नये, यासाठी गुन्हे शाखेसह बॉम्ब शोधक व नाशक पथक, शीघ्र कृती दल आणि राज्य राखीव पोलिस दलाची पथके नेमली आहेत. महिलांची छेडछाड, सोनसाखळी आणि मोबाईल चोरी रोखण्यासाठी पोलिसांची स्वतंत्र पथके असतील. सर्व लॉजेस आणि हॉटेलची पोलिसांकडून तपासणी करण्यात येत आहे. तसेच, विसर्जन मिरवणुकीदरम्यान मद्य विक्रीची दुकाने १७ आणि १८ सप्टेंबर रोजी मिरवणूक संपेपर्यंत बंद राहतील. शहराच्या मध्यवर्ती भागातील प्रमुख रस्ते आणि अंतर्गत रस्ते वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहेत. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका आणि अग्निशामक दलाच्या वाहनांना तातडीने घटनास्थळी पोचण्यासाठी मार्ग उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### 'माय सेफ पुणे' ॲप...

● गणेश विसर्जनादिवशी 'माय सेफ पुणे' ॲपद्वारे बंदोबस्त आणि मंडळांची माहिती प्राप्त होणार आहे. वाहनांच्या पार्किंगसाठी जागा, पोलिस मदत केंद्रे, पादचारी मार्ग, विसर्जन मिरवणूक मार्ग, बंद रस्ते आणि मंडळांच्या मिरवणुकीबाबत सद्य:स्थितीची माहिती दिली जाणार आहे.

MY SAFE PUNE

# केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन
# संशोधन आणि तंत्रज्ञान भारताच्या प्रगतीचे भवितव्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आजही सुमारे ६५ % नागरिक ग्रामीण भागात राहतात आणि कृषी अर्थव्यवस्था हा त्यांच्या उदरनिर्वाहाचा मुख्य स्त्रोत आहे. संशोधन आणि तंत्रज्ञानाची जोड देत कृषी अर्थव्यवस्थेला आपणास पाठबळ द्यावेच लागेल कारण कृषी अर्थव्यवस्थेला अव्हेरून आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण होणार नाही, असे मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सीओईपी टेक) आणि सीओईपी माजी विद्यार्थी संघटना यांच्यावतीने देण्यात येणारा 'सीओईपी अभिमान पुरस्कार' यंदा देश आणि परदेशातील तंत्रज्ञान क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या माजी विद्यार्थ्यांना रविवारी भारतरत्न सर एम. विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त साजरा होत असलेल्या अभियंतादिनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.



सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सीओईपी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष भरत गीते, नियामक मंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ उद्योजक डॉ. प्रमोद चौधरी, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुनील भिरूड, कुलसचिव डॉ. दयाराम सोनवणे, मानद सचिव डॉ. सुजीत परदेशी आदी मान्यवर उपस्थित हो

### यंदाचा सीओईपी जीवनगौरव पुरस्कार प्रदान

● हमदाबाद येथील भगवती स्फेरोकास्ट प्रा. लि. चे अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक ज्येष्ठ उद्योगपती पी.एन. भगवती यांच्यावतीने लोहिया यांनी स्वीकारला. तर यंदाच्या सीओईपी अभिमान पुरस्काराने अभिनेता वैभव तत्ववादी, राज्याच्या पर्यावरण विभागाचे मुख्य सचिव आयएएस अधिकारी प्रवीण दराडे, सिक्कीमचे कॅबिनेट मंत्री राजू बसनेत, अमेरिकेतील 'जे.पी. मॉर्गन चेस'च्या कार्यकारी संचालक मोनिका पानपलिया आणि अमेरिकेतील टेस्ला मोटर्सचे वरिष्ठ संचालक हृषीकेश सागर यांना सन्मानित करण्यात आले.

### लवकरच मुंबई-बंगळुरू १४ लेन महामार्ग

● पुढील सहा महिन्यात मुंबई बंगळूर या १४ लेन महामार्गाचे काम सुरू होणार असून मुंबईतील अटल सेतू उतरला की थेट एक्स्प्रेस महामार्गाला लागता येणार आहे. हा महामार्ग थेट रिंग रोडशी जोडलेला असेल आणि यामुळे मुंबई- बंगळुरू प्रवास अधिक गतीने करता येईल. तसेच पुणे-औरंगाबाद हे अंतर केवळ दोन तासांवर येईल,

# 'आदीशक्ती' रथातून शारदा गजाननाची विसर्जन मिरवणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अखिल मंडई मंडळाची विसर्जन मिरवणूक 'आदीशक्ती'रथातून निघणार आहे. रौद्र रुपातील कालीमातेची १५ फूट उंचीची मूर्ती यामध्ये असेल. दरवर्षी मिरवणूकीत श्री शारदा गजाननाचे फक्त समोरुनच दर्शन घेता येते त्यामुळे यंदा प्रथमच शारदा गणपतीची मूर्ती ६० अंशात फिरणार असून दोन्ही बाजूने भाविकांना दर्शन घेता येणार आहे. रथाची उंची कमी करण्यासाठी हायड्रोलिक तंत्रज्ञानाचा देखील वापर करण्यात आले आहे. गणेशोत्सवाची सांगता मिरवणूक अनंत चतुर्दशीला मंगळवार, दिनांक १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता निघणार आहे. अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात यांनी दिली. मंडळाचे गणेशोत्सवाचे यंदा १३१ वे वर्ष आहे. रथाचा आकार १४ बाय १८ आणि उंची २७ फूट आहे. मेट्रोच्या लकडीपूल येथील पूलामुळे हायड्रोलिक तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. कलादिग्दर्शक विशाल ताजणेकर आणि सहकाऱ्यांनी रथ साकारला आहे. आदिशक्ती रथावर आकर्षक विद्यूत रोषणाई करण्यात आली आहे.



# अवतीभवती
CITY UPDATE



## कार्यकर्त्यांकडून गणरायाला १३ तोळ्याचे सुवर्णदंत भेट

**पुणे :** अखिल मंडई मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या लाडक्या गणरायाला वर्षभर पैसे जमवून १३ तोळ्याचे सुवर्णदंत वाढदिवसानिमित्त भेट दिले आहेत. कार्यकर्त्यांनी वर्षभरापासून जमतील त्या पद्धतीने पैसे जमा करून २४ कॅरेट सोन्यापासून हे सुवर्णदंत तयार केले आहेत. त्यावर आकर्षक नक्षीकाम देखील आहे. याशिवाय यशोधन साखरे यांनी सोन्याचे जानवे आणि गणेश सणस यांनी सोन्याचे बाजूबंद शारदा गजाननाला अर्पण केले. या प्रसंगी उद्योजक पुनीत बालन उपस्थित होते.

## रोटरी क्लब पुणे तर्फे गजसंस्कृती उपक्रमात स्वच्छता अभियान

**पुणे :** रोटरी क्लब ऑफ पुणे मिडईस्ट आणि रोटरॅक्ट क्लब ऑफ पुणे मिडईस्टने दरवर्षीप्रमाणे यंदाही 'गजसंस्कृती' या स्वच्छता अभियान उपक्रमाचे आयोजन केले आहे. बुधवारी (ता. १८) सकाळी ७ वाजता नामदार गोपाळकृष्ण गोखले चौकातील कलाकार कट्ट्यापासून या उपक्रमाला सुरुवात होणार आहे. या उपक्रमांतर्गत अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्यादिवशी १०० हून अधिक उत्साही 'रोटारॅक्टर्स' शहरातील विविध भागांमध्ये स्वच्छता मोहीम राबवतात. यंदा या उपक्रमाचे आठवे वर्ष आहे. याअंतर्गत यंदा केळकर रस्ता, भिडे पूल व नदीपात्र, लोकमान्य टिळक चौक, खंडुजी बाबा चौक, जंगली महाराज रस्ता, कर्वे रस्ता, टिळक रस्ता आदी परिसरांची स्वच्छता करणार आहेत.

# देखावे पाहण्यासाठी भाविकांच्या उत्साहाला उधाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणेश मंडळांनी साकारलेले देखावे पाहण्यासाठी शनिवार आणि रविवार शहराच्या मध्य भागात गर्दीचा महापूर लोटला. रात्र जागवीत गणेशभक्तांनी पहाटेला मानाच्या गणपतीचे दर्शन घेऊनच घराची वाट धरली. पावसाने विश्रांती घेतल्याने गणेशभक्तांच्या उत्साहाला उधाण आले होते. मात्र, चौकाचौकांमध्ये होत असलेल्या ढोल-ताशा पथकांच्या स्थिरवादनाचा नागरिकांना मन:स्ताप झाला. रस्ते बंद झाल्याने पायी चालणेही मुश्कील झाले होते. उपनगर आणि जिल्ह्यातून नागरिक सहकुटुंब गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी दाखल झाल्याने गर्दीमध्ये भर पडली.

अलोट गर्दीमुळे मध्य भागातील गल्ली-बोळातून पायी जाणेही मुश्कील झाले होते. रस्ते वाहतुकीसाठी बंद असतानाही अनेकांनी आपली वाहने आणल्यामुळे झालेली कोंडी सोडविताना वाहतूक पोलिसांची त्रेधातिरपीट उडाली होती. छत्रपती शिवाजी रस्ता, थोरले बाजीराव रस्ता, टिळक रस्त्यासह मध्य भागातील प्रमुख रस्ते सायंकाळनंतर वाहतुकीस बंद करण्यात आले. शहरातील हॉटेल देखील मोठ्या प्रमाणात तुडुंब भरली होती. एकूणच शहरातील भाविकांच्या उत्साहाला उधाण आले होते.



### तरुण स्वयंसेवक 'मार्ग' दर्शक

● मध्यवर्ती भागातील गणेशोत्सव मंडळांचे देखावे पाहण्यासाठी सर्वाधिक गर्दी असते. गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवसांपासून गर्दीचा महापूर पुण्यातील मध्यवस्तीत ओसंडून वाहत आहे. परंतु, गेल्या सहा दिवसांपासून कुमठेकर रस्ता, लक्ष्मी रस्ता, टिळक रस्ता आणि अंतर्गत रस्त्यांवर दोन्ही बाजूंनी नागरिक ये-जा करत होते. परिणामी वाहनचालकांना ये-जा करणे जिकिरीचे जात होते. परंतु, तरुण स्वयंसेवक शुक्रवारी सायंकाळपासूनच देखावे पाहण्यासाठी आलेल्या भाविकांना पुढे मार्गस्थ होण्यासाठी वाट करून देत होते. यात चाणक्य मंडलचे स्वयंसेवक कुमठेकर रस्त्यावर नियोजन करत होते.


# ८५ लाखांहून अधिक गणेशभक्तांनी घेतले 'दगडूशेठ' श्रीं चे ऑनलाईन दर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्रात पुण्यासह मुंबई, दिल्ली, ठाणे, नागपूर, नाशिक या शहरांसह गुजरातमधील अहमदाबाद, कलकत्ता, सूरत या शहरांतून गणेशभक्त वेबसाईट, फेसबुक, यू ट्यूब, इन्स्टाग्राम, ट्विटरसह श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या सोशल मीडियावर बाप्पाचे दर्शन घेत आहेत. तर, नेपाळ, अमेरिका, थायलंड, कॅनडा, इंडोनेशिया, इंग्लंड ऑस्टेलियासह पाकिस्तानातून देखील ट्रस्टच्या सोशल मीडियावर तब्बल ८५ लाखांहून अधिक गणेशभक्तांनी दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेतले आहे.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळच्यावतीने ट्रस्टच्या १३२ व्या वर्षीचा गणेशोत्सव सुरु आहे. ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासूनच ट्रस्टतर्फे विविध कार्यक्रम सुरु झाले. तेव्हापासून ट्रस्टच्या वेबसाईटवरुन हजारो भाविक दर्शन घेत आहेत.

वेबसाईटवरुन दररोज सकाळी व रात्री होणारी लाईव्ह आरती व दर्शन देखील गणेशभक्त घेत आहेत. केवळ भारतातीलच नव्हे, तर जगभरातील गणेशभक्तांचे आकर्षण असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन प्रत्यक्ष घेता आले नसले, तरी ऑनलाईन माध्यमातून उत्सवाचा आनंद जग-भरातील भाविक घेत आहेत. याकरिता भाविकांना ट्रस्टतर्फे विविध ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.



### श्री उमांगमलज रथातून 'दगडूशेठ' गणेशाची सांगता मिरवणूक

● श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ गणेशोत्सवाची सांगता मिरवणूक थाटात निघणार आहे. यंदा श्री उमांगमलज रथामध्ये दगडूशेठ चे गणपती बाप्पा विराजमान होणार असून आकर्षक विद्युतरोषणाईने हा रथ उजळून निघणार आहे. मिरवणूक श्री उमांगमलज रथाच्या माथ्यावर जटा सोडलेली शंकराची मूर्ती असणार आहे. त्याच्या बाजूला त्रिशूळ आणि डमरु देखील आहे. कळस म्हणून मोठा रुद्राक्ष दाखविण्यात आला आहे.

# उमिया मोबाईलच्या पहिल्या दालनाचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हडपसर :** मोबाईल व ऍक्सेसरीजच्या बाजारातील अग्रणी उमिया मोबाईल प्रायव्हेट लिमिटेडच्या भव्य मोबाईल रिटेल दालनाचे उद्घाटन हडपसरमध्ये रविवारी झाले. उमिया मोबाईलचे पुण्यातील हे पहिलेच दालन असून, येथे ग्राहकांना सर्व कंपन्यांचे मोबाईल, ऍक्सेसरीज व अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे आकर्षक किंमतीत व ऑफर्समध्ये एकाच छताखाली उपलब्ध झाले आहेत. सोलापूर रस्त्यावरील हडपसर गाडीतळ येथे भव्य १५०० स्क्वेअर फुटमध्ये दुमजली हे दालन आहे. सॅमसंगचे विभागीय विक्री व्यवस्थापक सत्यजित पुरी, विपणन व्यवस्थापक रोहित बर्थरे, वितरण प्रमुख विशाल माहेश्वरी, उमिया मोबाईलचे संचालक गिरीश पटेल, किशोर पटेल, बन्नी पटेल, मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सोमाणी, बिझनेस हेड चंद्र मोहन आदी उपस्थित होते.उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत उमिया मोबाईलच्या या दालनात भरघोस सवलतींचा लाभ घेत मनसोक्त खरेदी केली. विविध ऑफर्स आणि आकर्षक भेटवस्तू यामुळे ग्राहकांच्या चेहऱ्यावरील खरेदीचा आनंद पाहायला मिळत होता.



# अकरावी, बारावीलाही मराठीची सक्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मराठी विषयाची परीक्षा गुणांकनाची न ठेवता श्रेणी स्वरूपात मूल्यांकन करण्याची सवलत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून संपुष्टात येत आहे. राज्यातील सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याच्या अधिनियमाची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे आवश्यक असून, तसेच अकरावी, बारावीसाठीही मराठीचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले आहे.

राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले आहे. त्याची अंमलबजावणी १ एप्रिल २०२० पासून करण्यात येत आहे. अधिनियमाची २०२०-२१ पासून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. राज्य मंडळाच्या शाळा वगळून इतर परीक्षा मंडळांच्या शाळांमध्ये २०२२-२३च्या आठवीच्या तुकडीला २०२३-२४ला नववीमध्ये, २०२४-२५ ला दहावीला एक वेळची बाब म्हणून मराठी विषयाची परीक्षा गुणांकनाची न ठेवता श्रेणी स्वरूपात मूल्यांकन करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सवलत ही फक्त एका बॅचपुरतीच मर्यादित होती. सवलतीचा चुकीचा अर्थ लावून मराठी भाषा पुरेशा गांभीर्याने शिकविली जात नसल्याचे काही ठिकाणी दिसून आले आहे.


SHRINATH SHIKSHAN PRASARAK MANDAL
**R.M.DHARIWAL SINHGAD MANAGEMENT SCHOOL**
Kondhapuri, Tal. Shirur, Dist. Pune - 412208.
Phone: 02138-645330 Email ID: rmdsms@sinhgad.edu
Sinhgad Institutes

**WALK IN INTERVIEW**

Applications are invited from eligible candidates for the appointment to the following posts for A. Y. 2024-25 on adhoc basis to be filled in our R. M. Dhariwal Sinhgad Management School, Approved by AICTE; Recognized by Government of Maharashtra and Affiliated to Savitribai Phule Pune University.

| S.N. | Posts | Total Posts | Open | Reservation Category |
|---|---|---|---|---|
| 1. | Associate Professor | 01 | 01 | — |
| 2. | Assistant Professor | 03 | 01 | 01 SC, 01 DT(A) |

1) **Qualification and Experience:** As per AICTE / Savitribai Phule Pune University norms.
2) **Pay Scale:** As applicable under the norms of AICTE / DTE / Government recommendation.
3) Reserve category candidates applying under reservation quota should bring the original copy of Caste Certificate & Caste Validity Certificate.
4) EWS candidates should bring the original copy of EWS Certificate at the time of interview.
5) DT(A), NT(B), NT(C), NT(D), OBC, SEBC, SBC and Ladies candidates should bring recent original copy of Non-Creamy Layer Certificate at the time of interview.
6) Reserved Category Candidates should also submit hard copy of application to the Deputy Registrar, (Reservation Cell), SPPU by email reservation@unipune.ac.in.

**Date & Venue of Interview:** The interview is scheduled at **12.00 PM to 03.00 PM** on **Tuesday, 24 / 09 / 2024** at the office of **The Secretary, Shrinath Shikshan Prasarak Mandal, 6th Floor, 19/15, Erandwane, Smt. Khilare Marg, Off Karve Road, Pune - 411004**. The candidates should bring their application addressing to **The Secretary, Shrinath Shikshan Prasarak Mandal**, affixing recent passport size color photo, attested copies of testimonials, experience certificates, latest salary slip, if already in service & all the original documents at the time of interview.

*Subject to Pune Jurisdiction Only

**Dr. (Mrs.) Sunanda M. Navale**
**Secretary**


# RS NEWS DIGEST

# ३६ व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये पुणेकरांना सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

## सलग २७ व्या वर्षी रंगला मुशायरा

**पुणे :** 'आपल्या समाजात भेद आहेत, असे म्हणणार्यांना पुणे फेस्टिव्हलमधील ऑल इंडिया मुशायर्याचे दृष्य दाखवा. गंगाजमनी सभ्यतेचे जिवंत उदाहरण इथे पाहायला मिळेल', असे गौरवोद्गार माजी परराष्ट्रमंत्री सलनाम खुर्शीद यांनी येथे काढले. राष्ट्रीय एकात्मता आणि धार्मिक सलोखा जोपासणारा 'ऑल इंडिया मुशायरा' श्रीगणेश कला क्रीडा रंगमंच येथे सादर झाला. प्रमुख पाहुणे म्हणून सलमान खुर्शीद आलम बोलत होते. पुणे फेस्टिव्हलचे मुख्य समन्वयक ॲड. अभय छाजेड, ज्येष्ठ नेते उल्हास पवार, उपस्थित होते. डॉ पी ए इनामदार विद्यापीठाचे कुलपती व ज्येष्ठ शिक्षणतज्ञ आणि संयोजक डॉ पी. ए. इनामदार आणि निमंत्रक डेक्कन मुस्लिम इन्स्टिट्यूटच्या अध्यक्ष आबेदा इनामदार यांनी याचे आयोजन केले होते.





## 'आविष्कार भारती'ने प्रेक्षकांची मने जिंकली

**पुणे :** भारती विदयापीठ अभिमत विश्वविद्यालय स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सच्या विद्यार्थ्यांना आविष्कार भारती या कार्यक्रमामध्ये त्यांच्या संगीत आणि नृत्य सादरीकरण्याला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त भरघोस प्रतिसाद मिळाला. संचालक प्राध्यापक शारंगधर साठे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला.

भजन, गझल, ठुमरी, नाट्यसंगीत, भावगीत, गवळण, संगीत असे विविध प्रकार होते. या नंतर कथक, भरतनाट्यम आणि आसामचे सत्रिय या शास्त्रीय नृत्य शैली मधे अनेक नृत्य संरचना सादर झाल्या. यामध्ये स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सच्या नृत्याच्या १२७ विद्यार्थिनींनी ज्या सुचेता चापेकर, मनीषा साठे, शमा भाटे, स्वाती दैठणकर, प्रेरणा देशपांडे, अरुंधती पटवर्धन, देविका बोरठाकूर, मंजिरी कारुळकर, तेजस्विनी साठे, अस्मिता ठाकूर, अमृता परांजपे या गुरूंकडे शिकत आहेत आपली कला सादर केली. यामध्ये अनेक देवतंवरील स्तुती परणे, त्रिवट, चतरांग, कृष्णभक्ती यावर आधारित अनेक नृत्य संरचना विलक्षण प्रभावी पणे सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली

## रंगला नारदीय कीर्तन महोत्सव

**पुणे :** 'आपले पारंपरिक उत्सव ही संस्कार घडवणारी केंद्रे आहेत. त्यांचे जतन करणे आवश्यक आहे. त्यांना 'केवळ धार्मिक' असे लेबल देणे योग्य नाही', असे प्रतिपादन राष्ट्रीय कीर्तनकार मोरेश्वर जोशी चर्होलीकर यांनी केले. रविवारी सकाळी नारदीय कीर्तन महोत्सावचे आयोजन करण्यात आले होते. टिळक रस्त्यावरील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात हा महोत्सव पार पडला. यावेळी जोशीबुवांनी स्वतः कीर्तन सादर करत उत्सवांचा अर्थ प्रात्यक्षिकासह उलगडला. पुणे फेस्टिव्हल अंतर्गत नारदीय कीर्तन महोत्सवाचे हे चौथे वर्ष होते. फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मुख्य समन्वयक ॲड. अभय छाजेड, संगीतज्ञ पंडित आनंद गोडसे, व विदुषी क्षमा गोडसे, या उपक्रमाच्या संकल्पक आणि संयोजिका कीर्तन विशारद ह भ प तबला वादिका निवेदिता मेहेंदळे, मार्गदर्शक पंडित नचिकेत मेहेंदळे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.





## नृत्य स्पर्धेत भावनाज डान्स ग्रुप विजयी

**पुणे :** बालगंधर्व रंगमंदिर येथे संपन्न झालेल्या महिला नृत्य स्पर्ध मध्ये भावनाज डान्स ग्रुप या महिलांच्या ग्रुपने पहिला क्रमांक पटकवला. शिल्पाज वंडर फीट डान्स ग्रुप आणि महाराष्ट्राच्या लेकी यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळवला. पुणे फेस्टिव्हलतर्फे 'नृत्य झंकार' या कार्यक्रमाचा संयोजन संयोगिता कुदळे यांनी केले. महिलांचे नृत्य स्पर्धेत प्रत्येकी १० जणींच्या २४ ग्रुपने सहभाग घेतला होता. यामध्ये नगर येथून देखील स्पर्धक महिला आल्या होत्या. यामध्ये २४० महिला स्पर्धकांनी फ्युजन लावणी, बॉलीवूड फ्युजन, कथक, भरतनाट्यम, जोगवा, वारकरी दिंडी, मंगळागौरी, शिव तांडव, लोकगीतांवर आधारीत नृत्ये सादर केले. मिस ग्रीन महाराष्ट्र पलक शिवकुमारश्री, मिस पुणे फेस्टिवल २०२३-२४ संयुक्ता धुलगुडे, चेतना बिडवे आणि सोहनी डांगे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

## तुकाराम महाराजांच्या महानाट्याची प्रस्तुती

**पुणे :** संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या ३७५व्या वैकुंठगमन वर्षानिमित्त त्यांच्या जीवनावर आधारित भव्य महानाट्य 'जाऊ देवाचिया गावा' श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे सादर करण्यात आले. संजय भोसले यांनी लेखन आणि दिग्दर्शन केलेल्या या नाट्याचे संगीत ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांनी केले होते. गायक सुरेश वाडकर, आनंद भाटे, देवकी पंडित आणि त्यागराज खाडिलकर यांच्या रेकॉर्डेड सुमधुर गाण्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण होते ४० कलाकारांनी सादर केलेली मयूर वैद्य यांच्या नृत्य दिग्दर्शनाखालील नृत्ये आणि रंगमंचावरील पारंपरिक गावाच्या वातावरणाची अनुभव देणारी देखणी सजावट. ग्राम्य जीवनाचा सुंदर अनुभव देणाऱ्या या सजावटीने संपूर्ण प्रेक्षागृह मंत्रमुग्ध केले. पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल व मुख्य समन्वयक ॲड. अभय छाजेड यांनी कलाकारांचे सत्कार केले.



# आखाताशी जुळले नाते...

संयुक्त अरब अमिराती क्राऊन प्रिन्स खालिद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्या भारतभेटीमुळे दोन्ही देशांच्या संबंधांसह एकंदरीत आखाती देशांशी असणाऱ्या संबंधांना नवी चालना मिळाली आहे. या भेटति पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रिन्स खालिद यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. विशेषत: या भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यासंबंधी अनेक करारांना अंतिम रूप देण्यात आले. भारताने आपली ऊर्जा सुरक्षा वाढवण्यासाठी पेट्रोलियम उत्पादनांच्या साठवणुकीचा मुख्य प्राधान्यक्रमांमध्ये समावेश केला आहे. या योजनेला सौदी अरेबियाचे आधीपासूनच सहकार्य आहे. आता संयुक्त अरब आमिरातीसुद्धा भारताला कच्च्या तेलाचा नियमित पुरवठा करणार आहे. अबुधाबीतील एक मोठी कंपनी गुजरातमध्ये कृषी आणि फूड पार्क उभारण्यासाठी मोठी गुंतवणूक करणार आहे. अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आणि मागणीतील सतत होत चाललेली वाढ लक्षात घेता भारताला पुरेशी ऊर्जेची उपलब्धता राखणे आवश्यक आहे. भारतात नैसर्गिक वायूचा पुरवठा प्रामुख्याने कतारमधून केला जातो. प्रिन्स खालिद यांच्या भारतभेटीत अबुधाबीतून पुढील पंधरा वर्षांसाठी दरवर्षी दहा लाख मेट्रिक टन नैसर्गिक वायूचा पुरवठा करण्याबाबत करार करण्यात आला आहे. अवघ्या एका वर्षाच्या कालावधीत गॅस पुरवठ्याशी संबंधित हा तिसरा करार आहे. स्वच्छ ऊर्जेच्या क्षेत्रात अणुऊर्जा महत्त्वाची ठरत आहे. यामध्ये भारत आघाडीवर आहे. अरब देशांसह सर्व देश अणु आणि इतर स्वच्छ उर्जेकडे लक्ष देत आहेत. ऊर्जा विविधतेसाठी आणि हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी हे आवश्यक आहे. भारत आणि अमिरातीच्या अणुऊर्जा महामंडळांमधील करारामुळे दोन्ही देशांमधील या क्षेत्रातील सहकार्याचे नवे पर्व सुरू झाले आहे.उल्लेखनीय बाब म्हणजे, गेल्या आठवड्यातच अमिरातीने आपल्या पहिल्या अणुऊर्जा प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाल्याची घोषणा केली होती. संपूर्ण अरब जगतातील हे पहिले संयंत्र असणार आहे. याचा संबंध भारताशी जोडल्याने दोन्ही देशांमधील विश्वासाचे नाते गहिरे असल्याचे दिसून येते. गेल्या वर्षी क्राऊन प्रिन्सची जबाबदारी स्वीकारलेल्या शेख खालिद यांची ही पहिलीच भारत भेट होती. राष्ट्राध्यक्षांच्या स्वागतासाठी जशी व्यवस्था केली जाते तशीच व्यवस्था त्यांच्या स्वागतासाठी करण्यात आली होती. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, क्रिटिकल मिनरल्स, इज ऑफ डुइंग बिझनेस इत्यादी अनेक मुद्द्यांवरही महत्त्वपूर्ण करार झाले आहेत. शेख खालिद भारतात असताना, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर सौदी अरेबियामध्ये आखाती देश आणि भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या पहिल्या संयुक्त बैठकीला उपस्थित होते. भारत आणि अरब देशांमधील संबंधांचे भविष्य उज्ज्वल असल्याचे यातून स्पष्ट होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यानंतर भारताचे आखाती देशांसोबतचे संबंध सार्वकालिक उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत. संयुक्त अरब अमिराती, बहरीन, ओमान, कुवेत, कतारपासून सौदी अरेबियापर्यंत सर्वांशी भारताची घनिष्ठ मैत्री दिसून येते. पंतप्रधान मोदींनी सात वेळा यूएईला भेट दिली आहे. ते दोनदा सौदी अरेबिया आणि कतारलाही गेले आहेत. ओमान आणि बहरीनचेही दौरे केले आहेत. २०१५ मध्ये जेव्हा पंतप्रधान संयुक्त अरब आमिरातीला गेले होते तेव्हा ३४ वर्षांनंतर भारतीय पंतप्रधानांनी तेथे भेट दिली. मोदींनी यावर्षी फेब्रुवारीमध्येही यूएईला भेट दिली होती. तेथे भव्य मंदिराची पायाभरणी करण्यात आली, ज्यासाठीची जमीन क्राउन प्रिन्स शेख खालिद बिन मोहम्मद झायेद अल नाहयान यांनी लीजवर दिली आहे. गेल्या काही वर्षांत, अरब देशांमध्ये भारताचा एक मजबूत आणि विश्वासार्ह भागीदार बनला आहे. आर्थिक दृष्टिकोनातून, अरब देशांमध्ये, सौदी अरेबिया, युएई, इराण, इराक सारखे देश खूप प्रभावशाली मानले जातात. त्यांचा जागतिक स्तरावर आर्थिक क्रियाकलापांना आकार देण्यात मोठी भूमिका आहे. यापैकी युएई हा एकमेव देश आहे ज्याची भारतासोबतची भागीदारी गेल्या काही वर्षांत खूप मजबूत झाली आहे. अमेरिका आणि चीननंतर युएई हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. युएई हे भारताचे दुसरे सर्वात मोठे निर्यातीचे ठिकाण आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे भारताबाहेर राहणाऱ्या नागरिकांपैकी एक चतुर्थांशहून अधिक लोक आखाती देशांमध्ये राहतात. आखाती देशांमध्ये अंदाजे ९० लाख भारतीय आहेत, त्यापैकी ३४.३ लाख एकट्या युएईमध्ये आहेत आणि २५.९ लाख सौदी अरेबियामध्ये राहतात. कुवेतमध्ये १०.३ लाख भारतीय, ओमानमध्ये ७.८ लाख, कतारमध्ये ७.५ लाख आणि बहरीनमध्ये ३.३ लाख भारतीय वास्तव्यास आहेत. परदेशात राहणाऱ्या भारतीयांनी पाठवलेल्या पैशांपैकी अर्धा पैसा या देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांकडून येतो. भारताला लागणाऱ्या तेलांपैकी ६५ टक्के तेल याच देशांतून येते. आखाताचे हे महत्त्व लक्षात घेऊन मोदी सरकारने या देशांकडे दिलेले विशेष लक्ष महत्त्वाचे आहे. येणाऱ्या काळात अरब देश आणि भारत यांचे एक दृढ नाते विकसित होताना दिसेल. ■

> प्रत्येक मृत्यू मागे एक पोकळी सोडत असतो; पण कॉम्रेड सिताराम येचुरी यांच्या निधनाने निर्माण झालेल्या पोकळीची भरपाई कधी होईल असे वाटत नाही. कठीणातील कठीण काळातही त्यांचे धैर्य कधी तसूभरही ढळले नाही. त्यांना राग अनावर झाला आहे, असे कधीच दिसले नाही. आज भारतीय राजकारण अत्यंत कडवट होत चालले आहे आणि सर्वत्र सविनय कायदेभंग होत आहेत, विरोधी भाषा विखारी झाली आहे, अशा काळातही कॉम्रेड येचुरी यांनी राजकारणाचे मूळ स्वरूप कायम ठेवले होते. यातून त्यांनी मूळ भारतीय स्वभाव जपला होता. आपण एकमेकांच्या कितीही विरोधात असलो तरी एकाच वर्तुळात किंवा मंचावर एकमेकांसोबत असतो, हे या भारतीय स्वभावाचे मूळ तत्व आहे.

# राजकारणातला दुर्मिळ कॉम्रेड

मनोज कुमार झा



दहा-बारा वर्षांपूर्वीची गोष्ट. सीताराम येचुरींसोबत मी जयपूरहून एका कार्यक्रमात सहभागी होऊन परतत होतो. त्यांच्या हातात एक पुस्तक होते, ई इज इक्वल टू एमसी स्क्वेअर. लेखक डेव्हिड बोदानीर. मला माहित होते की त्यांचे वाचन विविधांगी आणि सखोल होते. म्हणून मी त्यांना या पुस्तकाबद्दल विचारू लागलो. पुस्तक चाळून, पलटून पाहिल्यावर मला ते आवडले. माझी उत्सुकता लक्षात येताच ते म्हणाले, 'तुमचा पत्ता पाठवा.' मी त्यांना माझा पत्ता दिला आणि चार दिवसांत पुस्तकाची प्रत माझ्यापर्यंत पोहोचली. त्यावेळी मी विद्यापीठाच्या निवासस्थानात राहत होतो. लोकांशी अतिशय कुशलतेने जोडले जाणे हा येचुरी यांचे सर्वांत मोठे गुणवैशिष्ट्य होते.

मी त्यावेळी खासदार नव्हतो, पण मी त्यांच्यासोबत राहिलो तेव्हा ते अगदी लहानसहान गोष्टींचीही दखल घेत असत. एवढेच नाही तर तो फोन करून विविध गोष्टी सांगायचे. अजून एक प्रसंग सांगतो. मी राज्यसभेवर आलो त्याचदरम्यान त्यांचा कार्यकाळ संपत आला होता. त्यांनी मला निरोप पाठवला की, 'कॉम्रेड, तुम्ही राज्यसभेवर अगदी योग्य वेळी आलात, मी निघतोय आणि तुम्ही येत आहात.'

राजकारणात एवढी प्रदीर्घ कारकीर्द असलेला नेता असे म्हणत आहे, ही माझ्यासाठी खूप मोठी बाब होती. कारण मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सर्वोच्च युनिट मानल्या जाणाऱ्या पॉलिट ब्युरोमध्ये येचुरी प्रदीर्घ काळ होते. एक दुर्मिळ राजकारणी असणाऱ्या येचुरींचा संसदीय इतिहास उज्ज्वल होता. त्यांना एकेकाळी राज्यसभेचे सर्वोत्तम खासदार मानले जात होते. अशा प्रचंड बुद्धीमान आणि अभ्यासू व्यक्तिमत्वाने व्यक्तिमत्व प्रदीर्घ आजाराशी लढत असतानाच जगाचा निरोप घेतला, हे ऐकून मनाला अतीव वेदना झाल्या. प्रत्येक स्तरावर मजबूत संबंध किंवा संपर्क निर्माण करणारे कुशल राजकारणी म्हणून त्यांची ओळख होती. त्यामुळेच येचुरीजी यांचे लालू प्रसाद यादव यांच्याशी जे नाते होते, तेच संबंध तेजस्वी यादव यांच्याशीही होते. कष्टकरी मजुरांप्रती असलेल्या समर्पित आयुष्यातील त्यांचा संघर्ष अवघ्या देशाने पाहिला आहे. त्यांच्या राजकीय कारकिर्दीत अनेक चढ-उतार आले, पण त्यांनी स्वत:चा आत्मविश्वास तर मजबूत ठेवलाच, शिवाय आम्हा सर्वांना आश्वस्तही केले.

प्रत्येक मृत्यू मागे एक पोकळी सोडत असतो; पण कॉम्रेड येचुरी यांच्या निधनाने निर्माण झालेल्या पोकळीची भरपाई कधी होईल असे वाटत नाही. कठीणातील कठीण काळातही त्यांचे धैर्य कधी तसूभरही ढळले नाही. त्यांना राग अनावर झाला आहे, असे कधीच दिसले नाही. आजच्या काळात हा गुण दुर्मिळ झाला आहे. आज जेव्हा भारतीय राजकारण अत्यंत कडवट होत चालले आहे आणि सर्वत्र सविनय कायदेभंग होत आहेत, विरोधी भाषा विखारी झाली आहे, अशा काळातही कॉम्रेड येचुरी यांनी राजकारणाचे मूळ स्वरूप कायम ठेवले होते. यातून त्यांनी मूळ भारतीय स्वभाव जपला होता. आपण एकमेकांच्या कितीही विरोधात असलो तरी एकाच वर्तुळात किंवा मंचावर एकमेकांसोबत असतो, हे या भारतीय स्वभावाचे मूळ तत्व आहे.

कॉम्रेड हरकिशन सिंग सुरजित यांच्यानंतर देशाच्या राजकारणात आलेल्या संक्रमण काळात सीताराम येचुरी यांची डाव्या पक्षांमधील भूमिका खूप वाढली होती. डावे पक्ष संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारमध्ये सामील झाले, तेव्हा युती कशी करायची, कोणते मुद्दे असतील, सरकारचा 'कॉमन मिनिमम प्रोग्रॅम' कोणता असेल, याबाबतची त्यांची भूमिका सदैव स्मरणात राहील. सुरजित सिंगांनंतरच्या काळात शेतकरी, मजूर आणि उपेक्षित लोकांच्या राजकारणासाठी झटत राहणे सोपे नव्हते. कारण बहुमताच्या वर्चस्वाचे राजकारण प्रबळ होत चालले होते. त्या काळाद कॉम्रेड येचुरी यांनी केवळ कॉम्रेड सुरजित यांचा वारसा कायम ठेवला नाही तर डाव्या विचारसरणीची उमेद जीवंत ठेवली. विशेषत: २०१० नंतरच्या काळात कामगार आणि उपेक्षित लोकांचा विश्वास जपण्याचे आव्हान कॉम्रेड येचुरी यांनी समर्थपणाने पेलले होते. शेवटपर्यंत त्यांचे यासाठीचे कार्य सुरू राहिले. याचे कारण सामाजिक-आर्थिक मुद्दे हे सदैव मध्यवर्ती चर्चेत राहिले पाहिजेत, ही त्यांची भूमिका होती. 'इंडिया ब्लॉक'च्या नुकत्याच झालेल्या बैठकांवर नजर टाकली तर त्यात कॉम्रेड येचुरी यांची भूमिका खूप महत्त्वाची होती. त्यांचे स्मरण करताना आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, कोणत्याही विचारधारेचा उदय आणि अस्त ही प्रवृत्ती असते. ज्या विचारधारा आज अतिशय प्रबळ मानल्या जातात त्या अनेक दशकांपासून उपेक्षित होत्या. कदाचित प्रत्येक विचारसरणीच्या प्रभुत्वाचा एक टप्पा असतो. विचारधारांचाही उदय आणि अस्त होत असतो. अर्थात आज उत्तर भारतात डावे पक्ष पूर्वीसारखे प्रबळ नसले तरी एकेकाळी डावे पक्ष प्रमुख विरोधक होते. गेल्या काही वर्षांत डाव्यांच्या प्रतिकूल काळात आपण आपली भूमिका विचारधारा आणि भारतभूमीच्या गरजांभोवती केंद्रित ठेवली पाहिजे, इथल्या मुद्द्यांशी आणि जडणघडणीशी नैसर्गिक संबंध असलेली विचारधाराच अंतिमत: टिकणार आहे हे त्यांचे नेहमी सांगणे असायचे. कॉम्रेड येचुरी यांच्यात असणारी जात आणि समाजाची समज आज फार कमी लोकांमध्ये आढळते. त्यांच्यासाठी संघर्ष हा केवळ निवडणूक किंवा सत्तेचा विषय नव्हता; तर विचारधारेची लढाई होती. अशी लढाई एक-दोन निवडणुकांतील जयपराजयाने संपत नाही. त्यामुळेच निवडणूक निकालांनंतर ते नेहमी म्हणायचे, अरे कॉम्रेड, निवडणुकाच तर हारलोय, उमेद हारलेलो नाही. जिद्द, उमेद कायम ठेवा, निवडणुका परत येतीलच! अशा या संघर्षशील कॉम्रेडना अखेरचा लाल सलाम !

(लेखक राज्यसभा सदस्य आहेत.) ■

सीताराम येचुरी हे भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी) चे सर्वोच्च नेते, डाव्या चळवळीचे सर्वोच्च नेते आणि प्रसिद्ध मार्क्सवादी विचारवंत होते.

१९७४ मध्ये जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील विद्यार्थी चळवळीत सामील झाले आणि भारतीय विद्यार्थी संघाचे नेते बनले. दोन वर्षांच्या कालावधीत ते तीन वेळा जेएनयू विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले.

१९८४ ते १९८६ या काळात ते विद्यार्थी संघटनेचे अखिल भारतीय अध्यक्ष होते आणि त्यांनी विद्यार्थी संघटना अखिल भारतीय शक्ती म्हणून विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

येचुरी यांनी १९७५ मध्ये सीपीआय(एम) मध्ये प्रवेश केला. आणीबाणीच्या काळात राजकीय कारवायांसाठी त्यांना अटक करण्यात आली होती. १९८५ मध्ये ते १२ व्या कॉंग्रेसमध्ये पक्षाच्या केंद्रीय समितीवर निवडले गेले आणि तेव्हापासून ते केंद्रीय समितीवर राहिले. ते १९८९ मध्ये केंद्रीय सचिवालयात आणि १९९२ मध्ये पक्षाच्या १४ व्या कॉंग्रेसमध्ये पॉलिटब्युरोसाठी निवडून आले.

२०१५ मध्ये त्यांची २१ व्या कॉंग्रेसमध्ये सीपीआय (एमआय) चे सरचिटणीस म्हणून निवड झाली, तेव्हापासून ते या पदावर होते.

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**सोमवार, दिनांक १६ सप्टेंबर २०२४**
भाद्रपद शु. १३ बृहस्पती पूजन श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू ईद-ए-मिलाद, शुभ दिवस
**सूर्योदय :** स.०६.०३ **सूर्यास्त :** सायं.०६.१३ वा
**नक्षत्र** : धनिष्ठा, योग : सुकर्मा, करण : गरज
**राहू काळ : सकाळी** : ७:३० ते ९:००

**दिनविशेष**

*१८६१ : सर डॉ. मोक्षगुंडम् विश्वेश्वरय्या जन्मदिन. हा दिवस अभियंता दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. *१९२८ : पेनिसिलीनचा शोध *१९५९ : भारतात दिल्ली येथे दूरदर्शनची सुरुवात. *१९९७ : प्रसारभारती विधेयक कायान्वित.

**राशीभविष्य**

***मेष :** घाईगडबडीत जाणारा दिवस. ***वृषभ :** दानधर्मावर खर्च वाढेल. ***मिथुन :** कर नाही त्याला डर कशाला. ***कर्क :** उल्हासित राहून कार्यसिद्धी कराल. ***सिंह :** कामकाजात मन रमेल. ***कन्या :**कर्तव्यदक्षता वाढेल. ***तुळ :** सलोख्याचे संबंध वाढतील. ***वृश्चिक :** प्रतिस्पर्ध्याला नामोहरम कराल. ***धनु :** अनपेक्षित बदल संभवतो. ***मकर :** वैयक्तिक कामे लांबणीवर पडतील. ***कुंभ :** प्रयत्नात कसूर नाही. प्रवास संभवतो. ***मीन :** जीवनोपयोगी मार्ग सापडेल.

**मेसेज आया**

रोज आठवण न यावी असे होतच नाही,
रोज भेट घ्यावी
यालाही काहीच हरकत नाही,
मी तुला विसरणार नाही याला विश्वास
म्हणतात, आणि तुला याची खात्री आहे
यालाच मैत्री म्हणतात!




**मराठी व्याकरण**

### कंठ्य वर्ण म्हणजे काय?

मराठी वर्णमालेत एकंदर ४८ वर्ण आहेत. या वर्णांच्या उच्चारांची प्रमुख स्थाने पुढीलप्रमाणे आहेत. जीभ, पडजीभ, कोमल तालू (कंठ), मूर्धा, कठोर तालू (तालू), वर्त्स (दंततालू), दात, ओठ, नाक इत्यादी. ज्या वर्णाचा उच्चार जीभेचा मागील भाग हा वर उचलून पडजीभेच्या पुढील भागाला म्हणजे कंठाला स्पर्श करताना होतो त्यांना कंठातून निघणारे म्हणून कंठ्य वर्ण असे म्हणतात. अ, आ हे स्वर आणि क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह् ही व्यंजने कंठ्य वर्ण आहेत.

**व्यक्तीविशेष**

### एम.एस. सुब्बलक्ष्मी

भारतीय संगीतक्षेत्रातील व्यक्तीला प्रथमच भारतरत्न चा सन्मान लाभला त्या श्रीमती एम.एस. सुब्बलक्ष्मी यांचा आज जन्मदिन. आपल्या व्यंकटेश सुप्रभात व विष्णू सहस्त्रनामामुळे घराघरांत पोचलेल्या सुब्बलक्ष्मींचा जन्म दि.१६ सप्टेंबर १९१६ रोजी मदुराई येथे झाला. सोमनगुडी श्रीनिवास अय्यंगार यांच्याकडे त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. सेवासदनम, भक्ती मीरा, सावित्री आणि शंकुतलाई अशा तामिळ चित्रपटांतून त्यांनी भूमिकाही केल्या. मात्र त्या रमल्या संगीतातच! अभिजात शास्त्रीय संगीत गायनाच्या त्यांच्या वाटचालीत त्यांना पं.नारायणराव व्यास यांचेही मार्गदर्शन लाभले. सामाजिक कृतज्ञतेची जाणीव सतत जागती ठेवून वैद्यकीय संशोधन केंद्रे, रूग्णालये, वैदिक पाठशाला यांना त्यांनी भरपूर अर्थसहाय्य केले. मद्रासच्या संगीत कला आकादमीच्या संगीत कलानिधी, रॅमन मॅगसेसे पुरस्कार, कालिदास सन्मान, संगीत नाटक अकादमीची फेलोशिप, इत्यादिंनी त्यांचा गौरव करण्यात आला.

**बोधकथा**

### पदाचे महत्त्व

गरूड आणि नागाचे वैर आपल्याला माहितच आहे. गरूडाला पाहिले की नाग घाबरून बिळात लपून बसतो. पण एकदा गंमत झाली. गरूड हे विष्णुचे वाहन, तर नागाला साक्षात भगवान शंकरांनी आपल्या गळ्यात बांधलेले. एकदा गरूडावर बसून विष्णु भगवान शंकरांना भेटायला कैलासवार गेले. विष्णुना आलेले पाहून शंकर बाहेर आले. तर गरूडाला बघून नाग फुत्कारू लागला. ते पाहून गरूड म्हणाला, तुझा प्रभाव किती आहे ते माहित आहे. भगवाप शंकरांच्या गळ्यात आहेस म्हणून इतका फुत्कारतो आहेस. असे स्थान प्राप्त झाल्यावर भित्रादेखील शुराचा आव आणून वागायला लागतो. पण त्याची लायकी काय आहे ते सर्वांना माहीत असते.

**तात्पर्य:- स्थानामुळे आपली किंमत मोजली जाऊ नये, आपल्यामुळे पदाची किंमत वाढायला हवी.**

**भूगोल**

### पृथ्वीवर जीवसृष्टीची सुरूवात मार्जिनोसीफेलियन्स

मार्जिनोसीफेलिया हा डायनासोरचा गट ऑर्निथिशियन डायनासोरशी मिळताजुळता होता. त्यांच्या कवटीच्या मागच्या बाजूला काटेरी तुरा असायचा. ऑर्निथोपोड्सच्या पूर्वजापासूनच मार्जिनोसीफेलियन या डायनासोरची उत्पत्ती झाली असावी. आजच्या उत्तर अमेरिका, आफ्रिका, आशिया आणि युरोता त्यांचा वावर १४६ ते ६५ दशलक्ष वर्षांपूर्वी क्रेबाशियस काळात होता. या प्राण्यांचेही दोन गट पडले. एक गट होता सेराटॉप्सिया पहिल्या गटातील डायनासोरची डोके जड आणि मोठे तसेच सरड्याप्रमाणे होते. तर दुसऱ्या गटातील डायनासोरला चेहऱ्यावर शिंग असे. पहिल्या गटातील डायनासोर ज्यावेळी इतर प्राण्यांशी टक्कर करण्याची वेळ येई. त्यावेळी त्यांच्या मेंदुचे रक्षण त्यांच्या जड आणि जाड डोक्यामुळे होत असे. शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी त्यांना त्याचा उपयोग होत असे. त्यांच्या भल्या मोठ्या डोक्याचे ओझे पेलण्यासाठी त्यांची मानही चांगली मजबूत असे. अगदी त्यांची शिकार करू शकणाऱ्या प्राण्यांनाही ते पळवून लावू शकत होते.

# पुणे फेस्टिव्हलमध्ये मराठी अस्मितेची जपणूक !

मोहन टिल्लू,
बालगंधर्व रंगमंदिर कार्यक्रम संयोजक, पुणे फेस्टिव्हल

सांस्कृतिक महोत्सवांमध्ये अग्रेसर म्हणून ओळखल्या गेलेल्या पुणे फेस्टिव्हलचे यंदाचे ३६वे वर्ष! पुणे फेस्टिव्हलच्या सर्व कार्यक्रमांना रसिक पुणेकरांनी अलोट प्रतिसाद दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या पुण्यभूमीत लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेतून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवकाळात मोठा सांस्कृतिक महोत्सव आयोजित करून नवे परिमाण देण्याचा प्रयत्न पुणे फेस्टिव्हलचे संस्थापक अध्यक्ष खा.सुरेश कलमाडी यांनी केला. त्याची सुरुवात ते महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे अध्यक्ष असताना १९८९ मध्ये त्यांनी केली.

राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलावंत पुण्यात आणावेत, देशी-परदेशी पर्यटकांना आकर्षित करावे आणि स्थानिक कलावंताना हक्काचे व्यासपीठ मिळवून द्यावे हा हेतू आयोजनामागे होता. आयोजनात प्रथमपासून पुणे फेस्टिव्हल कमिटी, नागरीक, महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन विभागाचे पर्यटन संचलनालय आणि भारत सरकारचा पर्यटन विभाग यांचा मोठा वाटा आहे. पुणे फेस्टिव्हलमध्ये सातत्याने दर्जेदार कार्यक्रम सादर होत असताना, मराठी कार्यक्रमांवरही जाणतेपणाने भर देण्यात आला. मराठी चित्रपट महोत्सव व मराठी नाट्य महोत्सव ही तर पहिल्या वर्षीच्या महोत्सवाची खास आकर्षणे होती. तब्बल १५ मराठी चित्रपट आणि १८ मराठी नाटके पहिल्या वर्षी महोत्सवात सादर झाली होती. आर्य चाणक्य, आयुष्याच्या वाटेवर, एक झुंज वाऱ्याशी, एकच प्याला, इथे ओशाळला मृत्यू, संगीत मानापमान, नातीगोती, रमले मी, रिमझिम गाणी, संगीत स्वयंवर, संगीत सौभद्र, तसे आम्ही सज्जन, तू फक्त हो म्हण, वाहतो ही दुर्वांची जुडी, वाडा चिरेबंदी, कालचक्र, झुलवा अशा दाखवण्यात आलेल्या मराठी नाटकांना पुणेकरांनी तोबा गर्दी केली होती. तसेच छत्रपती शिवाजी, धाकटी जाऊ, एक गाव बारा भानगडी, हा माझा मार्ग एकला, कन्यादान, कुमकुम, लग्न पाहावे करून, माझे बाळ, मोहित्यांची मंजुळा, पाहू रे किती वाट, रामशास्त्री, रंगल्या रात्री अशा, साधी माणसं, सरकारी पाहुणे, शेजारी असे तब्बल १५ मराठी चित्रपट पहिल्या वर्षी दाखवण्यात आले. पुणेकर रसिक प्रेक्षकांना ही जणू मेजवानीच होती. मराठीची ही परंपरा सलग ३६ वर्षे चालू आहे ही विशेष बाब मानावी लागेल. आत्तापर्यंत सादर झालेल्या मराठी कार्यक्रमांची जंत्री पाहिली की मन थक्क होते. स्व.पु.ल.देशपांडे आणि स्व.शांताबाई शेळके यांच्यावरील कार्यक्रम, मराठी हास्यकवी संमेलन, मराठी नाटके, एकपात्री मराठी हास्योत्सव, मराठी हास्यभूषण स्पर्धा, पुरूषोत्तम करंडक स्पर्धेतील विजेत्या तीन मराठी एकांकिकांचे प्रयोग, राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्या एकांकिकेचा प्रयोग, लावणी महोत्सव, मराठी भावगीते व मराठी चित्रपट गीतांचे कार्यक्रम, नाट्यगीते, प्रभात चित्रपटाच्या ७५ व्या वर्षानिमित्त विशेष कार्यक्रम, सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त गीतरामायण,गदिमा व बाबूजींची गाणी अशा अनेक मराठी कार्यक्रमांची पुणे फेस्टिव्हलमध्ये रेलचेल असते. पुणे फेस्टिवलमध्ये घेतलेल्या 'हास्यभूषण' स्पर्धेतून अनेक एकपात्री कलाकार तयार झाले. तसेच महाराष्ट्राची थोर परंपरा असणारा नारदीय कीर्तन महोत्सव आवर्जून सादर केला जातो. यातून आपल्या संस्कृतीशी असणारे नाते अधिक घट्ट केले जाते.

मराठमोळ्या लावणीला व्यासपीठ मिळवून देण्यातही पुणे फेस्टिव्हलचा पुढाकार राहिला. महाराष्ट्रातील नामवंत लावणी ग्रुपला प्रतिष्ठेच्या व्यासपीठावर आपली मराठमोळी कला सादर करण्याची संधी दिली जाते. मराठी कवी संमेलना'चे आयोजन करण्यात येते. ज्येष्ठ वात्रटीकाकार रामदास फुटाणे व फ.मुं. शिंदे यांचे सूत्रसंचालन, रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद यामुळे ही मराठी कवी संमेलने अनेकदा पहाटेपर्यंत रंगली. यामध्ये दरवर्षी एका ज्येष्ठ मराठी कवीचा होणारा सत्कार देखील मनाला हळवा करून जातो. यामध्ये शांता शेळके, नारायण सुर्वे, विं. दा. करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगांवकर, विठ्ठल वाघ, फ. मुं. शिंदे, ना. धों. महानोर, नारायण सुमंत, विष्णू सूर्या वाघ इत्यादींचे झालेले सत्कार आजही सर्वांच्या स्मरणात आहेत. प्रेक्षकांसाठी मोफत असणारा 'पुणे फेस्टिव्हल' हा रसिक पुणेकरांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. सन १९८९ मध्ये खा. सुरेश कलमाडींनी बघितलेले भव्य सांस्कृतिक महोत्सवाचे स्वप्न सलग ३६ वर्षे साकार होत राहिले. महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन विभागाच्या पर्यटन संचलनालयाचे मोठे योगदान पुणे फेस्टिव्हलला लाभले आहे. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष सुरेश कलमाडी असून उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल व मुख्य समन्वयक अॅड. अभय छाजेड आहेत. पुणे फेस्टिव्हल आंतरराष्ट्रीय कीर्तीचा बनला आहे. आपले 'पुणेरीपण' न सोडता मराठी कार्यक्रमांची रेलचेल करीत मराठी सारस्वताला सदैव मानाचा मुजरा आणि शुभेच्छा !

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# गुडघेदुखी आणि रशियन तंत्रज्ञान

■ डॉ. सुहास शहा
अस्थिरोगतज्ज्ञ,
संपर्क : ९३२२२३५०४२

मानवी शरीराचा ९० टक्के भार सांभाळणाऱ्या पायांमध्ये गुडघ्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शारीरिक रचनेमध्ये गुडघा असल्यामुळे आपल्याला चालणे, बसणे, वर चढणे, खाली उतरणे, गाडीवर बसणे यांसारख्या क्रिया करणे शक्य होते. अत्यंत सूक्ष्म तंतूंपासून बनलेले गुडघ्यातील अस्थिबंध हाडांच्या सांध्यांना जोडून ठेवण्याचे काम करतात. मांडी आणि पोटरीला जोडणाऱ्या गुडघ्यावर या तंतूंचे आवरण असते. गुडघ्याच्या खालील गादी हे शरीराचे वजन पेलते. त्यामुळे लिगामेंटची दुखापत ही गंभीर स्वरूपाच्या संधिवाताला कारण ठरते. अँटीरियर क्रूसिएट लिगामेंट (एसीएल), पोस्टरियर क्रूसिएट लिगामेंट(पीसीएल), मेडियल कोलॅटरल लिगामेंट (एमसीएल) , आणि लॅटरल कोलॅटरल लिगामेंट (एलसीएल) हे चार मुख्य अस्थिबंधन गुडघ्याला आधार देतात. या लिगामेंटना दुखापत झाल्यास गुडघ्याचे कार्य बाधित होते. सामान्यतः गुडघ्याला मार लागणे, मुरगाळणे, जॉईंट हायपरएक्स्टेन्शन यांसारख्या दुखापतींमुळे गुडघा क्षतिग्रस्त होऊ शकतो. यामध्ये सर्वाधिक इजा एसीएलला होते. हे लिगामेंट गुडघ्याच्या सांध्यांमध्ये असतात आणि नडगीच्या हाडाला (टिबिया) मांडीच्या हाडाच्या पुढे जाण्यापासून रोखतात. परिणामी, गुडघे स्थिर राहतात. दुखापतीमुळे अनेकदा याची दिशा बदलते. गुडघ्याला दुखापत झाल्यास आतील सांध्यांभोवती सूज येऊ शकते. फुटबॉल, बास्केटबॉल, सॉकर आणि स्कीईंग यांसारख्या क्रीडाप्रकारांमध्ये एसीएलला दुखापत होण्याचा धोका अधिक असतो. याखेरीज विविध अपघातांमध्ये गुडघ्याला इजा होण्याची शक्यता असते.

गुडघेदुखीचा त्रास सुरू झाला की अनेक जण पेनकिलरचा वापर करताना दिसतात. दुखापत



गंभीर असेल किंवा आतील हाड तुटले असल्यास ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला जातो. न जुळणारी हाडे, डायबेटिक न्युरोपॅथी यांसारख्या आजारांमध्ये गुडघा बाधित झाल्यास नी रिप्लेसमेंट सर्जरीसारखी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला जातो. वास्तविक पाहता, आज आधुनिक उपचारपद्धतीमुळे नैसर्गिक सांधा वाचवून गुडघेदुखीवर उपचार करता येतात.

खरे तर याला आधुनिक उपचारही म्हणता येणार नाहीत. कारण १९५० मध्ये प्रो. एलिझारोव्ह या रशियन सर्जननी गुडघ्यांच्या दुखापतींवरील ही उपचारप्रक्रिया विकसित केली होती. यामध्ये गुडघ्याच्या हाडाला एक फिक्सेटर लावून त्याला १५० किलोने वायरने टेन्शन दिले जाते. यामुळे रुग्णाला फ्रॅक्चर असले तरीही तो चालू शकतो. यामध्ये गुडघ्याच्या हाडावर छेद देऊन नैसर्गिकरित्या त्याची उंची वाढवता येऊ शकते. अशा पद्धतीने उंची वाढवण्यासाठी रशियन शस्त्रक्रिया ही एकमेव पद्धत आज उपलब्ध आहे. न जुळालेली हाडे, हाडांमध्ये इन्फेक्शन असेल किंवा पोलिओमुळे उंची कमी झालेली असेल किंवा सेरेब्रल पाल्सीसारख्या व्याधी, वाकडे हाड, वाकडे पाय यांसारख्या समस्यांवर ही उपचारपद्धत अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक ठरत आहे. इंटर्नल इम्प्लांट पद्धतीने उंची वाढवण्याचा भारतातील पहिला प्रयोग आम्ही २०१५ मध्ये केला होता. ऑस्ट्रेलियातील एका वकिलावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली होती.

गुडघेदुखीवर जॉईंट नी रिप्लेसमेंटमध्ये कृत्रिम सांधेरोपण केले जात असल्याने या कृत्रिम सांध्याच्या आधारे रुग्णांना आयुष्य व्यतीत करावे लागते. त्याऐवजी रशियन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नैसर्गिक गुडघा सदृढ करून तो कायम ठेवणे शक्य होते. यामध्ये गुडघा वाकडा असेल तर फिक्सेटरने तो सरळ केला जातो. परिणामी त्यातील दुखावा दूर होण्यास मदत होते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे फिक्सेटरच्या साहाय्याने वाकडे गुडघे असल्याने एका पायावर चालावे लागणाऱ्या रुग्णांना तीन ते चार दिवसांमध्ये दोन्ही पायांआधारे चालता येणे शक्य होते. गुडघ्यांची हालचालही पूर्ववत होते. म्हणजे रुग्णांना मांडी घालून बसणे, भारतीय पद्धतीने शौचास बसणे या सर्व क्रिया करता येतात. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, फिक्सेटर लावून गुडघे सरळ केल्यामुळे गुडघ्यांच्या आतमध्ये असणारे कार्टिलेज पूर्ववत होते. त्यामुळे कार्टिलेज एकदा खराब झाले की ते पुन्हा सुव्यस्थित होत नाही, हा गैरसमज लोकांनी दूर करणे गरजेचे आहे. तात्पर्य, गुडघ्याला दुखापत झाली, गुडघ्याचे हाड मोडले, गुडघ्यात पाणी झाले, वाटी सरकली अशा प्रकारच्या समस्या निर्माण झाल्यास घाबरून न जाता आणि नैसर्गिक गुडघा काढून टाकून कृत्रिम गुडघा जोडण्याचा निर्णय न घेता रशियन उपचारपद्धतीचा पर्याय अवलंबून पाहायला हवा. ◆◆◆

# स्मृतीतल्लखतेत स्त्रियाच भारी!

स्त्री व पुरुष यांच्या मेंदूतील जैविक मंडलांची (सर्किटसच वेळी (मल्टिटास्किंग) करू शकत नाहीत. तुलनेने स्त्रियांची स्मृती जास्त तल्लख असते, त्यांची सामाजिक कौशल्ये पुरुषांच्या तुलनेत जास्त असतात, असे एका संशोधनात आढळून आलेले आहे. या संशोधनात पेनसिल्वानिया विद्यापीठाच्या पेरेलमान स्कूल ऑफ मेडिसिन या संस्थेतील रेडिओलॉजी विभागाच्या सहायक प्राध्यापक रागिणी वर्मा यांचा मोठा सहभाग आहे.



रागिणी वर्मा यांनी म्हटले आहे, की स्त्री व पुरुषांमध्ये मेंदूतील मंडलांची जोडणी म्हणजे कनेक्टोम्स कशा प्रकारची असतात, याचा अभ्यास एवढा विस्तृत प्रमाणात प्रथमच करण्यात आला आहे. वर्मा व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या संशोधनात असे दिसून आले, की मेंदूच्या पुढच्या भागापासून मागच्या भागापर्यंतची न्यूरॉनची जोडणी ही मोठी एकाच अर्धगोलार्धात अशा प्रकारे पुढून मागे झालेली असते. याचा अर्थ आकलन व समन्वयीत कृती यासाठी पुरुषाच्या मेंदूतील मंडलांची जोडणी योग्य प्रकारे झालेली असते.

स्त्रियांमध्ये ही जोडणी डाव्या व उजव्या अर्धगोलार्धात झालेली असते. त्यामुळे त्यांच्यात आंतरप्रेरणा, विश्लेषणात्मक क्षमता यांच्यातील समन्वय चांगला असतो. स्त्री व पुरुषांच्या मेंदूचे नकाशे खूप फरक दाखवणारे आहेत व पूरकही आहेत. मानवी मेंदूच्या रचनेचा अभ्यास केल्याने काही कामे पुरुष चांगली करतात तर काही कामे स्त्रिया चांगले करतात, हे नेमके कसे घडते यावर प्रकाश पडला आहे, असे वर्मा यांनी सांगितले. त्या दिल्ली आयआयटीच्या विद्यार्थिनी होत्या व त्यांनी संगणक दृष्टी व गणित यात डॉक्टरेट केलेली आहे. या अभ्यासात वर्मा व त्यांच्या सहकाऱ्यांनी मानवी मेंदूतील लिंगविशिष्ट भेदांचे निरीक्षण केले. त्यात आठ ते बावीस वयोगटातील ५२१ स्त्रिया व ४२८ पुरुष यांच्या मेंदूचा अभ्यास डिफ्युजन टेन्सर इमेजिंग तंत्राने (डीटीआय) करण्यात आला.

डीटीआय हे पाण्यावर आधारित प्रतिमा तंत्र असून त्यात मेंदूच्या सर्व भागातील धाग्यांची जोडणी दिसते व संपूर्ण मेंदूची यंत्रणा मानले जाणाऱ्या कनेक्टोमचीही रचनाही दिसून येते. स्त्रियांमध्ये सुप्राटेनटोरियल भागात जोडणी जास्त प्रमाणात दिसून येते व त्यात सेरेब्रम हा भागही समाविष्ट होतो. मेंदूच्या डाव्या व उजव्या अर्धगोलार्धाच्या दरम्यान असलेला हा सर्वात मोठा भाग असतो.

पुरुषांमध्ये प्रत्येक अर्धगोलार्धात मंडलांची जोडणी मोठ्या प्रमाणात असते. याउलट सेरेबेलम या मेंदूच्या स्नायू नियंत्रण करणाऱ्या भागात पुरुषांच्या मेंदूतील आंतर अर्धगोलार्धातील जोडणी ही जास्त प्रमाणात दिसून येते व स्त्रियांमध्ये मेंदूच्या अर्धगोलार्धातील अंतर्गत जोडणी जास्त प्रमाणात दिसून येते. या जोडण्यातील फरकामुळे पुरुषांमध्ये अधिक समन्वयित कृती करण्याची क्षमता येते. कारण मेंदूच्या पुढच्या भागात होणारी कृती व मागच्या भागात होणारे आकलन यांची जोडणी सेरेबेलम व कॉर्टेक्स यांत्या दरम्यान व्यवस्थित होते असे त्यांचे म्हणणे आहे. 'प्रोसिडिंग ऑफ नॅशनल ॲकडॅमी ऑफ सायन्सेस' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. ◆◆◆

# 'ग्रीन टी'लावा, डास पळवा!

डास नावाचा उपद्रवी कीटक निसर्गाने का बनवला असावा, याचे आपल्याला नेहमीच कोडे पडते. झोपल्यावर सतत कानाजवळ येऊन कर्कश 'गुंई गुंर्ट' आवाज करून झोपमोड करणाऱ्या, चावून बेजार करणाऱ्या आणि चावल्यावर मलेरियासारख्या अनेक आजारांच्या रोगजंतूंचा फैलाव करणाऱ्या डासांपासून कशी सुटका करवून घेता येईल याबाबत सातत्याने संशोधन सुरू असते. डासांपासून मुक्ती मिळवण्यासाठी काशी हिंदू विद्यापीठातील आयुर्वेद विभागाच्या प्रमुखांनी एक कमी खर्चिक व सोपा उपाय शोधून काढलेला आहे. त्यांच्या मते ग्रीन टी ची रोपे लावल्याने डास पळून जातात.



आयुर्वेद विभागाचे प्रमुख के. एन. द्विवेदी यांनी 'ग्रीन टी'च्या रोपांवर संशोधन केल्यानंतर असा दावा केला होता की, 'ग्रीन टी'मुळे अतिशय घातक अशा डासांच्या प्रजातींपासूनही संरक्षण होते. या वनस्पतीच्या वासामुळे डास पळून जातात. ग्रीन टी ही वनस्पती जुन्या काळापासून अस्तित्वात असून ती खेडोपाड्यात सहज उपलब्ध आहे. या वनस्पतीचे विविध उपयोग मात्र लोकांना माहीत नाहीत. ज्या घराभोवती 'ग्रीन टी'च्या वनस्पतींची लागवड आहे तेथे डास अजिबात फिरकत नाहीत, असा दावा द्विवेदी यांनी केलेला आहे. 'ग्रीन टी'चा वास हा लिंबासारखा असतो. त्यामुळे मधमाशा व डास दोन्ही घराजवळ येत नाहीत. ही डासांना पळवण्याच्या वनौषधींवर आधारित पद्धत अतिशय स्वस्त अशी आहे. सध्या डासांना मारण्यासाठी जी औषधे उपलब्ध आहेत त्या बहुतांश औषधांमध्ये या वनस्पतीचा रस वापरलेला असतो. जर या वनस्पतीची पाने कुटून अंगाला लावली तर एकही डास तुमच्याकडे फिरकत नाही, असे द्विवेदी यांनी सांगितले. या वनस्पतीला आयुर्वेदात क्रित्रण म्हटले जाते व त्याचे शास्त्रीय नाव सिंबोपोगन स्कुलताश असे आहे. ◆◆◆



**आपल्या देशात अनेक अनोखी गणेश मंदिरे आहेत; मात्र छत्तीसगडमधील दंतेवाडापासून ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या ढोलकल पर्वतावर एक अनोखे गणेश मंदिर आहे. खरे तर हे मंदिर बंदिस्त नसून तिथे तब्बल तीन हजार फूट उंच पर्वतशिखरावर उघड्यावरच विराजमान असलेले गणपतीबाप्पा आहेत. एकदंत गणपतीची एक पुरातन मूर्ती याठिकाणी स्थापन आहे. ही मूर्ती अतिशय दुर्लभ आहे. ती किमान एक हजार वर्षे जुनी असल्याचे म्हटले जाते.**

या गणपतीबाबत प्रचलित एका दंतकथेनुसार या पर्वतावरच परशुराम आणि गणपतीमध्ये एक युद्ध झाले होते. यात परशुराम यांचे आयुध 'परशु'च्या वाराने गणपतीचा एक दात तुटला होता आणि त्यानंतरच गणपतीला 'एकदंत' हे नाव प्राप्त झाले, असे म्हणतात. ढोलसारखी आकृती असल्याने या पहाडाला 'ढोलकल' असे नाव पडले. या पर्वताच्या नावावरूनच या गणपतीला 'ढोलकल गणेश' असेही संबोधले जाते. या मूर्तीला चार हात असून उजव्या हातात परशु, डाव्या हातात तुटलेला एक दात तर अन्य एका हातात अक्षरमाळा आणि मोदक आहेत. विशेष म्हणजे बाप्पांची ही मूर्ती आयुध रूपातील असून बाप्पा येथे ललितासन मुद्रेत बसलेले आहेत. बाप्पांची अशा प्रकारची मूर्ती अन्यत्र कुठेही पहायला मिळालेली नाही.

या मूर्तीची स्थापना ११ व्या शतकात छिंदक नागवंशी राजांनी दंतेवाडा क्षेत्राच्या रक्षक स्वरूपात ढोलकल पहाडावर केली होती. नागवंशी राजांनी या गणपतीच्या मूर्तीची निर्मिती करून त्यावर नाग अंकित केला आहे. मूर्तीच्या संतुलनासाठी शिल्पकारांनी त्यावर साखळीचा उपयोग केला आहे. दक्षिण बस्तरच्या भोगा आदिवासी समाज आपली उत्पत्ती 'ढोलकट्टा' ढोलकलच्या महिला पुजारीपासून झाल्याचे मानतात. सर्वात आधी भोगा जनजातीच्या महिलेनेच येथे पूजा सुरू केली, असे मानले जाते. पहाटेच्या वेळी या महिला पुजारीच्या शंखनादाने संपूर्ण ढोलकल पर्वत शिखर गुंजायचे, असे सांगितले जाते. आजदेखील या महिला पुजारीचे वंशज या ढोलकल गणपतीची पूजा करतात. या गणपतीची मूर्ती ही येथील इंद्रावती नदीच्या खोऱ्यातील शिळेपासून तयार करण्यात आली आहे.

बैलाडील पर्वत रांगेचे हे सर्वात उंच शिखर आहे. ११ व्या शतकातही इतक्या समृद्ध पद्धतीने मूर्तीची रचना केली जात असल्याचे या मूर्तीवरून स्पष्ट होते. दरवर्षी या पर्वताखाली असलेल्या फरसपाल या गावात ३ दिवसीय जत्रेचे आयोजन केले जाते. या दरम्यान परशुराम, ढोलकल गणपतीसह येथील स्थानिक देवी देवतांची पूजा केली जाते. ढोलकल पर्वतावरील या गणपतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या पुरातन गणपतीच्या मूर्तीवर कुठल्याही प्रकारचे छत किंवा शिखर नाही. या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी जवळपास अडीच तासांचा प्रवास करून उंच डोंगराची चढण चढावी लागते. ◆◆◆

# सांधेदुखीवर प्रभावी तेलचिकित्सा

**कडक उन्हाळ्यामुळे घामाच्या धारा लागून अस्वस्थ झालेल्या मनाला पावसाळा हा ऋतू नैसर्गिक गारवा देणारा ठरतो. पण पावसाळा आणि हिवाळा हे दोन ऋतू सांधेदुखीचा त्रास असणाऱ्यांसाठी काहीसे त्रासदायक ठरतात असे दिसून आले आहे. सध्या महाराष्ट्रात वाढीस लागलेल्या चिकनगुनिया या विषाजन्य आजारामध्येही हाडाचे सांधे दुखण्याची समस्या जाणवते. सांध्यांमधील वेदनांमुळे रुग्णाला प्रचंड त्रास सोसावा लागतो.**

■ डॉ. सुरेश मिर्जापूर
बीएएमएस, नागपूर,
संपर्क : ९३७३११९२९२

आयुर्वेदानुसार, सांधेदुखीसाठी कारणीभूत ठरणा-या आजारामध्ये आमवाताचा क्रमांक बराच वरचा लागतो. एका पाहणीनुसार, आजघडीला जगातील सुमारे एक ते दीड टक्के लोक या आजाराने ग्रस्त आहेत. यामध्ये छोट्या व मोठ्या सांध्याच्या ठिकाणी सूज व वेदना हे प्रमुख लक्षण असते. सांधेदुखीतील वेदना इतक्या तीव्र स्वरूपाच्या असतात की, हालचाल करणेही कठीण होऊन जाते. विशेषत: सकाळी उठल्यावर एक–दोन तास सांधे आखडणे हे प्रमुख लक्षण यामध्ये दिसून येते. काही रुग्णांमध्ये सांध्याच्या जवळ गाठी निर्माण होतात. यामुळे रुग्णांची संपूर्ण दिनचर्याच कोलमडून जाते. त्याचे पुन्हा मनारोग्यावर होणारे परिणाम वेगळेच असतात.

अशा वेळी बहुतांश जण सुरुवातीच्या टप्प्यात किंवा प्राथमिक अवस्थेमध्ये औषधविक्रेत्यांकडून वेदनाशामक गोळी किंवा पेनकिलर घेऊन आपले काम सुरू ठेवतात. परंतु दीर्घकाळ अशा गोळ्यांच्या सेवनामुळे आरोग्यावर विपरित परिणाम होऊन त्यातून नव्या समस्या उद्भवतात. सबब अशा गोळ्यांच्या दुष्टचक्रात चुकूनही अडकता कामा नये. विशेषतः साठी ओलांडलेल्या




व्यक्तींनी वारंवार पेनकिलर घेणे कटाक्षाने टाळावे.

ॲलोपॅथी उपचारांमध्ये सांधेदुखी, संधीवात यांना आर्थ्रायटिस मानून उपचार केले जातात. सांध्यांमध्ये कार्टिलेज नावाचा घटक असतो. या कार्टिलेजमुळे सांध्यांची हालचाल योग्यरीत्या होत असते. कोणत्याही कारणास्तव कार्टिलेजची झीज झाली असता सांधेदुखी वाढते व या वेदना असह्य होतात. सांध्यांमधील हाडे एकमेकांना घासली जातात त्यामुळे गुडघ्यामध्ये सूज येऊ लागते. या स्थितीला सांधेदुखी किंवा ऑस्टिओआर्थरायटिस असे म्हटले जाते.

वास्तविक, आपल्याकडील आयुर्वेदिक उपचार पद्धती आणि त्यातील औषधी तेलाच्या साहाय्याने मालीश करणे यामुळे सांधेदुखी, संधीवात या समस्येने ग्रस्त असणाऱ्यांना आराम मिळतो असे दिसून आले आहे. वनौषधींनी युक्त तेलाने केलेल्या मालिशमुळे आखडलेल्या स्नायूंना ऊर्जा मिळते. तेथील रक्ताभिसरणाची प्रक्रिया सुरळित होऊन स्नायू लवचिक होतात. त्याचबरोबर सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या स्नायूंना बळकटी मिळते.

सामान्यतः यामध्ये चार प्रमुख तेलांचा वापर प्रभावी ठरतो, असे आयुर्वेद सांगते. त्यापैकी एक म्हणजे महानारायण तेल. हे तेल बिल्व, अश्वगंधा, बृहती, बाला, स्वदमराष्ट्र, क्षुद्र, अतिबाला, तैला, शतावरी, रसना, मिशी, कुष्ट, हरिद्रा, अशा विविध वनौषधींनी बनवले जाते. महानारायण तेलाच्या नियमित मसाजाने हाडांचे दुखणे, सांधेदुखी, संधीवात, हात–पाय कंप पावणे, हाता–पायांची बोटे आखडणे, पिंड्यांचे स्नायू आखडणे यांसारख्या समस्या दूर होण्यास मदत होते. त्याचबरोबर स्नायू व हाडांच्या बळकटीसाठीही त्याचा प्रभावी उपयोग होतो. महाविषगर्भा तेलाच्या मसाजाने सांध्यांना आलेली सूज, गुडघ्यांची हालचाल करताना येणारा आवाज यांसह सांध्यांमधील वेदना कमी होण्यास मदत होते. प्रसारिणी तेलाद्वारे नियमित मसाज केल्यास स्नायू आखडण्याची जुनाट समस्याही दूर होते. तसेच हाडांची झीज भरून येण्यासही मदत होते. महामाश तेलाच्या मसाजामुळे सर्व्हायकल स्पॉंडिलोसिसह संधीवात, अर्धांगवायू यांसारख्या व्याधींमध्येही चांगले परिणाम दिसून येतात. या पाचही तेलांचे मिश्रण असणारे पेनेक्सील तेलही यामध्ये प्रभावी ठरते.

आयुर्वेदिक तेलांनी मसाजामुळे सांध्यांमधील वेदना कमी होण्याबरोबरच एकूणच शरीरातील रक्ताभिसरण वाढल्यामुळे उत्साही वाटते. झोप चांगली लागते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे



याचे कोणतेही दुष्परिणाम शरीरावर होत नाहीत. त्यामुळे पावसाळा आणि थंडीच्या ऋतूमध्ये संधीवात किंवा सांधेदुखीचा त्रास असणाऱ्या रुग्णांसाठी, तसेच चिकनगुनियातील सांधेदुखीपासून सुटका मिळवण्यासाठी ही तेलमसाजाची थेरपी निश्चितच दिलासादायक ठरू शकते. ◆◆◆

## आकाशचिन्ह विभागाची डोकेदुखी वाढली

# शहरात रात्रीतून लागतात बेकायदा फ्लेक्स

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात रात्रीतून अनधिकृत फ्लेक्स लावणाऱ्या टोळ्यांची संख्या वाढली आहे. या टोळ्या जाहिरातदारांकडून पैसे घेऊन रात्रीत शेकडो अनधिकृत फ्लेक्स, बोर्ड आणि कोऑक्स रस्त्यांवर तसेच चौकांमध्ये लावत आहेत. त्यामुळे या टोळ्या आकाशचिन्ह विभागाला मोठी डोकेदुखी ठरत आहेत. विविध रस्त्यांवरील, चौकांतील अनधिकृत फ्लेक्स काढण्याची मोहीम महापालिकेच्या आकाशचिन्ह आणि परवाना विभागाने हाती घेतली असून गेल्या तीन महिन्यांत तब्बल ४२ हजार अनधिकृत फ्लेक्स, बोर्ड आणि केऑक्स काढले आहेत.

शहरातील रस्त्यांवर फ्लेक्स, बोर्ड, केऑक्स लावायचे असतील, तर महापालिकेची परवानगी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी महापालिकेचा आकाशचिन्ह आणि परवाना विभाग कार्यरत आहे. मात्र, महापालिकेची परवानगी न घेताच अनेक व्यावसायिक व्यवसायाची जाहिरात करतात. त्यासाठी हे लोक रस्त्यांवर, महावितरणचे खांब, मेट्रोचे खांब यावर अनधिकृतरित्या फ्लेक्स, बोर्ड तसेच केऑक्स लावतात. या मुळे शहराचे मोठ्या प्रमाणात विद्रुपीकरण होते.

शहरातील वाढत्या अनधिकृत फ्लेक्सची संख्या पाहता आकाशचिन्ह आणि परवाना विभागाने हे फ्लेक्स हटविण्याची मोहीम हाती घेतली होती. त्यानुसार गेल्या तीन महिन्यांत तब्बल ४२ हजार फ्लेक्स आणि केऑक्स काढले होते. मात्र, शहरात अनधिकृत फ्लेक्स लावून देण्याऱ्या टोळ्या वाढल्या आहेत. या टोळ्या रात्रीत विविध रस्त्यांवर जाहिरातदारांचे शेकडो फ्लेक्स आणि केऑक्स लावत असल्याचे निदर्शनात आले आहे. त्यामुळे कारवाई केलेल्या रस्त्यांवरही कारवाईनंतर लगेचच अनधिकृत फ्लेक्स दिसून येत आहेत.



### जाहिरातदारांवर गुन्हा

● अनेक जाहिरातदार काही ठरावीक लोकांना रस्त्यांवर, चौकात फ्लेक्स लावण्याचे काम देतात. यासाठी त्यांच्यात मोठा आर्थिक व्यवहार होतो. हे लोक रात्रीत संबंधित जाहिरातदारांचे शेकडो फ्लेक्स आणि केऑक्स रस्त्यांवर लावतात. यामुळे शहरातील रस्त्यांचे विद्रुपीकरण होते. तसेच आकाशचिन्ह विभागाला आपले मनुष्यबळ खर्ची करून अनधिकृत फ्लेक्स काढावे लागतात. त्यामुळे विभागाने कडक धोरण अवलंबिण्याचा निर्णय घेतला असून या पुढे जो जाहिरातदार अनधिकृत जाहिरात लावेल त्यावर थेट फौजदारी गुन्हा दाखल करणार आहे.

“ शहरातील अनधिकृत फ्लेक्स आणि केऑक्स काढण्याची मोहीम सुरू आहे. मात्र, काही लोक एका रात्रीतून जाहिरातदारांचे शेकडो फ्लेक्स रस्त्यावर लावत आहेत. हे लोक कोण आहेत, याचा शोध सुरू आहे. तसेच ज्या जाहिरातदारांची अनधिकृत जाहिरात दिसेल त्यांच्यावर दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

— **संदीप खोत,** उपायुक्त, आकाशचिन्ह आणि परवाना विभाग)

## भटक्या श्वानाचा चिमुकलीवर हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील मोशी येथे लोकवस्तीत भटक्या कुत्र्याच्या टोळक्यांनी थेट चिमुकल्या मुलीवर चावा घेत प्राणघातक हल्ला केला आहे. या हल्ल्यात चिमुकली मुलगी जखमी झाली आहे. शहरात अशा शेकडो घटना रोज घडतात आणि नागरिक वारंवार तक्रार करतात मात्र प्रशासन डोळेझाक करते. निव्वळ निर्बिजीकरण करून पुन्हा त्या कुत्र्यांना रस्त्यावर सोडायचे हा आता पालिकेचा धंदा झालाय, अशी टीका नागरिक करत आहेत.

मोशी येथील क्रिस्टल सोसायटी परिसरात प्रिया विष्णू पाटील ही चिमुकली मुलगी रस्ता क्रॉस करत असताना अचानक आलेल्या भटक्या कुत्र्यांच्या टोळक्यांनी प्रिया पाटील या चिमुकल्या मुलीवर हल्ला केला, या हल्ल्यात चिमुकली मुलगी जखमी झाली असून यावेळी स्थानिकांनी प्रसंगावधान राखल्याने चिमुकलीचा जीव थोडक्यात बचावला. कुत्र्यांची टोळी चिमुकल्यांवर थेट हल्ला करत असल्याने स्थानिक नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

## » Selected



## ईद-ए-मिलाद निमित्त पिंपरीतील वाहतुकीत बदल

**पिंपरी :** जरत मोहम्मद पैगंबर जयंती (ईद-ए-मिलाद) निमित्त पिंपरी येथे गुरुवारी (दि. १९) मिरवणूक काढली जाणार आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात प्रवचनाचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी शहराच्या विविध भागातून मुस्लिम बांधव एकत्र येणार आहेत.कार्यक्रमासाठी मोठी गर्दी होणार असल्याने पिंपरी परिसरातील वाहतूक गुरुवारी दुपारी दोन ते मध्यरात्री बारा वाजेपर्यंत वळविण्यात आली आहे. याबाबतचे आदेश पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी दिले आहेत.

## भोसरीत बैलगाडा शर्यतीचा थरार

**भोसरी :** श्री गणेश उत्सवानिमित्त पुणे जिल्हा बैलगाडा प्रतिष्ठानद्वारे भोसरीतील गावजत्रा मैदानात सहा दिवस घेण्यात आलेल्या बैलगाडा शर्यतीत सहा दिवसांतील घाटाचा राजाचा मान रामनाथ वारंगे आणि अप्पा वायकर यांच्या बैलगाडा जोड्यांनी सर्वात कमी वेळ नोंदवत मिळविला.



दरम्यान, सहा दिवसातील विजेत्या बैलगाड्या जोड्यांना सुमारे दहा लाख रुपयांची बक्षीसे देण्यात आली. यावेळी आमदार महेश लांडगे, माजी नगरसेवक अजित गव्हाणे, रवी लांडगे, सागर गवळी, पुणे जिल्हा बैलगाडा मालक प्रतिष्ठानचे अध्यक्ष भानुदास लांडगे, उपाध्यक्ष तुकाराम गवळी, बाळासाहेब लांडगे, लघुउद्योजक विराज लांडे आदींनी नागरिकांना गणेश उत्सव व बैलगाडा शर्यतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी लघुउद्योजक विजय भोसले, किरण भोसले, समीर जाधव, हिरामण लांडगे, केरू काकडे, सोनू काकडे, मल्हार वर्पे, आतिश बारणे, अंकुश मळेकर, हिरामण आल्हाट आदी उपस्थित होते.

## २१ महिलांना धान्य किटचे वाटप



**पिंपरी :** पुणे लायन क्लब निगडी कार्यालयात स्वर्गीय हरिदास नायर यांच्या जन्म तिथी निमित्त घरकाम करणाऱ्या व आर्थिक दुर्बल २१ महिलांना धान्याचे किट वाटण्यात आलेया कार्यक्रमासाठी लायन चंद्रशेखर पवार यांनी पुढाकार घेतला हा कार्यक्रम क्लब च्या अध्यक्षा लायन सौ मनीषा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडला

सदरच्या कार्यक्रमाची सुरुवात स्वर्गीय हरिदास नायर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व श्रद्धांजली वाहून करण्यात करण्यात आली

या सेवाभावी कार्यक्रमास लायन रश्मी नायर, वृषाली सुरवडे ,भाग्यश्री पवार, सलीम शिकलगार, प्रशांत कुलकर्णी ,हर्ष नायर, शितल पवार मनोज देशमुख ,रामकृष्ण मंत्री , जयश्री मांडे,नसीम शिकलगार ,शिवकन्या मुसमाडे यांची उपस्थिती होती.

## शहरात पिस्तुलची विक्री करणाऱ्या गुन्हेगारास अटक



**पिंपरी :** मध्यप्रदेश मधून पिस्तूल आणून त्याची पिंपरी चिंचवड शहरात विक्री करणाऱ्या टोळीचा पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने पर्दाफाश केला. पोलिसांनी पाच जणांना अटक करत त्यांच्याकडून सात पिस्तूल आणि १४ जिवंत काडतुसे जप्त केली आहेत.

प्रदिप ऊर्फ अक्षय बाळासाहेब ढगे (वय २८, रा. आपटी, ता. शिरूर, जि. पुणे), सुरज अशोक शिवले (वय २४, रा. आपटी, ता. शिरूर, जि. पुणे), नवल विरसिंग झामरे (वय २३, रा. पेरणे फाटा, ता. शिरूर, जि. पुणे. मूळ रा बुऱ्हाणपूर, मध्यप्रदेश), कमलेश ऊर्फ डॅनी कानडे (वय २९, रा. भारतमाता चौक, मोशी, पुणे), पवन दत्तात्रय शेजवळ (वय ३५, रा. नारायणगाव, पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई करत तिघांना अटक केली. त्यांच्याकडून सुरुवातीला तीन पिस्तूल, सात जिवंत काडतुसे, दोन मॅक्झिन जप्त करण्यात आली.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## पवनमावळात भातशेतीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव

**मावळ :** पवनमावळात भातशेतीवर करपा, कडा करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे दिसून येत आहे. याबाबत कृषी विभागाकडून बाधित गावात क्षेत्रीय भेटीद्वारे शास्त्रज्ञ, मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक यांच्याकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जात आहे.

मावळ तालुका हा पुणे जिल्ह्यातील पश्चिमेचे टोक असून हा तालुका कोकणपट्टीचा तालुका आहे. यामुळे मावळ तालुका हा भातशेती आगार म्हणून या तालुक्याला ओळखले जाते. पवनमावळ भाग हा इंद्रायणी तांदळासाठी सर्वदूर प्रसिद्ध आहे. तर या तालुक्यात मोठ्या प्रमाणात भात पिकाची लागवड केली जाते. तालुक्यामध्ये १२ हजार ५००हेक्टरवर भातशेती असून, यामध्ये इंद्रायणी वाणाची ९० टक्के लागवड केली जाते. तर इतर जातींची १०टक्के लागवड केली जाते.

सद्यस्थितीला पवनमावळात करपा व कडा करपा रोगाचा प्रादूर्भाव दिसून आल्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. भात पिकावर रोगाचा प्रादूर्भाव वाढल्यामुळे भातपिकाच्या उत्पादनात घट होईल? या चिंतेत शेतकरी आहेत. करपा रोगाचा प्रादूर्भाव पवनमावळसह तालुक्यामध्ये दिसू लागला आहे. तर रोग नियंत्रणासाठी पवनमावळातील कडधे येथे भात पीक प्रकल्प अंतर्गत, येळसे, कोथुर्णे, काले या गावांत कृषी विभागाचे क्षेत्रीय अधिकारी व भात संशोधन केंद्राचे भात शास्त्रज्ञ डॉ. किरणसिंह सूर्यवंशी यांच्यासह मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक काळेकॉलनी नागनाथ शिंदे, कृषी सहाय्यक विकास गोसावी, शीतल गिरी, ओंकार लोखंडे क्षेत्रीय भेटीवेळी उपस्थित होते. ज्याठिकाणी प्रशिक्षण, शेतीशाळा घेतल्या जात आहेत, त्यामध्येही मार्गदर्शन केले जात आहे. प्रत्यक्ष शेतावर जाऊन कोणती औषध फवारणी करावी? याची माहिती देण्यात येत आहे.



## गणपती बाप्पा मोरया...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**चिंचवड :** आलम फत्तुभाई मुलाणी या मुस्लिम भक्ताच्या घरी गेल्या १० वर्षांपसून गणपतीची स्थापना करण्यात येत आहे.

### गेल्या २० वर्षांपासून फत्तुभाई मुलाणी करतात चतुर्थी

# मुस्लिम कुटुंबाच्या घरी गणरायाची स्थापना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** गणराया म्हणजे मांगल्याचे प्रतिक...ते जिथे विराजमान होतात तिथे विघ्न आपोआप नाहीशी होतात. असाच काहीसा अनुभव बाप्पांनी त्यांच्या निस्सीम भक्त असणाऱ्या आलम मुलाणी यांना दिला आहे. यावेळी ना जात आडवी आली ना धर्म... केवळ भक्ती टिकून राहिली. त्याच भक्तीतून आलम फत्तुभाई मुलाणी हे १० वर्ष त्यांच्या घरात गणपतीची स्थापना करत आहेत.

मुलाणी हे सध्या चिंचवड येथे राहत असेल तरी मुळचे मावळ येथील उर्से गावचे रहिवासी आहेत. बालपण खेडेगावात गेल्याने सर्व धर्माचे सण खेळीमेळीने करण्याचे संस्कार त्यांच्यावर झाले होते. गावात शिवजयंती व गणेश उत्सवात हिरीरीने सहभागी व्हायचे. या काळात त्यांना गणपती विषयीचे आकर्षण निर्माण झाले. पुढे शिक्षण झाले..आंतरजातीय प्रेमविवाह केला... करीयर म्हणून व्यवसायात पदार्पण केले. या सर्व त्यांच्या प्रवासात त्यांना अनेक अडचणी आल्या. यावेळी आशेचा किरण म्हणून त्यांनी गणरायाचा धावा केला अन् बाप्पा देखील प्रत्येकवेळी त्यांच्या हाकेला धावून आले. याच अनुभवातून त्यांनी २० वर्षापासून चतुर्थी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे अगदी हवं तसे यश त्यांना मिळत गेले. पुढे चिंचवडला स्थायीक झालेले मुलाणी कुटुंब घरी दरवर्षी आवडीने गणपतीची स्थापना करू लागले.

### निकृष्ठ दर्जा आढळल्यास ठेकेदाराकडून पैसे वसूल

# सिंथेटिक ट्रॅक प्रकरणाची त्रयस्थ संस्थेमार्फत चौकशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भोसरी, इंद्रायणीनगर येथील संत ज्ञानेश्वर महाराज क्रीडा संकुलात चार कोटी रुपये खर्च करून नव्याने तयार केलेला सिंथेटिक ट्रॅक पुन्हा उखडला आहे. या मैदानावर पोलीस भरती घेण्यात आली होती. धावमार्गावर विशिष्ट बूट घालून गेले पाहिजे. ठेकेदाराला पाठिशी घातले जाणार नाही. त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी केली जाईल. तपासणीत त्रुटी, कामाचा निकृष्ट दर्जा आढळल्यास ठेकेदाराकडून पैसे वसूल केले जातील. ठेकेदाराची अनामत रक्कम महापालिकेकडे आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.



मात्र, वारंवार नादुरुस्त होणाऱ्या ट्रॅकमुळे खेळाडूंना अडचणींचा सामना करावा लागत आहे. सरावाअभावी खेळाडूंच्या कामगिरीवरही परिणाम झाला आहे. ट्रॅकच्या कामाच्या दर्जाबाबत प्रश्न निर्माण झाला असून चार कोटींचा खर्च पाण्यात जाण्याची शक्यता आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील अॅथलेटिक्सचा सराव करणाऱ्या खेळाडूंना सरावासाठी इंद्रायणीनगरमधील एकमेव मैदान आहे. या ठिकाणी चारशे मीटरचा आठ लेनचा कृत्रिम धावमार्ग आहे. अनेक वर्षांपासून धावमार्गावर खेळाडूंचा नियमित सराव आणि विविध स्पर्धांमुळे, तसेच बाहेरील वातावरणामुळे जुना धावमार्ग खराब झाला होता. वर्षभरापूर्वी जुना धावमार्ग बदलण्याचे काम हाती घेण्यात आले होते. महापालिकेने चार कोटी रुपये खर्च करून हा नवीन धावमार्ग उभारला. १५ मार्च २०२४ रोजी एक वर्षानंतर खेळाडूंसाठी हा धावमार्ग खुला करण्यात आला. धावमार्गावर अॅथलेटिक्स खेळाडू सराव करत असताना अवघ्या पाचच दिवसांत हा मार्ग उखडला होता. त्यामुळे दुरुस्तीसाठी हा धावमार्ग बंद करण्याची नामुष्की महापालिकेवर आली होती. जून महिन्यात या मैदानावर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या शिपाई पदाच्या पोलीस भरतीसाठी उमेदवारांची निवड क्षमता चाचणी घेण्यात आली. त्यानंतर हा धावमार्ग पूर्णपणे उखडला असून जागोजोगी खड्डे पडले आहेत. त्यामुळे या धावमार्गावर सराव करताना अॅथलेटिक्स खेळाडूंना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

२१, २२ सप्टेंबरला बालेवाडी मैदानात राज्यस्तरीय अॅथलेटिक्स खेळाडू निवड स्पर्धा होणार आहे. आता दुरुस्तीच्या नावावर पुन्हा ट्रॅक बंद केल्यास सरावाअभावी राज्यस्तरीय निवड चाचणीत मागे पडण्याची भीती काही खेळाडूंनी बोलून दाखविली.

## भोसरीत गणेश विसर्जनाची जय्यत तयारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** भोसरीतील गणपती विसर्जन आज सोमवारी (ता. १६) होणार आहे. महापालिकेद्वारे गणेश मंडळाच्या स्वागतासाठी पीएमटी चौकातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ स्वागत मंडप उभारण्याचे काम रविवारी (ता. १५) युद्धपातळीवर सुरू होते. श्री गणेशाच्या विसर्जनासाठी भोसरीतील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहाजवळ तीन हौदही तयार करण्यात आले आहेत.

भोसरी ग्रामस्थांना पुण्यातील गणपती विसर्जन मिरवणूक पाहता यावी, यासाठी भोसरीतील गणपतींचे विसर्जन अनंत चतुर्थीच्या एक दिवस अगोदर करण्याची परंपरा पूर्वीपासून आहे. त्यामुळे भोसरीतील गणपतींचे विसर्जन आज होणार आहे. महापालिकेद्वारे गणेश मंडळांच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली आहे. यासाठी पीएमटी चौकातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ ३६ फूट लांब, १६ फूट रुंद तर १६ फूट उंचीचा स्वागत मंडप तयार करण्यात येत आहे.

स्वागत कक्षाजवळ पोलिस नियंत्रण कक्षही उभारण्यात येत आहे. त.

### डांबरीकरणाऐवजी खडी, मुरूम, मातीचा वापर

# शहरातील खड्डे बुजवण्यासाठी पुन्हा मातीचा मुलामा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील खड्ड्यांचा प्रश्नांवर चारही बाजूंनी भडीमार होत असल्याने अखेर दुरुस्तीची काम हाती घेतले आहेत. या पूर्वी तात्पुरत्या डागडुजीसाठी खडी, मुरुमाचा वापर केला होता. ते रस्ते उखडले तरी पुन्हा माती टाकण्याचे प्रकार सुरू आहेत. गणेशाचे आगमन खड्ड्यांतून जसे झाले त्याचप्रमाणे विसर्जनही होणार असल्याने भाविकांमध्ये नाराजी आहे.

आता याच खड्ड्यातून आयटी कामगार, विद्यार्थी आणि कामगार वर्गाला प्रवास करावा लागणार आहे.



गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशीच भाविक, नागरिकांना खड्ड्याचा सामना करावा लागला होता. उत्सवाची खरेदी आणि बाप्पाला घरी नेताना याच खड्ड्यातून मार्ग काढावा लागला. त्यामुळे घाई गडबडीत डांबरीकरणाऐवजी खडी, मुरूम, माती, पेव्हिंग ब्लॉक, साहाय्याने खड्डे बुजण्यावर भर दिला होता. अवघ्या चार ते पाच दिवसात ते पुन्हा उखडले आहेत. आता बाप्पाच्या विसर्जनाच्या दिवशी याच खड्ड्यातून भाविकांना प्रवास करावा लागणार आहे.

जलवाहिन्या, सांडपाणी वाहिन्या टाकण्यासाठी महापालिकेने अनेक रस्ते खोदले होते. अद्यापही काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर खोदाई सुरू आहे. गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वी रस्त्यांच्या खड्ड्यांची दुरुस्ती करण्यात यावी असे, आदेश देण्यात आले होते. मात्र, ठेकेदाराकडून तात्पुरती मलमपट्टी करण्यात आली. रस्ते पूर्ववत न केल्याने तेथेही मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत.

#रा

## बसचालकांकडून आरटीओचे नियम पायदळी

# शहरात धावताहेत धोकादायक स्कूलबस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बसची योग्यता तपासणी करून प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. आरटीओने याबाबत कारवाईचा इशारा देऊनही सध्या जवळपास १ हजार अयोग्य स्कूलबस धावत आहेत. प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी या बसवर कारवाईचा इशारा दिला असला तरी बसचालकांनी याची दखलच घेतलेली नाही. त्यांना वळणावर आणण्यासाठी आरटीओ आणि पिंपरी चिंचवड वाहतूक विभागाने संयुक्त कारवाई करण्याची गरज आहे.

शहरामध्ये जवळपास सातशे ते आठशे खासगी शाळा आहेत. यामध्ये भरमसाठ फी भरून पालक आपल्या पाल्यांना पाठवतात. काही शाळांच्या स्वतःच्या स्कूलबसमधूनच हे विद्यार्थी प्रवास करीत आहेत. या स्कूलबसकडे योग्यता प्रमाणपत्र, परवाना, विमा आदी महत्त्वाची कागदपत्रे नसून, या धोकादायक बसचा प्रवास मुलांच्या प्राणाशी बेतू शकतो, त्याबाबत स्कूल प्रशासन अनभिज्ञ असल्याचे दिसून येते. कारण, आरटीओने वारंवार शाळेला कळवूनही त्याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली दिसत नाही.

वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र देताना वाहन योग्य आहे का, रस्त्यावर धावताना त्याचे पार्ट निकामी नाहीत ना, वाहन सुरक्षिततेची हमी देऊ शकते का, लाईट, हॉर्न, ब्रेक योग्य असून त्यातून विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक होऊ शकते का, हे सगळे तपासले जाते. औद्योगिक क्षेत्र म्हणून ओळख असलेले पिंपरी-चिंचवड शहर आता शैक्षणिक क्षेत्रातदेखील अग्रेसर होत आहे. त्यामुळे स्मार्ट शाळा उभ्या राहात आहेत.

या शाळांमधून मिळणाऱ्या उच्च दर्जाच्या शिक्षणातून मुलांचे भविष्य घडणार असल्याने पालक काबाडकष्ट घेऊन त्यांना शाळेत पाठवतात. मुलांना वेळेत शाळांमध्ये पाठविण्यासाठी स्कूलबसची सोय करण्यात आली आहे. शहरातील एकूण तीन हजार स्कूलबसपैकी हजाराहून अधिक स्कूलबस रस्त्यावर धावण्यास अयोग्य असल्याची माहिती आहे. या बसमालकांवर पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाने ठोस कारवाई करावी अशी मागणी पालक करत आहेत.

### वाहनांची तपासणी...

- आरटीओने जानेवारी ते ऑगस्टपर्यंत साडेसहाशे वाहनांची तपासणी केली. त्यात २४० वाहनांकडून दंड वसूल केला. या माध्यमातून आरटीओला ६३ लाख रुपये मिळाले आहेत .

### आरटीओचे नियम धाब्यावर

- आरटीओचे नियम बसचालक पाळत नसल्याचे दिसून येते. प्रत्येक शालेय स्कूलबस आणि व्हॅनचा रंग पिवळा असणे आवश्यक आहे. मात्र, अजूनही वेगवेगळ्या खासगी आणि मालवाहतूक वाहनातूनही विद्यार्थ्यांची ने-आण केली जाते. एवढेच नव्हे तर, एका स्कूलबसमध्ये ठराविक विद्यार्थी संख्या बसवण्याचा नियम असताना तो नियमही पाळला जात नाही. नियमापेक्षा अधिक विद्यार्थी बसवले जातात.

## मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांची जयंती साजरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैया हे जगातील उत्कृष्ट अभियंत्यांपैकी एक होते. आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये तसेच देशात इंजिनीअरिंगच्या तंत्रज्ञानाचा पाया उभारण्यामध्ये त्यांचा महत्वाचा वाटा होता. त्यांच्या महान कार्याची प्रेरणा घेऊन आजच्या अभियंत्यांनी कला, कौशल्य आणि निपुण ज्ञानाच्या माध्यमातून शहराला तसेच देशाला आकार देण्याचे काम करावे आणि यशाचे नवे शिखर गाठावेत, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी केले आणि सर्व अभियंत्यांना अभियंता दिनाच्या शुभेच्छाही दिल्या.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

## » Selected



## हिंजवडीच्या पाण्यासाठी जलकुंभाचे काम अपूर्ण अवस्थेत

**हिंजवडी :** देशातील आयटी पार्क म्हणून प्रसिद्ध असलेल्या हिंजवडी परिसरातील ग्रामस्थांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. रस्ते, वीज आणि आता पाण्यासाठी प्रशासन दरबारी हात पसरावे लागत आहेत. हिंजवडी ग्रामस्थांना मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी महत्त्वाच्या जलकुंभाचे काम रेंगाळत असल्यामुळे नाराजी व्यक्त केली जात आहे. चारही जलकुंभांचे काम तत्काळ मार्गी लावण्याची मागणी हिंजवडी ग्रामपंचायतीने केली आहे.

जलकुंभांचे काम युद्ध पातळीवर पूर्ण करा, अशा मागणीचे निवेदन हिंजवडी ग्रामपंचायतने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे. ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी नुकतीच भेट घेऊन या विषयावर चर्चा केली. दहा महिन्यांपूर्वी हिंजवडीतील म्हातोबा टेकडी परिसरात जल जीवन मिशनअंतर्गत टप्पा क्रमांक दोन येथील चार जलकुंभ उभारणीच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले होते. मात्र, आजतागायत केवळ एकाच जलकुंभाचे अर्धवट आरसीसी खांब उभे राहिले आहेत.

गावातील वाड्या, वस्त्यांवर आराखड्याप्रमाणे नळ पाणीपुरवठा वाहिनी टाकण्याच्या कामाबद्दल नागरिकांना माहिती देण्यात आली होती. त्यामुळे, योजनेचे काम बंद दिसत असल्यामुळे ग्रामस्थ नाराजी व्यक्त करत आहेत.

## महिला वाहतूक पोलिसांच्या हस्ते गणपतीची आरती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** सगळीकडे गणेशोत्सावची धूमधाम पाहायला मिळत आहे. आळंदी शहरात गणेश उत्सवानिमित्त आकर्षक विद्युत् रोषणाई ,आकर्षक सजावट व काही ठिकाणी देखावे सादर करण्यात आले आहेत. ठिकठिकाणी गणेश मंडळाची आरती विविध मान्यवरांच्या हस्ते पार पडत आहे.

उन्हातानात, पावसात वाहतूक पोलीस रस्त्यावर उभे राहून कर्तव्य बजावताना दिसतात. वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे. पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी (वाहन)ध्वनी आणि वायू प्रदूषण रोखण्यासाठी योग्य ती पावले उचलतात.असे अनेक कार्य ते कर्तव्य बजावताना करतात. अश्याच विविध त्यांच्या कर्तव्याची कार्याची दखल घेत अमरदीप तरुण मंडळ येथे दिघी आळंदी महिला वाहतूक विभाग पोलीस कर्मचाऱ्यांचे हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली व मंडळाच्या वतीने महिला वाहतूक पोलीसांचा सन्मान करण्यात आला.



तसेच महिला शक्तीचा जागर, स्त्रीत्वाचा अभिमान म्हणत शिवतेज मित्र मंडळ यांनी आज समाजामधील दररोज पुरुषांच्या बरोबरीने अनेक क्षेत्रात महिला आघाडीवर आहे अश्या सर्व माता भगिनींचा आदर म्हणून समस्थ महिलांच्या हस्ते श्रींची आरती ठेवण्यात आली आहे.

## स्वप्नपूर्ती रेसि. मधील रहिवाशांना दिलासा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिखली :** चुकीच्या पद्धतीने आकारण्यात आलेला टॅक्स मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर महापालिका प्रशासनाला जाग आली आहे. झालेली चूक दुरुस्त करून नियमानुसारच कर आकारणी करण्यात येईल असे आश्वासन 'कर आकारणी' विभागाकडून देण्यात आल्याने सोसायटीतील रहिवाशांना दिलासा मिळाला आहे.

चिखली विभागातील स्वप्नपूर्ती रेसिडेन्सी या सोसायटीतील रहिवाशांनी सोसायटीच्या कर आकारणी संदर्भात मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांच्याकडे तक्रार केली होती.

## लाडकी बहीण योजनेसाठी १ लाख ६९ हजार अर्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज स्वीकारण्यात येत आहे. आतापर्यंत शहरातील १ लाख ६९ हजार ८५० महिला व तरुणींनी अर्ज भरले आहेत. त्या अर्जांची छाननी महापालिकेने केली आहे. या योजनेसाठी महापालिकेने शहरभरात १२३ अर्ज स्वीकृत केंद्र सुरू केले होते. या केंद्रांवर तसेच, अंगणवाडी सेविका आणि महिला बचत गटांच्या महिलांकडून महापालिकेकडे अर्ज भरून घेतले.

तीस ऑगस्टपर्यंत हे त्यांच्याकडून अर्ज भरून घेण्यात आले. राज्य शासनाने १ ते ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज स्वीकृतीस मुदतवाढ दिली आहे. त्यासाठी जुने पोर्टल बंद करून नवीन पोर्टल सुरू केले आहे. त्यावर केवळ अंगणवाडी सेविका अर्ज भरू शकतात. त्याद्वारे जमा झालेले अर्जाची सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयातील केंद्रांत छाननी केली जात आहे.

### महत्वाचे...

- आतापर्यंत १ लाख ६९ हजार ८५० अर्ज प्राप्त झाले असून, त्यातील १ लाख ६८ हजार अर्जांची छाननी पूर्ण झाली आहे. शहरातील ज्या महिला व तरुणींनी या योजनेसाठी अर्ज केले नाहीत, त्यांनी जवळच्या अंगणवाडी किंवा सेतू सुविधा केंद्र येथे अर्ज करावेत, असे आवाहन महापालिकेच्या समाज विकास विभागाचे साहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी केले आहे.

## 'जल्लोष २०२४' युवक महोत्सवाच्या नावनोंदणीस सुरुवात

**चिंचवड :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत विद्यार्थी विकास मंडळ आणि प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज यांच्या संयुक्त विद्यमाने जल्लोष २०२४-२५ जिल्हास्तरीय अंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव स्पर्धेचे आयोजन चिंचवड येथील प्रतिभा महाविद्यालयात दि.२३ सप्टेबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजेपासून केले आहे. प्रामुख्याने पिंपरी चिंचवड शहर, मावळ, खेड, जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील, पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी २७ प्रकारांमध्ये विविध स्पर्धेत भाग घेऊन सहभागी होता येईल.




त्यात प्रामुख्याने संगीत विभागात शास्त्रीय भारतीय गायन, टाल वाद्य, स्वर वाद्य, सुगम संगीत भारतीय व पाश्चात्य, समूहगान, लोकसंगीत वाद्य वृंद यांच्या समावेश असेल, तसेच नृत्य प्रकारात लोक आदिवासी व शास्त्रीय भारतीय नृत्य रंगमंचीय कला विभागात एकांकिका प्रहसन, मूकनाट्य, नकला, ललित कला प्रकारात स्थळ चित्र, चित्रकला, भितीचित्र, माती कला, मेहंदी, रांगोळी इत्यादी तर वाङ्मय प्रकारात मग प्रश्नमंजुषा, वकृत्व आणि विवाद स्पर्धा यांच्या समावेश आहे. एकूण प्रमुख पाच गटामधून २० कला प्रकारांमध्ये या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

## हाय होल्टेजमुळे घरातील इलेक्ट्रिक उपकरणांचे नुकसान

**चिंचवड :** मोहननगर महात्मा फुलेनगर परिसरातील विद्युत खांबावर गेली दोन दिवस स्पार्किंग होऊन ज्यादा भारामुळे (हाय होल्टेज) घरातील इलेक्ट्रिक उकरणांचे नुकसान झाल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केली आहे.

याबाबत महावितरणचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार, अतुल देवकर, उपअभियंता अशोक जाधव, पल्लवी देशपांडे यांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, मोहननगर, महात्मा फुलेनगर येथील विद्युत खांबावर गेली दोन दिवस स्पार्किंग होऊन, ज्यादा भार (हाय व्होल्टेज) निर्माण झाला आहे. त्यामुळे शुक्रवारी सकाळी अनेकांच्या घरातील बल्ब फुटणे, चार्जर जळणे, टीव्हीच्या केबल जळणे, टीव्ही आदी इलेक्ट्रिक वस्तुंचे नुकसान झाले आहे.

## शाळकरी मुलाच्या अपघाती मृत्यूने नागरिक संतप्त

**वडगाव मावळ :** तळेगाव दाभाडे एमआयडीसी हद्दीतील जाधववाडी इंदोरी रस्त्यावर अवजड वाहनाच्या धडकेत सार्थक वायकर या शाळकरी मुलाचे अपघाती मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने स्थानिक नागरिक शोकसंतप्त झाले असून त्यांनी पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला.सार्थक वायकर याच्या अपघाती मृत्यूनंतर नवलाख उंबरे ग्रामस्थांनी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यावर मोर्चा काढत आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

या निवेदनात आंबी सर्कलपासून ते मावळ दरबार हॉटेलपर्यंत जे बेकायदेशीर वाहने रोडच्यामध्ये उभी केली जातात, त्यांच्यावर त्वरित कारवाई करावी. ट्रक लोडिंग-अनलोडिंगची व्यवस्था कंपन्यांनी आपल्या आवारातच करावी. मावळ दरबार ते आर के पेट्रोल पंपापर्यंत मुख्य रस्त्याची रुंदी वाढवण्याबाबत त्वरित कारवाई करावी. ग्रामपंचायत मार्फत वारंवार पत्र्यवहार करून सुद्धा तरी कंपन्यांवरती कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नाही तरी एमआयडीसी पोलीस स्टेशनने दखल घ्यावी अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

पान १ वरून

## पुण्यातून शरद पवार गटाचे ४१ उत्सुक

ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये विधानसभेच्या निवडणुका होण्याची शक्यता असल्याने, पक्षाने २८ ऑगस्टपासून इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्यास सुरुवात केली. पक्षाची भक्कम संघटनात्मक बांधणी आणि प्रत्येक मतदारसंघातील इच्छुकांची संख्या ओळखून माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या समवेत हा उपक्रम सुरू केला. अर्ज करण्याची सुरुवातीची मुदत ४ सप्टेंबर निश्चित करण्यात आली असली, तरी ती १० सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आली होती. पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील ८ मतदारसंघातून ४१ अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्जदारांच्या मुलाखती घेतल्या जातील, त्यानंतर त्यांची नावे अंतिम विचारासाठी प्रदेशाध्यक्षांकडे पाठविली जातील.

## एक देश एक निवडणूक लागू होणारच

लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात 'एक देश, एक निवडणूक'चा जोरदार आग्रह धरला होता. ते म्हणाले की, वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे देशाच्या प्रगतीत अडथळे येत आहेत. 'एक देश, एक निवडणूक'साठी देशाला पुढे यावे लागेल, असे मोदी म्हणाले होते. पंतप्रधानांनी राजकीय पक्षांना लाल किल्ला आणि तिरंग्यापासून साक्षीदार म्हणून देशाची प्रगती सुनिश्चित करण्याचे आवाहन केले होते.

## स्वारगेट ते कात्रज मेट्रोचे विस्तारीकरण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यासंदर्भात मुख्य सचिवांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे विभागीय आयुक्तांची बैठक घेतली. त्या बैठकीत दौऱ्यातील कार्यक्रमांचे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी विविध विभागाच्या अधिकाऱ्यांची गुरुवारी (दि. १२) विभागीय आयुक्तालयात प्राथमिक बैठक घेतली. त्या बैठकीत मोदींच्या दौऱ्याच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली. बैठकीची अंतिम फेरीसुद्धा होणार असून त्यानंतर कार्यक्रमाच्या नियोजनावर शिक्कामोर्तब केला जाणार आहे.

## पुणे रेल्वे स्थानकात अत्याधुनिक सुरक्षा

असून, त्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा टाकण्याचे काम या महिन्यात हाती घेण्यात येणार आहे. एकदा ही यंत्रणा कार्यान्वित झाली की, कॅमेरे चेहरे टिपतील आणि त्यांची ओळख प्रणालीतून पटवली जाईल. ही प्रणाली विशेषत: गुन्हेगार आणि काळ्या यादीतील तिकिटांचे दलाल ओळखण्यासाठी प्रभावी ठरेल. अशी संशयास्पद व्यक्ती स्टेशन परिसरात दिसल्यानंतर, ती अलार्म देईल.

## प्रवाशांना मनस्ताप

तीव्र संताप व्यक्त केला आहे. आज पहाटे ३ वाजून ५५ मिनिटांच्या सुमारास उड्डाण करणार होते. मात्र विमानात झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे हे विमान ६ तासांनंतर रद्द करण्यात आले. या विमानात २०० ते ३०० प्रवासी होते. प्रवाशांना विमानात चढवल्यानंतर विमान तासनतास विमानतळावरच उभे होते. सुमारे ५ तास प्रवाशांनी विमान उड्डाण होण्याची वाट पाहिली तसेच त्यांना विमानातून उतरण्याची परवानगी देखील दिली नव्हती. प्रवाशांचा संताप वाढल्यावर क्रू मेंबर्सनी त्यांना फ्लाइटमधून उतरण्याची परवानगी दिली आणि इमिग्रेशन वेटिंग एरियामध्ये नेले. तांत्रिक बिघाडामुळे उड्डाण रद्द करण्यात आल्याचे इंडिगोने म्हटले.

## कोलकाता येथे अचानक स्फोट

रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेथे त्याच्यावर उपचार सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. स्फोटाची माहिती मिळताच पोलीस आणि बॉम्बशोधक पथक घटनास्थळी पोहोचले. शिवाय, घटनास्थळी फॉरेन्सिक तज्ञही तैनात करण्यात आले आहेत, जे स्फोट कसा आणि कोणत्या परिस्थितीत झाला हे शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. हा परिसर तातडीने सील करण्यात आला असून संपूर्ण परिसरात सुरक्षा दलांची तैनाती वाढवण्यात आली आहे. या अपघातामागे काही संघटित कट असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे पोलीस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी सुरक्षा यंत्रणा प्रत्येक कोनातून वस्तुस्थिती तपासत आहेत.

## राहुल गांधी हेच दहशतवादी

तुम्ही अंदाज बांधता. कुणाला पकडल्याबद्दल बक्षीस द्यायचे असेल तर ते राहुल गांधी आहेत, असे मला वाटते. राहुल गांधी हे देशाचे सर्वात मोठे शत्रू असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे नवा वाद उद्भवणार आहे.

## सात पिस्तूल, १४ काडतुसे जप्त

गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूरमधील पेरणा फाटा येथे राहणारा झामरे हा पिंपरी-चिंचवडमधील गुन्हेगारी घटकांना मध्य प्रदेशातून पिस्तूल पुरवत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

तपासादरम्यान पोलिसांनी झामरे यांच्याकडून आणखी तीन पिस्तूल आणि सहा काडतुसे जप्त केली. झामरे याने हिस्ट्रीशीटर कमलेश ऊर्फ डॅनी कानडे (वय २९, रा. मोशी) याला पिस्तूल, तर कानडे याने पवन दत्तात्रय शेजवाल (वय ३५, रा. नारायणगाव) याला पिस्तूल पुरवले.

पोलिसांनी कानडे तसेच शेजवाल यांना अटक करून त्यांच्याकडून पिस्तूल व काडतुस जप्त केले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कानडे, शेजवाल आणि ढगे यांचा यापूर्वीचा गुन्हेगारी रेकॉर्ड आहे. झामरे यांचा मध्य प्रदेशातून चालणाऱ्या बेकायदा शस्त्रास्त्र रॅकेटशी संबंध असल्याचे निष्पन्न झाले. झामरे यांना शस्त्रे पुरवणाऱ्या मध्य प्रदेशातील बेकायदा शस्त्रास्त्रांच्या उत्पादकांची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## निपाहमुळेच त्या तरुणाचा मृत्यू

येथील एका तरुणावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्याला निपाह विषाणूचा संसर्ग झाल्याचा संशय होता. ९ सप्टेंबर रोजी त्याचा मृत्यू झाला. त्याला निपाह विषाणू संसर्ग झाल्याची पुष्टी झाली आहे. मृत तरुण हा शिक्षणासाठी बंगळूर येथे राहत होता. त्याने भेट दिलेल्या ठिकाणांची ओळख पटवण्याचा प्रयत्न करत आहोत, असे त्यांनी सांगितले. संबंधित तरुणाने आपल्या मित्रांसह वेगवेगळ्या ठिकाणी प्रवास केला होता, आयसोलेशनमध्ये ठेवण्यात आलेल्या लोकांपैकी पाच जणांमध्ये सौम्य ताप आणि इतर लक्षणे आढळून आली, त्यानंतर त्यांचे नमुनेही चाचणीसाठी पाठवण्यात आले आहेत, असेही आरोग्यमंत्री वीणा जॉर्ज यांनी सांगितले.

## साखर नियंत्रण आदेशात दुरुस्ती

प्रतिनिधी, राज्याचे साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांच्यासह एकूण ५५ प्रतिनिधी उपस्थित होते. साखर कायदा बदलाचे विधेयक संसदेत येणार असल्याने सर्व खासदारांना साखर उद्योगाच्या मागण्यांचे निवेदन देणार असल्याचे स्पष्ट करून ते म्हणाले की, मागील पाच वर्षांत एफआरपीच्या दरात ५७६ रुपये वाढ झालेली असताना साखर विक्रीचा दर क्विंटलला ३१०० रुपयांवर केंद्राने स्थिरच ठेवला आहे. साखरेसह इथेनॉल विक्री दरातही वाढ करण्याची आमची मागणी आहे. उपपदार्थात मोलेसिस, बगॅसबरोबरच इथेनॉल, सहवीज निर्मिती, सीबीजी, सीएनजी, हरित हायड्रोजनसारख्या याचा समावेश करण्यात आला असून, यातून मिळणारे उत्पन्न कारखान्याचे उत्पन्न समजले जाणार आहे.

## वाढत्या मागणीमुळे नारळाच्या दरात वाढ

# गणेशोत्सव काळात श्रीफळाची उलाढाल लाखोंवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** सणासुदीच्या काळात श्रीफळ म्हणजे नारळाला मोठे धार्मिक महत्त्व असते. सत्यनारायण पूजेपासून ते प्रतिष्ठेपर्यंत श्रीफळ गरजेचे असते. प्रत्येकाच्या घरी परंपरेनुसार अथवा रुढीनुसार गणेश उत्सव साजरा करण्यात येतो. त्यामुळे श्रीफळ पूजेमध्ये वापरले जाते. सध्या सुरू असलेल्या गणेशोत्सवातही नारळाला मोठी मागणी असल्याचे दिसून आले. यंदा गणेशोत्सवात नारळाची उलाढाल २० लाखांवर पोहोल्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. पिंपरी-चिंचवड शहरात एकूण दोन हजार गणेश मंडळे आहेत.




शहरातील बहुतांश घरामध्ये गणरायांची स्थापना केली जाते. कुटुंबातील नातेवाईक गणेश उत्सवानिमित्त दर्शन घेण्यासाठी येताना पूजेसाठी प्रसाद म्हणून नारळ घेऊन जातात. त्यामुळे बाजारात नारळाला मागणी वाढली आहे. गणेशोत्सवामुळे नागरिक मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडत आहेत. हॉटेलच्या ग्राहकांतही वाढ झाली आहे. हॉटेलचालकांकडून नारळाला मागणी वाढत आहे. तसेच गणेशोत्सवात मोदकांसाठी मोठ्या प्रमाणात नारळाची खरेदी होते. संपूर्ण उत्सवात २० ते २५ लाख नारळांची खरेदी होते. देशात प्रामुख्याने कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र, प्रदेश आणि केरळ राज्यातून नारळाचा पुरवठा केला जातो. यंदा तमिळनाडूमध्ये नारळाच्या उत्पादनात घट झाली आहे. त्यासह खोबऱ्याचे तेल आणि गोटा खोबऱ्याला मागणी असल्याने नारळाचा वापर वाढला आहे. त्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत यंदा घाऊक बाजारात शेकडा नारळाच्या दरात २०० रुपयांनी वाढ झाली आहे. किरकोळ बाजारात दरात ३ ते ५ रुपयांनी वाढ झालेली आहे.

#रा

## कोलवडी-साष्टेत अनेक वर्षापासून वंचित असलेला

# आरोग्य उपकेंद्र कामाचा शुभारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** अनेक वर्षापासून वंचित असलेला आरोग्य केंद्र(सरकारी दवाखाना) चा महत्वपूर्ण प्रश्न आता मार्गी लागत असून प्रथमच कोलवडी साष्टे(ता.हवेली) येथे जुन्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या जागेवर शासनाच्या वतीने ५५ लाख रुपये निधी मंजूर झालेल्या नूतन आरोग्य उपकेंद्र(सरकारी दवाखाना) च्या कामाचा शुभारंभ कोलवडी-साष्टे ग्रामपंचायतीचे सरपंच विनायक गायकवाड,उपसरपंच निलेश रिकामे यांच्या हस्ते पार पडला.

याप्रसंगी माजी उपसरपंच तथा सदस्य रमेश मदने, ग्रामपंचायत सदस्य सचिन गायकवाड, संदिप गायकवाड, स्वप्निल नितनवरे, योगेश मुरकुटे, शितल अविनाश भाडळे, चैत्राली अजित गायकवाड, स्वाती अजित गायकवाड,प्रिया दिगंबर गायकवाड, निशा श्रीकांत भोर, निता सोमनाथ भालसिंग, प्रियंका धनंजय शितोळे,ग्रामविकास अधिकारी प्रविन खराडे,माजी उपसरपंच नाना भाडळे,विश्वनाथ गायकवाड,माजी उपसरपंच निर्मला अडसुल, कार्यकारी अभियंता कुलकर्णी, उपकार्यकारी अभियंता गुजर मॅडम, शाखा अभियंता भंडारी, कंत्राटदार येवले,सचिन जाधव, सनी काळे,प्रतिक सस्ते, प्रवीण शिंदे, योगेश शिळीमकर, आदी उपस्थित होते. नव्याने उभारण्यात येणाऱ्या उपरोग्य केंद्र(सरकारी दवाखाना) मध्ये प्रसूती केंद्र,लसीकरण केंद्र, लॅब, अशा सर्व आरोग्याच्या सोयी,सुविधा दिल्या जाणार आहे. त्यामुळे आता अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला व वंचित असलेला आरोग्याचा मुख्य प्रश्न कोलवडी-साष्टे गावातील ग्रामस्थांचा मार्गी लागत आहे.



**शुभारंभ:** कोलवडी-साष्टे(ता.हवेली) येथे आरोग्य उपकेंद्र कामाचा शुभारंभ करताना सरपंच विनायक गायकवाड, उपसरपंच निलेश रिकामेसह मान्यवर.

### आरोग्याचा प्रश्न मार्गी

कोविड काळामध्ये आमच्या कोलवडी-साष्टे गावामध्ये आरोग्य उपकेंद्र म्हणजेच सरकारी दवाखाना उपलब्ध नसताना आम्हाला लसीकरणासाठी इतर गावांची मदत मागावी लागली व इतर गावांमध्ये जाऊन लसीकरण करून घ्यावे लागले होते. कोरोनाच्या काळात आमच्या गावच्या ग्रामस्थांसमोर खूप मोठी अडचण निर्माण झाली होती.पण आता खरंच कोलवडी गावाला एक युवा नेतृत्व सरपंच विनायक(भाऊ) गायकवाड यांच्या काम करण्याच्या उत्तम कार्यशैली, पद्धतीमुळे गावचा सर्वांगीण विकास होत असून गावात आता आरोग्य उपकेंद्र) कोलवडी-साष्टे गावांमध्ये सुरू होत आहे.याचा आनंद व सरपंच गायकवाड यांच्या कामाचे कौतुक स्तरावर होत आहे.

**—संभाजी काळे,**
**ग्रामस्थ - कोलवडी-साष्टे**

## करंदीत पत्नीला मारहाण प्रकरणी पतीवर गुन्हा दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** करंदी ता. शिरुर येथील एका विवाहितेला पति कडून वारंवार मारहाण करत छळ केल्याची घटना घडल्याने विवाहितेने दिलेल्या फिर्यादी नुसार शिक्रापूर पोलिसांत अनिकेत पोपट ढोकले या इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. करंदी ता. शिरुर येथील ज्ञानेश्वरी ढोकले या महिलेला तिचा पती अनिकेत वारंवार त्रास देऊन घरातील किरकोळ कारणातून मारहाण करुन, कंपनीचा पगार झाल्यावर पैसे काढून घेऊन छळ करत असल्याने ज्ञानेश्वरीच्या वडिलांनी अनिकेतला समजावून सांगितले होते, मात्र त्यांनतर देखील अनिकेत वारंवार पत्नीचा छळ करुन, शिवीगाळ, दमदाटी केली.

## » Selected



### बाल विकासच्या विद्यार्थ्यांचे अथर्वशीर्ष पठण



**सासवड :** सासवड येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बाल विकास मंदिर या शाळेतील इ. तिसरी चौथीच्या विद्यार्थ्यांनी सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करणाऱ्या अजय सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ सासवड येथे अकरा वेळा सामुदायिक अथर्वशीर्ष पठण केले. तसेच, गणपती बाप्पाची गाणी म्हटली. शाळा मागील बारा वर्षापासून सलग अथर्वशीर्ष पठणाचा उपक्रम राबवत आहे. यावेळी गणेश मंडळाकडून विद्यार्थ्यांना अल्पोहार देण्यात आला. मुख्याध्यापक , शिक्षक यांचा श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी, शाळेतील इयत्ता ३ री, ४ थी चे ३३१ विद्यार्थी , मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे मंडळाचे अध्यक्ष प्रवीण पवार, शिक्षक शारदा यादव, माणिक शेंडकर, नरेंद्र महाजन, मीना खोमणे, अश्विनी कदम, राणी गिरमे, वृषाली राजपुरे तसेच मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.



### दरेकरवाडीत शेतकऱ्यांच्या पाच एकर उसाला आग

**शिक्रापूर:** दरेकरवाडी ता. शिरुर येथील चार शेतकऱ्यांच्या पाच एकर उसाला अचानकपणे भीषण आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची घटना घडली मात्र नागरिकांच्या सतर्कतेने आग विझवण्यात यश आले असल्याने दुर्घटना टळली आहे. दरेकरवाडी ता. शिरुर येथील अशोक भोसले यांच्या शेतातील उसाला सायंकाळच्या सुमारास अचानक आग लागली, दरम्यान आगीचे लोळ शेजारील शेतकऱ्यांच्या शेतामध्ये गेल्याने यावेळी अशोक भोसले यांच्यासह नंदकुमार भोसले, कैलास भोसले, किसन दरेकर यांच्या शेताला देखील आग लागली, यावेळी शेतकऱ्यांसह पोलीस पाटील पांडूरंग दरेकर, निखील भोसले, महादेव दरेकर, महेश भोसले यांसह आदींनी पाणी, झाडांच्या व मातीच्या सहाय्याने आग विझवण्याचे प्रयत्न सुरु केले असता तब्बल एका तासाने आग विझवण्यात नागरिकांना यश आले, मात्र यावेळी लागलेली आग नेमकी कशाने लागली हे स्पष्ट झाले नाही मात्र आगीमध्ये चार शेतकऱ्यांच्या पाच एकर उसाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले, परंतु नागरिकांच्या सतर्कतेने आग विझवण्यात यश आले असल्याने दुर्घटना टळली आहे.

# जेजुरीच्या मारिअन्ना यांना सुवर्ण स्टारचा ग्रेट वूमनचा सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** राज्यातील कुलदैवत असलेल्या जेजुरी पंचक्रोशीतील सामाजिक सांस्कृतिक कार्य क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या सुवर्णस्टार सोशल क्लबच्या वतीने यंदाच्या गणराया उत्सवा निमित्त सुवर्ण स्टार दी ग्रेट वूमनचा सन्मान भारतीय धार्मिक अध्यात्मिक संस्कृतीचा जगभर प्रसार करणाऱ्या जेजुरीच्या सुनबाई आणि रशियाच्या माहेरवासीन असणाऱ्या पर्यावरणपूरक उत्सव गणेशमूर्ती साकारणाऱ्या मारिअन्ना विवेक अबनावे सन्मान बहाल करण्यात आला याप्रसंगी पुरंदर कलामंचच्या बहूआयमी कलाकारांनी सादर केलेल्या पुरंदर स्वरतारा या संगीतमय कार्यक्रमानी रसिकाणा मंत्रमुग्ध करून टाकले होते.

गेली चाळीस वर्षांपासून जेजुरी पुरंदर पंचक्रोशीतून आपल्या सामाजिक कार्यक्षेत्रत काम करत असलेल्या सुवर्णस्टर स्पोर्ट्स सोशल क्लबने या वर्षी पंचक्रोशीतील विविध भजनी मंडले तसेच विविध क्षेत्रात सामाजिक सांस्कृतिक कार्यात कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मानही केला सुवर्ण स्टारच्या करोना काळातील सामाजिक कार्याचा आणि सामाजिक ऐक्याचा सलोखा जोपसाण्याच्या कार्याचा नेहमीच सर्वत्र गौरव केला जातो. परमपूज्य दादामहाराज, ग्रामीण उपाध्यक्षा राजवर्धरणीताई जगताप सह नगरसेवक देवसंस्थान अजीमाजी सदस्यांनी या मंडळ उपक्रमास भेटी दिल्या असुन संयोजक अध्यक्ष रज्जाकभाई तांबोळी, आर के बारभाई, प्रख्यात तबलावादक अमोल बेलसरे, प्रीतम बारभाई, विलास कड सलीम तांबोळी, इत्यादीनी विशेष परिश्रम घेतले

### स्वरतारा कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा




**सुवर्ण स्टार दी ग्रेट वूमन :** गणेश उत्सवा दरम्यान परमपूज्य दादामहाराज, ग्रामीण उपाध्यक्षा राजवर्धरणीताई जगताप सह नगरसेवक देवसंस्थान अजीमाजी सदस्यांनी या मंडळ उपक्रमास भेटी दिल्या संयोजक अध्यक्ष रज्जाकभाई तांबोळी, आर के बारभाई, प्रख्यात तबलावादक अमोल बेलसरे, प्रीतम बारभाई, विलास कड सलीम तांबोळी आदी.



सहकार महर्षी दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

# तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** डी. जी. फाऊंडेशन यांच्या वतीने सहकार महर्षी दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे बक्षिस वितरण समारंभ शरदचंद्रजी पवार सभागृह मंचर येथे महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा.दिलीपराव वळसे पाटील साहेब यांच्या हस्ते पार पडले.ही स्पर्धा कनिष्ठ व वरिष्ठ अशा दोन गटात आयोजित केली होती.

कनिष्ठ गटात प्रथम क्रमांक -कु. शांभवी संदीप शिंदे(डेक्कन मराठा महाविद्यालय लांडेवाडी),द्वितीय क्रमांक-कु. समृद्धी कमलेश शिनलकर(विद्या विकास मंदिर महाविद्यालय अवसरी),तृतीय क्रमांक-कु.



आकांक्षा विकास पिंगळे(डेक्कन मराठी महाविद्यालय लांडेवाडी),चतुर्थ क्रमांक -कु. पल्लवी विठ्ठल शिंदे (डी. जी.वळसे पाटील महाविद्यालयात पारगाव), पाचवा क्रमांक- कु.गौरी शिवाजी वाळुंज (डी. जी.वळसे पाटील महाविद्यालय पारगाव) यांनी पटकवला व त्याचबरोबर वरिष्ठ महाविद्यालयात प्रथम क्रमांक-कु.आदिती हरिश्चंद्र गावडे (बी.डी. काळे महाविद्यालय घोडेगाव), द्वितीय क्रमांक -कु. अपेक्षा एकनाथ खंडागळे(डी. जी.वळसे पाटील महाविद्यालय पारगाव), तृतीय क्रमांक-कु. ममता श्रीकांत देवरे (अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर),चतुर्थ क्रमांक-श्रावणी बाळशीराम वाळुंज(डी. जी.वळसे पाटील महाविद्यालय पारगाव),पाचवा क्रमांक-कु.ज्ञानेश्वरी किरण ढमढेरे (बी.डी. काळे महाविद्यालय घोडेगाव)यांनी मिळविला.या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. पुरुषोत्तम काळे व अक्षदा शिंदे यांनी परीक्षण केले.

आंबेगावची शेती काल, आज आणि उद्या, ऑनलाइन शिक्षणामुळे मोबाईलचा अतिवापराचा वाढलेला धोका आणि दुष्परिणाम, करिअरच्या वाटा, महासत्ता होण्याच्या दिशेने भारताची दमदार वाटचाल असे चार विषय दोन्ही गटांसाठी होते.अंतिम फेरीमध्ये ३९ विद्यार्थी होते.

या स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा. दिलीपराव वळसे पाटील, कारखान्याचे चेअरमन मा.बाळासाहेब बेंडे, विवेक वळसे पाटील, पूर्वा वळसे पाटील, सुषमाताई शिंदे, पुष्पलता जाधव, सचिन पानसरे, अजय आवटे, माणिक गावडे, प्रेम थोरात व सर्व पदाधिकारी ,विद्यार्थी स्पर्धक व मान्यवर आणि कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश पडवळ यांनी केले.



### यशवंतराव चव्हाण विद्यालयात हिंदीदिन साजरा

**लोणी-धामणी : :** घोडेगाव (ता.अंबेगाव ) येथील यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालय आंबेगाव वसाहत राष्ट्र भाषा हिंदी दिननिमित्त गीत, काव्य गायनाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकानी हिंदी कविता, गीते, दोहे,गायन करत हिंदी दिन साजरा केला.हिंदी दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन सर्व शिक्षक, मुख्याध्यापक चव्हाण.पी.डी.व ग्रामपंचायत सदस्य मिलिंद भांगरे, विजय घोलप यांच्या शुभहस्ते करण्यात आले.विद्यालयातील विध्यार्थिनींनी हिंदी बाल गीतावर नृत्य सादर केले. तसेच राष्ट्रीय भाषा हिंदी परीक्षा मध्ये प्रविण्य मिळवलेल्या विध्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विषयाच्या शिक्षिका वैशाली काळे यांनी केले.हिंदी दिनानिमित्त मुख्याध्यापक चव्हाण पी. डी. यांनी सर्वांना हिंदी दिनाची माहिती देत विध्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयातील शिक्षक माणिक हुले, वैशाली काळे,संजय वळसे,लक्ष्मी वाघ,वैभव गायकवाड,गौरी विसावे,अश्विनी घोडेकर,राजन राक्षे ,रुपाली बटवाल ,संतोष पिंगळे,लक्ष्मण फलके,सुभाष साबळे,गुलाब बांगर यांनी केले.

# जगातील सर्वात उंच शिवरायांच्या स्मारकाचे काम प्रगतीपथावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** श्रीमंत योगी सुवर्ण स्मारक ट्रस्ट यांच्या वतीने किल्ले शिवनेरीच्या उत्तर दिशेकडील गोद्रे, ता. जुन्नर येथे जगातील सर्वात उंच शिवरायांच्या स्मारकाचे काम प्रगतीपथावर असून दि.१६ सप्टें. रोजी शिवरायांचे उजवे पाद्य (पाय) जयपूर येथून आळेफाटा, ता.जुन्नर येथे आगमन होणार असल्याची माहिती माजी आमदार शरद सोनवणे यांनी शनिवार दि.१४ रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

शिवरायांचे हे पाद्य आळेफाटा-पिंपळवंडी-नारायणगाव- ओझर-ओतूर, बनकरफाटा-लेण्याद्री ते जुन्नर शहर येथे मार्गक्रमण करीत शिवभक्तांच्या दर्शनासाठी येणार आहे. याबाबत अधिकची माहिती देताना शरद सोनवणे म्हणाले, गोद्रे (ता. जुन्नर) येथे २५ एकर क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा जगातील सर्वात उंच पुतळा उभारण्याचा संकल्प केलेल्या शिवकार्याचे दि. १२ जानेवारी रोजी कोल्हापूर संस्थानचे संभाजीराजे छत्रपती यांनी भूमिपूजन केले होते. सर्व जाती धर्माच्या लोकांना घेवून केल्या जाणाऱ्या ह्या शिवकार्यातील पाद्य आगमन सोहळा दि. १६ रोजी साजरा केला जाणार आहे.

सुमारे ५० फूट उंचीच्या ८० फूट × ८० फूट लांबी-रुंदी असलेल्या



चौथाऱ्यावर शासनाच्या विविध परवानग्या याबरोबरच कामातील क्रमानुसार योग्य तज्ज्ञांचे अहवाल, भौगोलिक दृष्ट्या हवेचा असणारा दाब, स्मारकाची सुरक्षितता लक्षात घेऊन उभारण्यात येणाऱ्या पुतळ्याचा भाग असलेले साडे अठरा फूट (१८.५') लांबी व साडे आठ फूट (८.५') रुंदी व साडे सात फूट (७.५') उंचीचे सुमारे ४ टन वजनाच्या पाद्याचे आगमन होणार असून याप्रसंगी मोटार रॅली,ढोल-ताशे,अबदाली पेहेराव,भगवे फेटे परिधान करून फटाक्यांची आतिषबाजी, पुष्पवृष्टी केली जाणार असून यामध्ये सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन शरद सोनवणे यांनी केले आहे.

मालवण येथील घटनेचा उल्लेख करताना सोनवणे पुढे म्हणाले, सर्वात उंच स्मारक उभे करताना अनेकांच्या संशयाच्या सुया आमच्या दिशेने आहेत मात्र सुरक्षिततेच्या दृष्टीने आम्ही सावध असून काटेकोरपणे, जागरूक राहून जुन्नरला नावलौकिक प्राप्त होणेकामी अंमलबजावणी करणार आहोत. कला संचालनालय विभाग, शासनाचे विविध विभाग यांचे मार्गदर्शन घेतलेले आहे.

मूर्तीकार मिंगलेश्वर सिक्वेरा, वास्तुविशारद विनय पाटील, स्टॅचू ऑफ युनिटी उभारण्यात सहभागी झालेले शिल्प अभियंते मोहंमद अन्सारी, प्रकल्प नियंत्रक प्रमुख अमोल पाचपुते, सुदर्शन शिंदे यांच्या माध्यमातून हे कार्य साध्य होत असल्याचे सोनवणे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेत दर्शन फुलपगार, अविनाश करडिले, दीपेश परदेशी, प्रदीप चाळक, विकास राऊत, विक्रम परदेशी आदी उपस्थित होते.

# युनोस्को जागतिक वारसा नामांकनाकरिता जुन्नर तालुक्यातील शाळांचा सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर:** जिल्हाधिकारी कार्यालय पुणेच्या वतीने आयोजित करण्यात येत असलेल्या युनोस्को जागतिक वारसा नामांकनाकरिता पुणे जिल्ह्यातील तीन किल्ल्यांचा प्रसार प्रसिद्धी , जनजागृती करण्याकरिता तालुका स्थरीय शालेय गड किल्ले बनविणे स्पर्धेमध्ये जुन्नर तालुक्यातील स्पर्धक शाळांनी सहभाग नोंदविला असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे , गट शिक्षण अधिकारी अनिता शिंदे यांनी दिली. शिवजन्मभूमी शिवनेरी चा समावेश युनोस्को कडे जागतिक वारसा नामांकनाकरिता प्रस्थावित करण्यात आलेला असून राज्यातील 12 पर्यटन स्थळामध्ये समावेश आहे. या किल्ल्यांचा प्रचार प्रसिद्धी होण्याकरिता तालुकास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यातील पहिल्या क्रमांकाकरिता 1 लाख , दुसरा 50 हजार , तिसरा 25 हजार रुपये रोख बक्षीस ठेवण्यात आली आहेत. त्याशिवाय तालुकास्तरीय प्रथम येणाऱ्या पाच गावात नागरी सुविधा अंतर्गत प्रत्येकी 50 लाखांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तालुका तालुकास्तरावर निवड झालेल्या तीन विजेत्यांना 5 लाख , अडीच लाख , सव्वा लाख रुपये बक्षीस देण्यात येणार आहे. त्याच बरोबर जिल्हास्तरीय पहिल्या पाच गावांना प्रत्येकी 1 कोटी इतका निधी नागरी सुविधांकरिता देण्यात येणार आहे.

## आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या कार्यालयात आयोजित

# साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी ॲड दिलिप निरगुडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सासवड शाखेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ विधीज्ञ दिलिप केशवराव निरगुडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सासवड येथील आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या कार्यालयात आयोजित साहित्य परिषदेच्या कार्यकारणी सभेत पाच वर्षांसाठी ही निवड करण्यात आली आहे.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, साहित्य परिषदेचे मावळते अध्यक्ष ॲड आण्णासाहेब खाडे यांसह कार्यकारणी सदस्य यावेळी उपस्थित होते.



या प्रसंगी निवडण्यात आलेली कार्यकारणी पुढील प्रमाणे अध्यक्ष - ॲड दिलीप केशव निरगुडे

उपाध्यक्ष - ॲड कलाताई निवृत्ती फडतरे व डॉ राजेश विजय दळवी ,. कार्याध्यक्ष - सतीश अनंतराव पाटील,

कार्यवाह - बाळासाहेब दिनकर मुळीक व संतोष एकनाथ काकडे,सह कार्यवाह -संदिप चंद्रकांत टिळेकर आणि कोषाध्यक्ष - सुनिल पांडुरंग लोणकर. याच सभेत सांस्कृतीक समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार हेमंत चंद्रकांत ताकवले, प्रसिद्धी समितीच्या अध्यक्षपदी विद्या रमेश जाधव तर कार्यक्रम समितीचे अध्यक्ष म्हणून ॲड प्रकाश म्हाळसाकांत खाडे यांची निवड करण्यात आली आहे सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे निवडीनंतर स्वागत करण्यात आले. विजय कोलते व अण्णासाहेब खाडे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. नवनियुक्त अध्यक्ष ॲड दिलिप निरगुडे यांनी सर्वांच्या एकत्रित सहभागातून परिषदेचे कामकाज अधिक गतिमान केले जाईल असा विश्वास व्यक्त केला हेमंत ताकवले यांनी आभार प्रदर्शन केले. दादा मुळीक, अक्षय पवार, शांताराम कोलते यांनी सभेचे आयोजन केले.

विजय कोलते, सुरेश कोडीतकर, वसंत ताकवले, केशव काकडे, बंडुकाका जगताप, कुंडलिक मेमाणे, जगदीश शेवते, शिवाजीराव घोगरे हे कार्यकारणी सदस्य यावेळी उपस्थित होते. प्रतिष्ठाण विविध कार्यक्रमाचे आयोजन करत असते. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे साहित्यिक क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे

#रा

### अजित पवार यांच्याकडून विकासकामांची पाहणी

# खेळाडूंना सुविधा मिळतील यादृष्टीने कामे करावीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बारामती परिसरात सुरु असलेल्या विविध सार्वजनिक विकासकामांची पाहणी केली; क्रीडा संकुलात येणाऱ्या खेळाडूंना अधिकाधिक सुविधा मिळतील यादृष्टीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन गतीने कामे पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

श्री.पवार यांनी कन्हेरी वन विभाग, जळोची उपबाजार येथील कृषी उत्पन्न बाजार समिती इमारत, फळे व भाजी हाताळणी केंद्र, मेडद येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय तसेच क्रीडासंकुल नूतन इमारत, रेशीम कोष खरेदी विक्री बाजारपेठ कोषोत्तर प्रक्रिया पथदर्शक तथा प्रशिक्षण केंद्र, गरुडबाग येथील कॅनॉलचे सुशोभिकरण, चिल्ड्रन पार्क येथे सुरू असलेल्या सार्वजनिक विकासकामांची पाहणी करुन संबंधित अधिकाऱ्याकडून माहिती घेतली.

यावेळी उपवनसंरक्षक महादेव मोहिते, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, महावितरणचे मुख्य अभियंता अंकुश नाळे आदी उपस्थित होते

क्रीडा संकुलात मॅट फिनिशिंग असलेल्या फरशा बसवा. भिंतीच्या रंगानुसार कक्ष, कक्षातील सोफा, शौचालय आदी बाबींचा विचार करुन इलेक्ट्रिकल उपकरणे वापरावीत. पुरेसा सुर्यप्रकाश, हवा खेळती राहील याची काळजी घेऊन कामे करा.

जळोची उपबाजार येथील फळे व भाजी हाताळणी केंद्राच्या परिसरात सरळ वाढणारी, सावली देणाऱ्या प्रजातींचे वृक्षारोपण करा. कृषी उत्पन्न बाजार समिती नुतन इमारतीच्या परिसरातील रस्त्याचा विचार करुन पुरेशा उंचीच्या संरक्षक भिंती उभाराव्यात. परिसरात नागरिकांसाठी बैठक व्यवस्था करावी.

कन्हेरी वनविभागात विविध प्रजातींचे वृक्षारोपण करा. यापूर्वी लावण्यात आलेल्या झाडांचे संगोपन झाले पाहिजे, याकडे लक्ष द्यावे. लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना चढ-उतर करण्यासाठी सोईस्कर पायऱ्या व बैठक व्यवस्था करावी. तलावातील पाणी व परिसर स्वच्छ राहील, याची दक्षता घ्यावी. परिसरात फिरतांना रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या झाडाच्या फांद्यांमुळे अडथळा निर्माण होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय तसेच गरुडबाग येथील कॅनॉलचे सुशोभिकरण, चिल्ड्रन पार्क येथील कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत. रेशीम कोष खरेदी विक्री बाजारपेठ कोषोत्तर प्रक्रिया पथदर्शक तथा प्रशिक्षण केंद्राच्या नूतन इमारतीचे बांधकाम करतांना समोरील मुख्य रस्त्यापेक्षा उंच जोत्याचे बांधकाम करावे.

परिसरातील विकासकामे करताना ती गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होतील, याकडे लक्ष द्या. कोणतीही कामं प्रलंबित राहणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या.

यावेळी उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार गणेश शिंदे, मुख्याधिकारी महेश रोकडे, गट विकास अधिकारी अनिल बागल, वन परिक्षेत्र अधिकारी अश्विनी शिंदे, बारामती सहकारी बँकचे अध्यक्ष सचिन सातव, बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पवार आदी उपस्थित होते.

## » Selected



बारामती शहरातील भिगवन चौकातील सिद्धी गणेश ट्रस्ट यांनी उभारलेली अयोध्या येथील श्रीराम मंदिराची रोषणाई गणेशभक्तांचे लक्ष वेधून घेत आहे.

# अन्न व औषध प्रशासनानंतर पोलिसांना जाग

## अन्न व औषध प्रशासनानंतर पोलिसांचे गुटखा विक्रेत्यांवर छापे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव :** गणपती ता. शिरुर येथे अन्न व औषध प्रशासनाने गुटखा विक्रेत्यावर छापा टाकून कारवाई करत दुकान सील केल्यानंतर रांजणगाव एमआयडीसि पोलीस खडबडून जागे झाले असून पोलिसांनी दोन दुकानांत छापे टाकून कारवाई करत दोघांवर गुन्हे दाखल केले असून सुमन संजय चौधरी व शंकर कैलास भालके असे पोलिसांनी गुन्हे दाखल केलेल्या गुटखा विक्रेत्यांची नावे आहे.

**कारवाई नामधारी राहणार का ?**

● रांजणगाव एमआयडीसि पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अनेक ठिकाणी गुटखा विक्री होत असताना अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाई नंतर पोलिसांनी गुटखा विक्रेत्यांवर कारवाईचा बगडा उगारला असून यापुढे पोलीस अशी कारवाई करणार कि आत्ता केलेली कारवाई नामधारी राहणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील संकल्प सिटी जवळ रामदेव सुपर मार्केट येथे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्न सुरक्षा अधिकारी क्रांती बारवकर यांनी छापा टाकत कारवाई करुन दुकान सील केले, यांनतर रांजणगाव एमआयडीसि पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय शिंदे, पोलीस हवालदार विलास आंबेकर, ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस शिपाई संदीप भांड, उमेश कुतवळ यांनी कल्याणी कंपनी जवळील साईबाबा किराणा व गहिनीनाथ किराणा या दुकानांमध्ये छापे टाकत दुकानांमध्ये मिळून आलेला गुटखा साठा जप्त केला, याबाबत पोलीस हवालदार ज्ञानेश्वर रमेश शिंदे वय ४५ वर्षे रा. कारेगाव ता. शिरुर जि. पुणे यांनी रांजणगाव एमआयडीसि पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी साईबाबा किराणा दुकान चालक सुमन संजय चौधरी रा. माळवाडी कारेगाव ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. मधेपूर ता. उजियापूर जि. समस्तीपूर बिहार व गहिनीनाथ किराणा दुकान चालक शंकर कैलास भालके वय २२ वर्षे रा. कारेगाव जि. हिंगोली यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय शिंदे हे करत आहे.

# शिरुरला नाकाबंदीत मिळाला गुटखा वाहतूक करणारा टेम्पो

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरुर शहरात पोलीस नाकाबंदी करत असताना पोलिसांना एक गुटखा वाहतूक करणारा टेम्पो आढळून आल्याने पोलिसांनी गुटख्या सह टेम्पो जप्त करत दोघांना अटक केली असून अक्षय भास्कर लोळगे व हर्षद अनिल डोळसे असे पोलिसांनी अटक केल्या दोघांची नावे आहे.

शिरुर शहरातील पुणे नगर महामार्गावर शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक एकनाथ पाटील, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमाने, पवन तायडे, सोनाजी तावरे, रवी काळे हे नाकाबंदी लावत असताना त्यांना एम एच १२ व्ही एफ ३२८६ हा छोटा टेम्पो आलेला दिसला, यावेळी पोलिसांनी गुटखा साठ्यासह टेम्पो जप्त करत टेम्पोतील दोघांना ताब्यात घेतले, याबाबत पोलीस हवालदार रवी तात्याबा काळे रा. शिरुर ता. शिरुर जि. पुणे यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद आल्याने पोलिसांनी गुटखा वाहतुक करणाऱ्या अक्षय भास्कर लोळगे रा. निघोज ता. पारनेर जि. अहमदनगर व हर्षद अनिल डोळसे रा. राळेगण थेरपाळ ता. पारनेर जि. अहमदनगर या दोघांवर गुन्हा दाखल करत त्यांना अटक केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंतराव गिरी हे करत आहे.

# सुपा पोलिसांनी ८ लाखांचा ऐवज केला जप्त

## घरगुती सिलेंडरमधील गॅस व्यावसायिक सिलेंडरमध्ये भरून हॉटेल व्यावसायिकांना विक्री

बारामती : घरगुती गॅस सिलेंडर मोठ्या व्यावसायिक सिलेंडरमध्ये भरून हॉटेल व्यावसायिकांना विक्री करणाऱ्या रॅकेटचा सुपा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. सुपा पोलिसांनी केलेल्या कारवाईत ७० घरगुती सिलेंडरसह एक वाहन असा जवळपास ८ लाख १५ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. तर एकावर गुन्हा दाखल करत त्याला अटक करण्यात आली आहे.

निखिल अनिल चांदगुडे (रा. खोपवाडी, ता. बारामती) असं या प्रकरणी अटक केलेल्या आरोपीचं नाव आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, सुपा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मनोजकुमार नवसरे हे पेट्रोलिंग करत असताना त्यांना खोपवाडी हद्दीत सिलेंडरने भरलेले एक वाहन येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार त्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह खोपवाडी येथील कालव्यालगतत्या ठिकाणी एक मारुती कॅरी (क्र. एमएच ११ डीडी ६९९५) ही कार जाताना दिसली. पोलिसांनी या कारची तपासणी केल्यानंतर त्यामध्ये एचपी गॅस कंपनीचे ७० गॅस सिलेंडर आढळून आले. याबाबत पोलिसांनी चालक निखिल चांदगुडे याच्याकडे चौकशी केली असता त्याने आम्ही घरगुती सिलेंडरमधील गॅस व्यावसायिक सिलेंडरमध्ये भरून तो हॉटेल व्यावसायिकांना विक्री करत असल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी निखिल चांदगुडेयाच्यावर भारतीय न्याय संहिता कलम २८७,२८८, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# पैशाच्या हव्यासापोटी लुटणारे चौघे जेरबंद

**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरुर येथील पुणे नगर महामार्गावरुन एका इसमाला कारमध्ये बसवून अपहरण करुन इसमाचे महिलेसोबत फोटो काढून व्हायरल करण्याची धमकी देत मारहाण करुन सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम तसेच नातेवाईकांकडून ऑनलाईन पद्धतीने पैसे मागवून घेऊन इसमाची चार लाख सत्तर हजार रुपयांची लूट केल्या प्रकरणी शिक्रापूर पोलिसांनी एका महिलेसह चौघांना अटक केली असून राहुल सुखदेव गायकवाड, विकास प्रकाश थिटे, अर्चना अविनाश पठारे व समीर प्रकाश शेलार असे पोलिसांनी अटक केलेलता आरोपींची नावे आहे.

निमोणे ता. शिरुर येथील संदीप ताठे यांना ८ सप्टेंबर रोजी अर्चना पठारे या महिलेने फोन करुन तुम्ही पैशाची मदत करु शकता का असे विचारले त्यावेळी ताठे यांनी माझ्याकडे पैसे नाही सांगत फोन कट केला, त्यांनतर दोन दिवसांनी महिलेने फोन करुन माझे वाघोलीत घर आहे ते घ्या मला पाच लाख द्या असे म्हणून वारंवार फोन करण्यास सुरुवात केल्याने ताठे महिलेचा फोन टाळू लागले, त्यांनतर ११ सप्टेंबर रोजी ताठे पुण्याला जाणार असताना अर्चना यांनी फोन करुन सणसवाडी येथील एल एन टी फाट्या जवळ असल्याचे सांगून ताठे यांना बोलावले, यावेळी ताठे त्यांच्या कारमधून गेले असताना अर्चना यांच्यासह राहुल गायकवाड, विकास थिटे हे कार जवळ आले, त्यांनी संदीप यांना कारमध्ये बसवून वाघोली येथील एका ठिकाणी घेऊन जाऊन अर्चना पठारे सोबत संदीप ताठे यांचे फोटो काढून घेत फोटो व्हायराल करण्याची तसेच तुझ्यावर गुन्हा दाखल करुन तुला गुन्ह्यात अडकवू अशी धमकी देऊन मारहाण करत संदीप यांच्या गळ्यातील सोन्याची चैन, अंगठ्या तसेच रोख रक्कम काढून घेतली.

# केंद्राच्या योजनेत उघड दुजाभाव खा. सुप्रिया सुळे यांचा आरोप

## पुणे जिल्ह्यातील एकाच तालुक्यासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल संताप व्यक्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती, :** केंद्र सरकारच्या वयोश्री आणि एडीप या योजना राबविताना उघड उघड दुजाभाव केला जात असल्याचा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. देशभरात सर्वाधिक नोंदणी आणि पूर्वतपासणी झालेल्या बारामती लोकसभा मतदार संघाला निधी नसल्याचे कारण दिले असून त्याच वेळी आपल्याच पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात मात्र येत्या १७ सप्टेंबर रोजी या योजनेतील साधने वाटप होत आहेत. हे कशाचे द्योतक आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला असून तातडीने निधी उपलब्ध करून दिला नाही, तर पुन्हा आंदोलन करू, असा इशारा दिला आहे.

तोंडे पाहून विद्यमान सरकार देशातील गोरगरीब जनतेला न्याय देते का, असा संशय येण्यासारखी परस्थिती उघड दिसत आहे. वयोश्री आणि एडीप योजने अंतर्गत दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना सहाय्यभूत साधने मिळावीत यासाठी बारामती तालुक्यातील सर्व गावांमध्ये तब्बल एक लाखाहून अधिक लाभार्थ्यांची पूर्वतापसणी झाली आहे. त्यांना साधने मिळावीत यासाठी गेली दोन वर्षे आम्ही केंद्र सरकारकडे पाठपुरावा करत आहोत. बारामती लोकसभा मतदारसंघ आणि पुणे जिल्ह्यात या योजनांचे काम अतिशय उत्तम झाले आहे. जिल्ह्याभरात पुर्वतपासणी शिबिरे घेण्यात आली. मोठ्या प्रमाणात लाभार्थ्यांची नोंद करण्यात आली आहे. परंतु दोन्ही योजनांखाली वितरीत होणाऱ्या सहाय्यभूत साधनांचे वाटप निधीअभावी अद्यापही करता आले नाही. यासाठी केंद्रीय मंत्री वीरेंद्र कुमार यांची वारंवार भेट घेऊन पाठपुरावा केला, आंदोलन केले, संसदेत प्रश्न मांडला परंतु आम्हाला 'निधी उपलब्ध नाही' असे कारण वारंवार दिले जाते. एकीकडे निधीच्या अभावी साधनांचे वाटप रखडले असताना दुसरीकडे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात मात्र एडिप योजनेच्या अंतर्गत १७ सप्टेंबर २०२४ रोजी सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यात येत आहे. जर केंद्र सरकारकडे सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्यासाठी निधी नाही तर एकाच तालुक्यासाठी साधनांचे वाटप करण्यासाठी तो कसा उपलब्ध झाला? शासनाने एखादी योजना राबविताना समान संधीचे धोरण ठेवले पाहिजे.



# अंतर्गत रस्ते दुरुस्तीसाठी ३९ कोटींचा निधी मंजूर

## खा.सुप्रिया सुळे यांच्या पाठपुराव्याला यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती, :** खासदार सुप्रिया सुळे यांच्या पाठपुराव्याला अपेक्षित यश आले असून बारामती लोकसभा मतदार संघातील वेगवेगळ्या तालुक्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत एकूण ३८ कोटी ४० लाख ८७ हजार इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून बारामती, दौंड, इंदापूर, मुळशी, भोर आणि वेल्हा तालुक्यातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. आता निधी मंजूर झाल्याने तातडीने कामे पूर्ण करावीत, म्हणजे स्थानिक नागरिकांच्या अडचणी दूर होऊन वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल,

**मंजूर झालेल्या निधी मधून करायची कामे पुढील प्रमाणे -**

**बारामती तालुका :** माळेगाव कारखाना ते २२ फाटा खांडज रस्त्यासाठी केंद्र सरकारकडून २०६.५३ लाख आणि राज्य शासनाकडून - १४२.९२ लाख असे एकूण ३४९.४५ लाख रुपये मंजूर

**दौंड तालुका :** एमआरएल १२ एस एच ६८ ते मोगरवाडी ते दहिटने रस्त्यासाठी केंद्र सरकार कडून १४७.२८ लाख आणि राज्य शासनाकडून - ११०.०९ लाख असे एकूण किंमत - २५७.३७ लाख रुपये मंजूर

**इंदापूर तालुका:** वांगली ते गलांडवाडी नरूटवाडी रस्त्यासाठी केंद्र सरकारकडून २२६.५१ लाख आणि राज्य शासनाकडून १७४.६६ लाख असे एकूण ४०१.१७ लाख रुपये मंजूर

**मुळशी तालुका:** पिंपळोली ते पाचणे रस्त्यासाठी केंद्र सरकारकडून ३८२.५८ लाख आणि राज्य शासनाकडून २८१.८६ लाख असे एकूण ६६४.४४ लाख रुपये तसेच भांबुर्डे ते बरपे रस्त्यासाठी केंद्र सरकारकडून २९६.६ लाख आणि राज्य सरकारकडून २१५.४१ लाख असे एकूण ५१२.०१ लाख रुपये मंजूर

**भोर तालुका :** कुसगाव खोपी कांजळे साळवडे ते वर्वे बुद्रुक रस्त्यासाठी केंद्र सरकारकडून ३३७.४३ लाख आणि राज्य शासनाकडून २२४.९६ लाख असे एकूण ५६२.३९ लाख रुपये मंजूर.

**वेल्हा तालुका :** केळद ते निगडे कुंभे रस्त्यासाठी ३४०.५७ लाख आणि राज्य शासनाकडून २३८.०३ लाख असे एकूण ५७८.६ लाख रुपये तसेच घोल ते रायगड जिल्हा सीमेपर्यंत रस्त्यासाठी केंद्र सरकारकडून ३००.९६ लाख आणि २१४.४८ लाख असे एकूण ५१५.४४ लाख रुपये मंजूर

### केंद्र सरकारच्या सहकारी संस्थांबाबतच्या नवीन कायद्याची माहिती घेऊन

# विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी व्यवसाय उभे करावेत : दिलीप वळसे पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी आता फक्त कर्ज घेऊन वाटप करणे आणि वसूल करणे एवढेच काम करणे अपेक्षित नसून आता केंद्र सरकारच्या सहकार विभागाने आणलेल्या नवीन कायद्यानुसार या संस्थांना १५१ प्रकारचे विविध व्यवसाय करण्यास परवानगी दिली आहे. संस्थांच्या चेअरमन आणि सोसायट्यांनी या योजनांची माहिती घेऊन योजना राबवाव्यात, असे आवाहन राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले.





अवसरी (ता. आंबेगाव) येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या कवयित्री शांता शेळके सभागृहात पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्यावतीने आयोजित सहकार परिषद व बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश तिटकारे, सहकारी संस्थाचे पुणे ग्रामीण जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब भेंडे आदी उपस्थित होते.

उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांना बक्षीस वितरण आणि सहकार क्षेत्रात घडत असलेले बदल आणि त्या अनुषंगाने संस्थांनी निश्चित करावयाची दिशा या अनुषंगाने या सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे सांगून मंत्री श्री. वळसे पाटील म्हणाले, संस्था जपली तर आपल्याला त्यांची मदत होईल. शेतकऱ्याला पीक कर्ज, अन्य कोणतेही कर्ज वाटप, शैक्षणिक कर्ज आदींसाठी जिल्ह्यात चांगले काम आहे. सोसायट्यांनी शिस्तीने कारभार केला नाही तर तोटा वाढतो, कर्ज वाटप करून वसूली होत नसल्याने तोटा वाढतो व सोसायटी बंद पडली तर त्याचा त्रास शेतकऱ्याना होतो. बऱ्याच सोसायट्या अनिष्ट तफावतीमध्ये जातात. सोसायटीत अडचणीत आल्यास शेतकऱ्याला कर्जासाठी सावकाराकडे जावे लागते. ते किती तरी जास्त टक्केवारीने घेत असल्याने लोकांना त्रास होतो. त्यामुळे आपल्या संस्था जपल्या पाहिजेत आणि चांगल्या प्रकारे कारभार केला पाहिजे, असेही ते म्हणाले.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सर्व अटी शर्ती पूर्ण करून देशात प्रथम क्रमांकावर आली आहे. जिल्हा बँक महिला स्वयंसहायता गटांना ४ टक्के दराने थेट कर्ज देते. मात्र या बाबतचे अधिकाधिक कर्ज वाटप व वसूल करण्यासाठी संस्थांच्या आणि बँकेच्या कर्मचाऱ्यांनी स्वतःहून पुढाकार घ्यावा. जास्तीत जास्त महिलांना कर्ज वाटप करावे, असेही ते म्हणाले.

अडचणीतील सोसायट्यांना मदत करण्याची शासनाची भूमिका आहे. मंत्रिमंडळाने सोसायट्यांच्या सचिवांच्या संवर्गाचे (केडर) पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद केली असून त्यादृष्टीने काम चालू आहे.

वेळेत पीक कर्ज परतफेड केलेल्या शेतकऱ्यांकडून व्याज वसूल न करता फक्त मुद्दल वसूल केल्यामुळे त्याचा व्याज परतावा जिल्हा बँकेला देण्याच्या अनुषंगाने शासन पातळीवरून लवकरच कार्यवाही केली जाईल, अशी ग्वाही देखील त्यांनी यावेळी दिली.

#रा

### कार्यकर्त्यांसाठी त्यांचे ‘भावी मुख्यमंत्री’ ठरले

# महायुतीत सूप्त स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाविकास आघाडीत विधानसभा मतदानाआधी मुख्यमंत्री पदाचा उमेदवार निश्चित करण्यावरून मतभेद समोर आल्यानंतर आता राज्याच्या मुख्यमंत्रीपदासाठी महायुतीतदेखील मोठी रस्सीखेच सुरू झाल्याचे चित्र आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुतीतील नेत्यांमध्ये खडाजंगी उडत आहे. अशातच बॅनरच्या माध्यमातून आपलाच मुख्यमंत्री राहणार अशा इच्छा प्रकट केल्या जात आहेत. कार्यकर्त्यांकडून आपापल्या नेत्यांच्या मुख्यमंत्रीपदासाठीच्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.

नांदेडमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भावी मुख्यमंत्री म्हणून बॅनर्स लागले आहेत. शहरातील अनेक मुख्य चौकात हे बॅनर लागल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. सध्या या बॅनरची जोरदार चर्चा सुरू आहे. महायुतीत जागा वाटपावरून आणि मुख्यमंत्री पदावरून सूप्त स्पर्धा असल्याचे यातून स्पष्ट होत आहे. ही अंतर्गत चुरस आता खुलेपणे समोर येताना दिसत आहे.

दुसरीकडे, बारामतीतदेखील उपमुख्यमंत्री अजित पवारांचे भावी मुख्यमंत्री म्हणून बॅनर लागले आहेत. सध्या गणेश उत्सव साजरा केला जात आहे. बारामतीतील अखिल भारतीय तांदुळवाडी वेस या गणपती मंडळाने अजित पवारांचा भावी मुख्यमंत्री असा उल्लेख केलेला बॅनर सगळ्यांचे लक्ष वेधून घेत आहे. गेल्या अनेक दिवसापासून बारामतीतील कार्यकर्त्यांची इच्छा अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत, अशी इच्छा आहे. या आधी देखील अनेक वेळा अजित पवारांचे भावी मुख्यमंत्री म्हणून फ्लेक्स लागले होते.

#### देसाई यांचे दगडूशेठला साकडे

● राज्याचे गृह राज्यमंत्री शंभूराज देसाई यांनी पुण्यातील दगडूशेठ गणपती मंदिराचे दर्शन घेतले त्या वेळी त्यांनी दगडूशेठ गणपतीला साकडे घातले. माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले, दगडूशेठ गणपतीसमोर सांगतो, महायुतीला बहुमतापेक्षा जास्त जागा मिळणार आणि पुन्हा महायुती सत्तेत येणार. आमचे नेते एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावेत असे मला वाटते. मात्र, मुख्यमंत्री पदाचा निर्णय महायुतीचे तिन्ही नेतेच घेतील, असे देसाई पुढे म्हणाले.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## उरलेल्या फटाक्यातून नाथाभाऊंचे स्वागत : महाजन



**जळगाव :** आमदार एकनाथ खडसे यांच्याबाबतचा निर्णय दिवाळीनंतर घेण्यात येणार असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटल्याच्या पार्श्वभूमीवर दिवाळीच्या उरलेल्या फटाक्यातून आम्ही नाथाभाऊंचं स्वागत करू, अशी खोचक आणि बोचरी टीका भाजपचे नेते गिरीश महाजन यांनी केली आहे. खडसे भाजपमध्ये आहेत की राष्ट्रवादीत हे अजून स्पष्ट झालेले नाही. आधी भाजपमध्ये जाणार असल्याचे सांगणारे खडसे आता अचानक शरद पवार गटातच आहोत असे सांगत आहेत. त्यामुळे संभ्रम अधिकच वाढला आहे. खडसे यांचा दिवाळीनंतर भाजप पक्षप्रवेश होत असेल तर आम्ही दिवाळीच्या उरलेल्या फटाक्यातून खडसेंचे आम्ही स्वागत करू. देवेंद्र फडणवीस खडसेंच्या पक्षप्रवेशाबाबत सांगत आहेत तर मग कोणाचा विरोध राहील? खडसे भाजपमध्ये येणार म्हटल्यावर थोडे जास्तीचे फटाके आम्ही घेऊन ठेवू, असा टोला महाजन यांनी लगावला आहे. जिल्ह्यातील रस्ते खराब असल्याने ग्रामस्थांमध्ये रोष निर्माण झाला आहे. त्यावर महाजन म्हणाले, लिही तांडा या ठिकाणी सरपंचांच्या घरी जाताना गाडी जात नसल्याने कार्यकर्त्यांच्या दुचाकीवर गेलो. काही ठिकाणी रस्ते तुंबलेले होते. त्याचे काम करून घेण्यास मी कार्यकर्त्यांना सांगितले आहे. पण त्याचा विपर्यास केला गेला. खोलगट भागात पाणी साचल्याने त्यातून आम्ही गाडी टाकली, एवढाच विषय आहे. मात्र, विरोधकांनी त्याचा विपर्यास केला आहे, असे महाजन म्हणाले.

» Selected

## भंडाऱ्याच्या जेवणातून ११३ विद्यार्थ्यांना विषबाधा

**जळगाव :** पारोळा तालुक्यातील शिवरे दिगर येथे सारंग माध्यमिक विद्यालयात गणपती विसर्जनानिमित्त ठेवलेल्या भंडाऱ्याच्या जेवणातून तब्बल ११३ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली आहे. या भंडाऱ्यात शाळेतील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी जेवण केले. या विद्यार्थ्यांना तामसवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहेत. सध्या त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या घटनेनंतर आमदार चिमणराव पाटील, माजी मंत्री डॉ. सतीश पाटील, डॉ. हर्षल माने, डॉ. संभाजी पाटील यांनी विद्यार्थ्यांची भेट घेतली. या भंडाऱ्यात वरण-भात, गुलाब जामुन, भाजी असे जेवण होते. यावेळी शिक्षक आणि विद्यार्थी मिळून हे जेवण जेवले. जेवल्यानंतर काही विद्यार्थी-विद्यार्थिनींना उलट्या, चक्कर, मळमळ होणे, हातपाय गळणे असा त्रास होऊ लागला.

## लग्नाचा तगादा; तृतीयपंथीयाचा खून

**सातारा :** प्रेमसंबंधातून तृतीयपंथीयाने लग्नाचा तगादा लावल्याने त्याचा गळा आवळून खून प्रकरणाचा तपास सहा तासांत लावण्यात म्हसवड पोलिसांना यश आले. याप्रकरणी समाधान विलास चव्हाण (रा. दिवड, ता. माण) यास पोलिसांनी अटक केली. मृत तृतीयपंथी राशी ऊर्फ राहुल अजिनाथ घुटुकडे (वय २५) याचा खून करून वीजवाहक तारेने मृतदेहाच्या कंबरेस वजनदार दगड बांधून विहिरीत टाकून दिल्याची घटना म्हसवड (ता. माण) येथे घडली. एका विहिरीत अनोळखी मृतदेह कुजलेल्या स्थितीत दिसल्याचे कळवले गेले. हातावर गोंदलेल्या नावाच्या आधारे मृताच्या नातेवाइकांचा शोध घेतला. ही माहिती समाजमाध्यमावर प्रसारित केली. त्या वेळी मृताच्या नातेवाइकांचा संपर्क झाला. मृताचे आणि संशयित समाधान विलास चव्हाण यांचे प्रेमसंबंध असल्याचे निष्पन्न झाले. त्याने खुनाची कबुली दिली. लग्न कर आणि मला घरी घेऊन चल, असा तगादा लावला होता, म्हणून मी त्यास ठार मारल्याचे त्याने सांगितले.

# महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलू : पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**धुळे :** एकदा राज्य हातामध्ये द्या, महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष यांनी केले.

पवार यांचा शिंदखेडा येथे शेतकरी मेळावा पार पडला. या मेळाव्यात बोलताना पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह राज्यातील महायुतीच्या नेत्यांवर हल्लाबोल केला. ते म्हणाले, ‘आज सत्तेचा गैरवापर, गुंडगिरी सुरु झाली.

खोटे गुन्हे दाखल करण्यात येऊ लागले आहेत. दमदाटी करण्याचे प्रकार वाढले. लोकांना तुरुंगात टाकण्याचे प्रकार होऊ लागले. सत्ता ही लोकांच्या कामांसाठी असते. पण काही लोकांकडे सत्ता हातात आल्यानंतर सत्ता डोक्यात शिरते आणि सत्तेचा गैरवापर होतो.

सध्या राज्याची सत्ता चुकीच्या लोकांच्या हातामध्ये सत्ता आहे. ती सत्ता उद्या संधी मिळाल्यानंतर त्यांच्या हातातून काढून घेत महाविकास आघाडीच्या हातात देण्याचे काम तुम्हाला करायचे आहे. देशातील शेती खात्याचा कारभार १० वर्ष मी सांभाळला. हा देश बळीराजाचा देश आहे. असं असताना गहू आणि तांदुळ परदेशातून आणायचे. मी गव्हाची आणि तांदळाची किंमत वाढवली. भारत देश १० वर्षात जगातील गहू निर्यात करणारा दोन नंबरचा देश बनला. देशातील सर्व शेतकऱ्यांचं ७१ हजार कोटी रुपयांचं कर्ज माफ केलं, असेही ते म्हणाले.

## पिकअप व इकोची धडक; ४ जागीच ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**धुळे :** शिंदखेडा तालुक्यात दसवेल फाट्याजवळ पिकअप व्हॅन आणि इको गाडीची समोरासमोर धडक होऊन चार जणांचा जागीच मृत्यू झाला. एक जण गंभीर जखमी आहे.

रात्री दोन वाजण्याच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. नरडाणा येथे भागवत कथेचा कार्यक्रम आटपून परतताना इको व्हॅनला दसवेल फाट्याजवळ भरधाव पिकअपने त्यांच्या व्हॅनला जोरदार धडक दिली. मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे. दोन्ही गाड्यांचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमीला उपचारासाठी हिरे वैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पिकअप वाहनाचा चालक हा मद्यधुंद अवस्थेत असल्याचे प्रत्यक्षदर्शींकडून सांगण्यात आले.

# अधिकारी महिलेचा मृत्यू; पतीचा आत्महत्येचा प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जळगाव :** शासकीय आशादीप संस्थेच्या अधिक्षिका मयुरी राऊत यांचा हृदयविकाराच्या झटक्याने झाल्यानंतर हा धक्का सहन न होऊन त्यांचे पती आणि जिल्हा परिषदेतील कार्यकारी अधिकारी देवेंद्र राऊत यांनीही आत्महत्येचा प्रयत्न केला.

राऊत यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेला जिल्हा परिषद मुख्याधिकारी अंकित जबाबदार असल्याचा आरोप मयुरी राऊत यांचे वडील भाऊसाहेब करपे यांनी केला. अंकित यांनी देवेंद्र राऊत यांना सातत्याने अपमानास्पद वागणूक दिली. त्यामुळे मानसिक तणावातून ही घटना घडली असल्याचा गंभीर आरोप करपे यांनी केला. मानसिकदृष्ट्या टॉर्चर करणाऱ्या मुख्याधिकारी अंकित यांच्यावर कारवाई केली जात नाही तोपर्यंत मुलीचा मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा इशारा मृत मयुरी राऊतांच्या वडिलांनी दिला आहे.

याबाबत पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, राऊत यांना त्यांच्या पत्नी रुग्णालयात उपचारासाठी घेऊन गेल्या होत्या. राऊत यांच्यावर उपचार सुरू असताना त्या फोनवर बोलत असताना अचानक हृदयविकाराचा झटका आला. त्यांच्या पतीला समजल्यानंतर त्यांनी आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यांना दोन वर्ष आणि सहा वर्षाच्या मुली आहेत. ते संगमनेरचे राहणारे आहेत. पोस्टमार्टम रिपोर्ट येत नाही तोपर्यंत याबाबत स्पष्टता होणार नाही.

पंतप्रधानांच्या कार्यक्रमात राऊत यांना चांगलं काम केलं म्हणून सीईओंच्या हातून बक्षीस देण्यात आले. त्यामुळे त्यांच्यात तणाव असेल असे वाटत नाही.

## गणपती बाप्पा मोरया...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



» मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या शासकीय वर्षा निवासस्थानी विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दर्शन घेऊन आरती केली.

# गलवानमधील चिनी सैन्य मागे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पूर्व लडाखमधील सैन्य चीनने मागे घेतले आहे. लडाखमधील गलवानसह चार ठिकाणांचे सैन्य मागे घेतल्याची कबुली चीनने दिली आहे.

भारत आणि चीन यांच्यात सीमा वाद कायम राहिला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हा वाद मिटू शकला नाही. त्यामुळे दोन्ही देशांचे सैन्य समोरासमोर आल्याच्या घटना मागील काही वर्षांत घडल्या होत्या. त्यावेळी दोन्ही सैन्यात चकमकही झाली होती. परंतु आता भारत - चीन सीमा वाद सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्यात झालेल्या चर्चेनंतर चीनने सैन्य मागे घेतल्याची माहिती चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनाद्वारे दिली आहे.

चीन परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्त माओ निंग यांनी सांगितले की, दोन्ही सैन्याने चार ठिकाणांवरुन माघार घेतली आहे. सीमेवर परिस्थिती स्थिर आहे. दोन्ही देशांच्या सैन्याने चीन-भारत सीमेच्या पश्चिमेकडील सेक्टरमधील चार पॉइंट्सवरून मागे जाण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे, ज्यामध्ये गलवान व्हॅलीचा समावेश आहे. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी जिनिव्हा येथे शुक्रवारी दिलेल्या वक्तव्यानंतर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाची ही टिप्पणी आली आहे.

जयशंकर म्हणाले होते की, चीनसोबतच्या सैन्य माघारी संबंधित समस्यांपैकी ७५ टक्के समस्या सोडवण्यात आल्या आहेत. मात्र सीमेवरील वाढते लष्करीकरण हा मोठा मुद्दा आहे.

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि वांग यांच्यातील बैठकीचा तपशील देताना चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, चीन-भारत संबंधांमध्ये स्थिरता दोन्ही देशांच्या लोकांच्या दीर्घकालीन हिताचे आहे. त्यामुळे दोन्ही देशांत प्रादेशिक शांतता राहणार आहे. चीन आणि भारत सरकार परस्पर सामंजस्य राखणे, विश्वास वाढवणे, सतत संवाद राखणे आणि द्विपक्षीय संबंधांना चालना देणे यावर भर देणार आहे. भारत आणि चीनने गुरुवारी पूर्व लडाखमधील सैन्य संपूर्ण माघारी घेण्याचे ठरवले होते, असे भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# ‘अंतरवाली दगडफेकीशी रोहित पवार, टोपेंचा संबंध’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नाशिक :** गेल्या वर्षी अंतरवाली सराटीत मराठा आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली तेव्हा मनोज जरांगे पाटील तिथून निघून गेले व त्यानंतर पोलिसांनी मराठा आंदोलकांवर लाठीमार केला. यानंतर रात्री दोन वाजता रोहित पवार आणि स्थानिक आमदार राजेश टोपे यांनी मनोज जरांगे यांना पुन्हा त्या ठिकाणी बसवले, असा दावा अजितदादा गटाचे नेते छगन भुजबळ यांनी केला.

भुजबळ म्हणाले की, यानंतर तिकडे शरद पवार, मग उद्धव ठाकरेदेखील गेले. पवार आणि उद्धव यांना पोलिसांवर दगडफेक झाल्याची कल्पना नव्हती. आंदोलकांच्या दगडफेकीत ८० पोलीस कर्मचारी जखमी झाले होते. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. त्यांनी अंतरवाली सराटीत स्वसंरक्षणासाठी लाठीमार केला, हे ठाकरे आणि पवार यांना माहिती नसल्याचे भुजबळ यांनी म्हटले.

रोहित पवार आणि राजेश टोपे अंतरवाली सराटीत आल्याने या प्रकरणातील एकच बाजू समोर आली. याचा फायदा पुढे मनोज जरांगे पाटील यांना झाला. मात्र, अंतरवाली सराटीमध्ये घडलेल्या दगडफेकीत रोहित पवार आणि राजेश टोपे यांचा वाटा आहे, असे तेथील लोकच सांगत असल्याचे भुजबळ यांनी म्हटले.

लोकसभेचा व विधानसभेचा निकाल वेगळा असतो. केंद्राचे प्रश्न लोकसभेच्या वेळी वेगळे होते. त्यामध्ये फेक नेरेटिव्ह सेट झाले, संविधान बदलणार त्याचा परिणाम झाला. तो प्रश्न इथे नाही. महायुती सरकारची लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांच्या योजना, विद्यार्थ्यांना स्टायपेंड, मुलींना डिग्री, शिक्षण मोफत, तीन सिलेंडर फुकट या सगळ्या योजनांचा परिणाम पाहता निश्चितपणे राज्यात महायुतीचे सरकार परत येईल, असा विश्वास भुजबळ यांनी व्यक्त केला.

### उत्पादकांना गणराय पावला; साध्या फुलांची शंभरी

# अतिदर्जेदार झेंडू ३०० रुपये किलो !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** गणेशोत्सवात दर फुलल्यामुळे झेंडू उत्पादकांना गणराय पावला आहे. वाढीव दरामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे. ‘गोल्डन यलो’ आणि ‘गोल्डन ऑरेंज’ जातीची झेंडूची फुले ही किरकोळ बाजारात गणेशोत्सवात ३०० रुपये किलो दराने विकली गेली.

४० रुपये किलो असा दर असलेल्या झेंडूने गणेशोत्सवात मात्र घाऊक बाजारात शंभरी गाठली आहे. गणेशोत्सवापूर्वी बाजारात झेंडूच्या फुलाचे दर पडल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंता दिसून येत होती. यंदा सतत पाऊस असल्याने झेंडूची लागवड कमी झाली आहे. शिवाय, ज्यांनी लागवड केली त्यांचा उगवलेला झेंडूदेखील सततच्या पावसामुळे खराब झाला आहे. दुसरीकडे, ढगाळ वातावरणामुळे यंदा झेंडूवर रोगाचा प्रादुर्भावदेखील अधिक प्रमाणात आहे.


ज्या भागात पाऊस कमी झाला त्या ठिकाणी झेंडुचे उत्पादन चांगले आले. या शेतकऱ्यांचा माल सध्या बाजारात येत आहे. सध्या बाजारात लाल पिवळ्या रंगांची झेंडूची फुले आहेत. यामध्ये लाल-केशरी रंगात ऑरेंज, कलकत्ता, जंबो आदी जाती आहेत; तसेच पिवळ्या रंगात ‘स्मार्ट यलो’, कांचन, श्रावणी जातीची फुले विक्रीसाठी आली आहेत.

पिवळ्या झेंडूचा दर शंभर रुपये किलोपर्यंत पोहचला आहे. मागणी अधिक असल्याने केशरी रंगाच्या झेंडूचा दर किलोला शंभरी पार करत सव्वाशे झाला आहे. शेवंतीच्या फुलाचीसुद्धा आवक मोठी आहे. शेवंतीचा दर सध्या दीडशे ते दोनशे रुपयापर्यंत आहे. पुण्या-मुंबईच्या घाऊक बाजारात सातारा, सांगली येथून जास्त आवक आहे. यंदा महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने फूलबागांचे नुकसान झाले आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत कर्नाटकमधील बंगळुरूला जेमतेम पाऊस असल्याने बागा वाचल्या आहेत. घाऊक बाजारात बंगळुरूची फुले सध्या मोठ्या प्रमाणात येत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. स्थानिक फुलांच्या दराला परप्रांतांतील फुलांची स्पर्धा करावी लागत आहे.

शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात झेंडूची लागवड करण्याचा प्रयत्न केला; परंतु पाणी साचणाऱ्या शेतामध्ये यंदा सततच्या पावसाने उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. पावसाने उघडीप दिल्याने दसरा, दिवाळी डोळ्यासमोर ठेवून शेतकरी झेंडूची चांगलीच काळजी घेत आहेत.

#### केशरी झेंडूला अधिक दर

● पाऊस जास्त झाल्यामुळे दादर फूल मार्केटमध्ये मालाची आवक कमी आहे. रोगाचा प्रादुर्भाव असल्याने चांगल्या दर्जाची फुले येत नाहीत. चांगल्या दर्जाच्या झेंडूला दर देखील चांगला आहे. महाराष्ट्रापेक्षा बंगळुरूहून अधिक माल बाजारात येत आहे. सध्या झेंडूच्या पिवळ्या वाणापेक्षा केशरी वाणाला अधिक दर आहे.




#रा

राष्ट्रसंचार SPECIAL

# केजरीवाल यांचे राजीनामा अस्त्र

## विधानसभा बरखास्त करणार नाही; नोव्हेंबरमध्ये निवडणुका घेण्याचे केले आवाहन



**नवी दिल्ली :** मी दोन दिवसांनी दिल्लीच्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देणार आहे. जोपर्यंत जनता निकाल देत नाही तोपर्यंत मी मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसणार नाही. मी आणि मनीष सिसोदिया जनतेमध्ये जाऊ, अशी घोषणा दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी आज ( दि. १५) केली. दिल्ली विधानसभा विसर्जित होणार नाही. माझ्या जागी दुसरे मुख्यमंत्री असतील, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. आप कार्यालयात कार्यकर्त्यांना संबोधित करताना ते बोलत होते. अरविंद केजरीवाल यांना दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयातून शुक्रवारी जामीन मंजूर झाला होता. केजरीवालांनी आज आप कार्यालयात कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी त्यांनी मोठी घोषणा करत दोन दिवसांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देणार असल्याचे सांगितले. केजरीवाल म्हणाले की, देवाचा आपल्या सर्वांवर मोठा आशीर्वाद आहे. म्हणूनच आपण मोठ्या समस्यांशी लढतो आणि विजयी होऊन बाहेर पडतो. यासह मी लाखो लोकांचे आभार मानतो, ज्यांनी आमच्या साथीदारांसाठी प्रार्थना केली. भाजपला आम आदमी पार्टी फोडायची होती. तुरुंगात राहिल्याने मनोबल वाढले आहे. दिल्लीतील नायब राज्यपालांना पत्र लिहिले आहे. मी त्यांना पत्र लिहिले तेव्हा कौटुंबिक भेटीगाठी बंद करण्याच्या धमक्या देण्यात आल्या होत्या, असेही त्यांनी सांगितले.

## लवकर निवडणुका व्हाव्यात म्हणून...

**नवी दिल्ली :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. कथित दारू घोटाळ्यात अनेक महिने तुरुंगात राहिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयातून जामिनावर बाहेर आलेल्या केजरीवाल यांनी आपल्या खेळीने सर्वांना चकीत केले आहे. आपल्या पदावर कायम राहण्यावर ठाम असलेल्या केजरीवाल यांनी रविवारी कार्यकर्त्यांना संबोधित करताना दोन दिवसांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार असल्याचे सांगितले. अशा तऱ्हेने केजरीवाल यांनी अचानक राजीनामा का दिला आणि दिल्लीत लवकर निवडणुका होऊ शकतात का, असा प्रश्न आहे.

दारु घोटाळा प्रकरणाचा निकाल लागण्यासाठी १० वर्षे लागतील, पण त्याआधी जनतेचा निर्णय हवा आहे, असे केजरीवाल यांनी म्हटले आहे. जोपर्यंत जनता त्यांना निर्दोष सांगत नाही, तोपर्यंत ते मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसणार नाहीत. दिल्लीत फेब्रुवारीमध्ये निवडणुका होणार आहेत, पण आता त्या नोव्हेंबरमध्येच घ्याव्यात, अशी त्यांची मागणी आहे. मात्र, त्यांनी विधानसभा बरखास्त करण्याची घोषणा त्यांनी केलेली नाही. विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत नव्या मुख्यमंत्र्यांची निवड केली जाईल, असेही त्यांनी म्हटले आहे. विधानसभा बरखास्त झालेली नसेल आणि सरकारचे कामकामज चालत असेल, तर निवडणूक आयोगाला मुदतपूर्व निवडणुका घेण्याचे कोणतेही कारण नाही. केजरीवाल यांना खरोखरच निवडणुका हव्या असतील, तर त्यांनी विधानसभा बरखास्त करण्याची शिफारस करावी, असेही विश्लेषकांचे म्हणणे आहे. केजरीवाल



यांना जामीन मंजूर करताना, त्यांना विधानसभेत प्रवेश करण्यापासून मज्जाव करण्यात आला आहे. तसेच त्यांना कोणत्याही कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यासही मनाई आहे. त्यांना न्यायालयात सुनावणीसाठी उपस्थित राहणे, अनिवार्य आहे. मुख्यमंत्री म्हणून काम करता येणार नसल्यानेच, राजीनामा देण्याची घोषणा करत, जनतेची सहानुभूती मिळावी, यासाठी हा उद्योग केला आहे, असेही विश्लेषकांचे म्हणणे.

नोव्हेंबरमधील निवडणूकही दिल्लीत शक्य नाही कारण निवडणुकीपूर्वी बरीच तयारी करावी लागते आणि त्यासाठी ठराविक वेळ लागतो. दिल्लीतील मतदार यादी अद्ययावत करण्याचे काम अद्याप बाकी आहे. निवडणूक आयोगाने मतदार यादीचे विशेष पुनरावलोकन करून १ जानेवारी २०२५ च्या संदर्भात एनसीटी दिल्लीची मतदार यादी अद्ययावत करण्याचे आदेश दिले आहेत. मतदार यादी प्रसिद्ध करण्याची शेवटची तारीख ६ जानेवारी २०२५ आहे. फेब्रुवारीमध्येच दिल्लीत निवडणुका होण्याची शक्यता आहे.

### राजीनाम्याची घाई कशासाठी?

- भ्रष्टाचारविरोधी चळवळीच्या गर्भातून जन्मलेले पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांच्यावर गेल्या दोन वर्षांपासून कथित दारू घोटाळ्याचे आरोप आहेत. स्वत:ला 'प्रामाणिक' म्हणवणाऱ्या केजरीवाल यांना याचा फटका बसला आहे. भाजप त्यांच्याविरोधात आक्रमक आहे. अशा तऱ्हेने केजरीवाल यांनी राजीनाम्याचा डाव मांडला आहे. घोटाळ्याचे आरोप झाल्यानंतरही केजरीवाल खुर्चीला चिकटून आहेत, अशी भाजपकडून सातत्याने केजरीवाल यांच्यावर टीका केली जात होती. दिल्लीत अनेक कामे रखडली होती. सर्वोच्च न्यायालयाने ज्या पद्धतीने त्यांना मुख्यमंत्री कार्यालय आणि सचिवालयात जाण्यास बंदी घातली आहे, त्यामुळे केजरीवाल यांना निवडणुकीपूर्वी जे काम करायचे आहे, ते पूर्ण होत नाही. नव्या मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून त्यांना निवडणुकीच्या दृष्टीने घोषणा जाहीर करायच्या आहेत. अशा पद्धतीने विरोधकांच्या आरोपांना उत्तर देण्याबरोबरच, स्वतःची प्रतिमा जपण्यासाठी त्यांनी राजीनामा अस्त्र बाहेर काढले आहे, असे म्हणता येईल.

### भाजपला प्रत्युत्तर

केजरीवाल यांची रवानगी कारागृहात झाल्याबरोबरच, त्यांच्या राजीनाम्याची मागणी भाजपकडून करण्यात आली होती. आताही दिल्ली सरकारचे कामकाज ठप्प झाल्यामुळे केजरीवाल यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी भाजपने केली होती. त्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्रही पाठवले होते. लोकशाही वाचवण्यासाठी, आपण तुरुंगातून राजीनामा दिला नाही, मला भाजपची राजकारणाची पद्धत बदलायची होती, असा केजरीवाल यांनी दावा केला आहे.

कार्यकर्त्यांना संबोधित करताना केजरीवाल म्हणाले की, या लोकांनी मला तुरुंगात का पाठवले, मी भ्रष्टाचार केला म्हणून नाही, हे तुम्हाला माहीत आहे. आम आदमी पक्षाला तोडण्याचा त्यांचा हेतू होता. त्यांनी एक फॉर्म्युला तयार केला आहे. आमदार मोडून काढा, आमदार विकत घ्या, त्यांना घाबरवण्यासाठी ईडी-सीबीआय पाठवा, पक्ष मोडून काढा, पक्ष पाडून सरकार स्थापन करा. केजरीवाल यांना तुरुंगात पाठवून, पक्ष मोडून ते दिल्लीत सरकार स्थापन करण्याच्या प्रयत्नात होते. मात्र, आमचा पक्ष फुटला नाही. आमचे कार्यकर्तेही तुटले नाहीत, असा दावा त्यांनी केला. नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारले आहे की, सरकार तुरुंगातून चालवले जाऊ शकत नाही का, म्हणजे सरकार तुरुंगातून चालवले जाऊ शकते.

## न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच

**कोलकाता :** कोलकात्यातील आरजी मेडिकल कॉलेजमधील निवासी डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्यानंतर कनिष्ठ डॉक्टरांनी आपल्या मागण्यांसाठी पाच दिवसांपासून पश्चिम बंगालच्या आरोग्य मंत्रालयाबाहेर धरणे आंदोलन सुरू केले आहे. शनिवारीही मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याशी डॉक्टरांची चर्चा निष्फळ ठरली. बॅनर्जी यांच्याशी चर्चा करणाऱ्या शिष्टमंडळातील डॉ. आकिब म्हणाले की, न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहणार आहे.

आंदोलकांना संबोधित करताना ते म्हणाले, आज संदीप घोषला अटक करण्यात आली आहे. आमची मागणी योग्य होती याचा हा पुरावा आहे.

संदीप घोष यांनी जे केले आहे, तो संस्थात्मक गुन्हा आहे. अशा उपक्रमांमध्ये अनेक मुख्याध्यापक आणि अधिकारी सहभागी असू शकतात. असे काम करणाऱ्यांनी राजीनामा द्यावा, अशी आमची इच्छा आहे. न्याय मिळेपर्यंत आमचे आंदोलन सुरूच राहणार आहे. न्यायासाठी आमचा लढा सुरू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुराव्यांशी छेडछाड केल्याप्रकरणी सीबीआयने संदीप घोष आणि एका पोलिस कर्मचाऱ्याला शनिवारी अटक केली. अभिजीत मंडल असे त्याचे नाव असून, तो त्यावेळी पोलिस ठाण्यात प्रभारी अधिकारी होता.

## पुंछ येथे दहशतवाद्यांशी चकमक सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जम्मू :** जम्मू-काश्मीरमधील पुंछ जिल्ह्यातील एका दुर्गम गावातील जंगलात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे मेंढरच्या पठाणतीर भागात स्थानिक पोलिसांसोबत संयुक्त कारवाई सुरू करण्यात आली. लष्कराच्या जवानांनी तीन दहशतवाद्यांना घेरले असून, यात एक टॉप कमांडरही असल्याचे सांगण्यात येत आहे. दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू आहे.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिस आणि लष्कराच्या संयुक्त पथकाने मेंढर उपविभागातील गुरसाई टॉपजवळील पठाणतीर भागात शनिवारी सायंकाळी शोधमोहीम सुरू केली. या भागात दोन ते तीन दहशतवादी लपून बसल्याची माहिती आहे. संयुक्त पथक दहशतवाद्यांचा



शोध घेत असताना दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार सुरू केला, त्यानंतर दोघांमध्ये चकमक सुरू झाली. दोन्ही बाजूंनी अधूनमधून गोळीबार सुरू असून, अतिरिक्त फौजफाटा घटनास्थळी रवाना करण्यात आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांपैकी एक त्यांचा टॉप कमांडर देखील आहे. दरम्यान, जम्मू-काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यात सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत तीन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. ही कारवाई शुक्रवारी रात्री सुरू करण्यात आली होती. एका गावात दहशतवादी लपून बसल्याची माहिती लष्कर आणि पोलिसांना मिळाली होती.

## इस्रायलला हवेत कुशल कामगार

**नवी दिल्ली :** भारत सरकार आणि इस्रायल सरकार यांच्यात गेल्या वर्षी भरतीसंदर्भात करार झाला होता. त्यात इस्रायलमध्ये काम करण्यासाठी कामगारांची भरती करण्याबाबत बोलणी झाली होती. त्याचा दुसरा टप्पा सुरू होणार असून, देशभरातून १० हजारांहून अधिक कुशल कामगारांची निवड करण्यात येणार आहे. याची सुरुवात १६ सप्टेंबरपासून होणार आहे. नोकरी करणाऱ्यांना बांधकाम क्षेत्रात काम करण्याची संधी मिळेल.

इस्रायलच्या पॉप्युलेशन, इमिग्रेशन अँड बॉर्डर ॲथॉरिटीचे (पीआयबीए) एक पथक कौशल्य चाचणी घेण्यासाठी आणि योग्य उमेदवारांची निवड करण्यासाठी पुढील आठवड्यात भारत दौऱ्यावर येणार आहे.

नोव्हेंबर २०२३ मध्ये भारत आणि इस्रायल सरकारमध्ये याबाबत करार झाला होता. या अभियानांतर्गत बांधकाम उद्योगात पारंगत कामगारांना नोकऱ्या मिळणार आहेत. हमासवरील हल्ल्यानंतर इस्रायलने पॅलेस्टिनी कामगारांचे वर्क परमिट निलंबित केले आहे.

## संदीप घोषला अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** आरजी कर मेडिकल कॉलेजचे माजी प्राचार्य संदीप घोष आणि एका पोलीस कर्मचाऱ्याला सीबीआयने निवासी डॉक्टर बलात्कार-हत्या प्रकरणी अटक केली. यापूर्वी घोष यांना आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी अटक करण्यात आली असून, त्याला २३ सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. तळा पोलिस ठाण्याचे एसएचओ अभिजित मंडल असे अटक करण्यात आलेल्या पोलिस अधिकाऱ्याचे नाव आहे.

प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या केल्याप्रकरणी सीबीआयने २६ ऑगस्ट रोजी आरजी कर मेडिकल कॉलेजच्या माजी प्राचार्यांची पॉलीग्राफ चाचणी केली होती.

## इस्रायलच्या हल्ल्यात १४ पॅलेस्टिनी ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दीर अल-बलाह :** इस्रायलने मध्य आणि दक्षिण गाझावर केलेल्या हवाई हल्ल्यात किमान १४ जण ठार झाले. गाझा सिटीमध्ये झालेल्या हवाई हल्ल्यात तीन महिला आणि चार मुलांसह ११ जण राहत असलेल्या एका घरावर हल्ला करण्यात आला, तर इस्रायल-



हमास युद्धामुळे विस्थापित झालेल्या पॅलेस्टिनीनागरिकांसह खान युनूस येथील तंबूवर आणखी एक हल्ला करण्यात आला, अशी माहिती गाझाच्या नागरी संरक्षणाने शनिवारी दिली. अमेरिका, इजिप्त आणि कतार यांनी शस्त्रसंधी आणि हमासच्या ताब्यातील उर्वरित ओलीसांची सुटका करण्यासाठी आग्रह धरला आहे. इस्रायल आणि हमास एकमेकांवर नवीन आरोप करत असल्याने यासाठीची चर्चा लांबणीवर पडली आहे.

## बेकायदेशीर मशिदीचा वाद पेटला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिमला :** हिमाचाल प्रदेशातील संजौली येथील मशिदीच्या बेकादेशीर बांधकामाचा वाद थांबाता थांबत नव्हता. आता याच राज्यातील कुल्लूतही आंदोलन करण्यात आले. यावेळी रस्त्यावर हिंदूंनी हनुमान चालीसाचे पठण केले. शुक्रवारी १३ सप्टेंबर रोजी या आंदोलनाच सुन्नी, पोंटा, साहिब, हमीरपूर आणि बिलासपूर येथील बेकायदेशीर मशिदीविरोधात निदर्शने दर्शवले गेले.

प्रसारमाध्यमानुसार, हिंदू संघटनांचे सदस्य शनिवारी सकाळी कुल्लू येथे रस्त्यावर उतरले. शिमल्यात निदर्शने दर्शवून हिंदू एकजूट झाला. संजौलीतील



मशिदीवर अतिक्रमण करून बांधकाम करण्यात आल्याचा हिंदू आंदोलकांचा आरोप आहे. त्यांनी संपूर्ण मशीद हटवण्यात मागणी केली. आंदोलनाची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तात्काळ घटनास्थळी पोहोचले.

दरम्यान, हिंदू संघटनेच्या लोकांनी हनुमान चालिसाचे पठण सुरू केले, मात्र अखेर कोणताही वाद न होता आंदोलन शांततेत पार पडले. भाजपचे प्रवक्ते आणि सर्वोच्च न्यायालयाचे वकील प्रशांत पटेल उमराव यांनीही त्यांच्या एक्स हँडेलवर निदर्शन दर्शवल्याचा व्हिडिओ शेअर केला. त्यात त्यांनी सांगतले की, हिंदू हे केवळ शिमला नाहीतर कुल्लू, तर सुन्नी, बिलासपूर, हमीरपूर आणि पोंटा साहिब येथे अनधिकृत बांधकाम केलेल्या मशिदींविरोधात आंदोलन करत आहेत.

हिमाचल प्रदेशातील बेकायदेशीर मशिदीविरोधात आपली एकता दाखवून व्यापाऱ्यांनी या आंदोलकांच्या बाजूने आवाज उठवला. हिमाचल प्रदेश राज्याच्या अनेक भागात बाजारपेठांमध्ये ३ तास बंद ठेवण्यात आल्याचे सांगितले

### ताजमहालच्या निमित्ताने विरोधकांचा पुरातत्व खात्यावर निशाणा

## ताजमहाल गळती, ओवेसी यांची टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ताजमहालच्या मुख्य घुमटातून पाणी टपकत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला असून, असदुद्दीन ओवेसी यांनी भारतीय पुरातत्व खात्यावर निशाणा साधला आहे.

ओवेसी म्हणाले की, ऐतिहासिक वास्तूतून शेकडो कोटींची कमाई करूनही पुरातत्व खाते त्याची काळजी घेऊ शकत नाही. पुरातत्व खाते, भारतीय संस्कृतीच्या प्रतिकाची काळजी घेण्यास सक्षम नाही. हेच खाते, वक्फ इमारतीदेखील त्यांच्या ताब्यात देण्यात याव्यात, जेणेकरून त्यांची देखभाल करता येईल, अशी मागणी करत आहे. म्हणजे दहावीत अनुत्तीर्ण



झालेल्या व्यक्तीला पीएचडी करायची आहे, असा प्रकार आहे, असे म्हणत त्यांनी पुरातत्व खात्यावर टीका केली.

पुरातत्व खात्यातील एका वरिष्ठ अधिकाऱ्यानुसार, आग्रा येथे मुसळधार पावसामुळे घुमटातून पाण्याची गळती झाली. तपासाअंती मुख्य घुमटाचे कोणतेही नुकसान झाले नसल्याचे निष्पन्न झाले. गळतीमुळे हे पाणी तळाशी पोहोचले आहे. याशिवाय ड्रोन कॅमेऱ्यानेही घुमटाची तपासणी करण्यात आली आहे. ताजमहालच्या घुमटातून पाणी टपकत असल्याचा दावा करणारा २० सेकंदाचा व्हिडिओ गुरुवारी व्हायरल झाल्यानंतर, देशभरात त्यासंबंधी चर्चा सुरू झाली. ताजमहाल मुघल बादशहा शाहजहानने बांधला होता. तो तयार करण्यासाठी २० वर्षे लागली. याचे बांधकाम १६३२ ते १६५३ पर्यंत चालले. असे म्हटले जाते की शाहजहानने त्याची पत्नी मुमताज महलच्या स्मरणार्थ ताजमहाल बांधला. युनेस्कोने त्याचा जागतिक वारशात समावेश केला असून, ही वास्तू पांढऱ्या संगमरवराची आहे. दरवर्षी जगभरातून लाखो पर्यटक तो पाहण्यासाठी येतात. ओवेसी यांनी वक्फचा उल्लेख केल्यामुळे ताजमहालच्या निमित्ताने विरोधकांनी पुरातत्व खात्यावर निशाणा साधल्याचे यातून स्पष्ट झाले आहे.



"मी एक क्रिकेटर होतो आणि याबद्दल कोणीही बोलत नाही. विराट कोहली माझ्या कर्णधारपदाखाली खेळला आहे. याबद्दल कोणी कधी काही बोललं आहे का? एक व्यावसायिक क्रिकेटपटू म्हणून मी चांगले क्रिकेट खेळलो. टीम इंडियाचे अनेक खेळाडू माझे बॅचमेट आहेत. माझे दोन्ही लिगामेंट फ्रॅक्चर झाल्याने मला क्रिकेट सोडावे लागले."

— तेजस्वी यादव




## चौथ्या हॉकी इंडिया पुरुष आंतर-विभाग राष्ट्रीय स्पर्धा

# पेट्रोलियम, रेल्वे बोर्ड संघ अंतिम फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गतविजेते पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड (पीएसपीबी) आणि गतवर्षीचे उपविजेते रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड (आरएसपीबी) संघांनी हॉकी महाराष्ट्र आयोजित चौथ्या हॉकी इंडिया पुरुष आंतर-विभाग राष्ट्रीय स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. सलग दुसऱ्या वर्षी दोन्ही संघ जेतेपदासाठी झुंजतील.

चिंचवड महानगरपालिकेच्या सहकार्याने मेजर ध्यानचंद स्टेडियम, नेहरूनगर-पिंपरी येथे सुरू असलेल्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत शनिवारी दोन्ही संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर पिछाडीवरून विजय मिळवले.

उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघाने सर्व्हिसेस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्ड (एसएससी) संघाचा 5-3 असा पराभव केला. त्यात गुरजिंदर सिंगचे दोन गोल मोलाचे ठरले. गतविजेत्यांनी दोन गोलच्या फरकाने विजय मिळवला तरी सुरुवातीला ते पिछाडीवर होते. 21व्या मिनिटाला अजिंक्य जाधवने मैदानी गोल करताना सर्व्हिसेसला आघाडीवर नेले. मात्र, सात मिनिटांच्या फरकाने गुरजिंदर सिंगने (28वे-पीएस) पेनल्टी स्ट्रोकद्वारे पेट्रोलियम बोर्डाला बरोबरी साधून दिली. त्यामुळे मध्यंतराला 1-1 अशी बरोबरी होती. उत्तरार्धात 6 गोलांची भर पडली. त्यात पेट्रोलियम बोर्डाने 4 गोल करताना आघाडी घेतली.



त्यात युसुफ अफान (49वे), तलविंदर सिंग (50वे-पीसी), गुरजिंदर सिंग (55वे-पीसी) आणि अरमान कुरेशी (57वे) यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. सर्व्हिसेसकडून पवन राजभर (53वे) आणि सुशील धनवरने (58वे-पीएस) गोल करताना फरक कमी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांचे प्रयत्न तोकडे पडले.

दिवसातील दुसऱ्या सामन्यात, रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघाने फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला (एफसीआय) 2-1 असे रोखले. सामन्यातील तिन्ही गोल मैदानी होते. युवराज वाल्मिकी (46वे), अतुल दीप याचा (57वे) प्रत्येकी एक गोल आरएसपीबीच्या विजयात महत्त्वपूर्ण ठरला. पराभवाचा सामना करावा लागला तरी अंकुश याच्यामुळे (12वे) एफसीआयने सुरुवातीला 1-0 अशी आघाडी घेतली होती. मध्यंतरापर्यंत आघाडी राखली तरी उत्तरार्धात शेवटच्या 14 मिनिटांमध्ये दोन गोल करताना रेल्वे स्पोर्ट्स बोर्डाने बाजी पलटवली.

## क्रिकेट स्थानिक टी-२० लीगमधून होऊ शकतो भ्रष्टाचार


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जगभरात होत असलेल्या बहुतांश प्रमुख ट्वेंटी-२० लीग सुरक्षित आणि स्वच्छ आहेत, परंतु भविष्यात विविध क्रिकेट मंडळांच्या स्थानिक ट्वेंटी-२० लीगमधून भ्रष्टाचार होऊ शकतो आणि यावर आयसीसीचे थेट नियंत्रण असत नाही, असे स्पष्ट मत आयसीसीचे निवृत्त होत असलेले लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे प्रमुख अलेक्स मार्शल यांनी व्यक्त केले.

एकीकडे सुरक्षित क्रिकेट खेळले जात असले तरी स्थानिक आणि देशांतर्गत लीगमध्ये काही अप्रामाणिक लोक मात्र संधी शोधत असतात. यात आपण सट्टेबाजी, फिक्सिंग किंवा स्पॉट फिक्सिंगसारखे प्रकार कसे करू शकतात याचा विचार करत असतात आणि हे सुमार व्यवस्थापन असलेल्या लीगमध्ये घडू शकते. जेव्हा प्रत्येक गोष्टीत पैसा कमवण्याचा उद्देश असतो, तेव्हा भ्रष्टाचाराची भीती असतेच. कमकुवत बाजूचा शोध घेऊन आपला मार्ग तयार करण्यासाठी हे लोक संधीच शोधत असतात, असे मार्शल यांनी सांगितले.

## किल्ले हडसर

नैसर्गिक उभ्या कडयाच्या तटबंदीचे संरक्षण लाभलेला किल्ला म्हणजे किल्ले हडसर उर्फ पर्वतगड होय. हा किल्ला जुन्नर तालुक्यात असुन पायथ्याचे गाव हडसर हे आहे. हडसर गावातुन गडावर जाण्यासाठी दोन पायवाटा आहेत. पश्चिमेकडून गडावर गेल्यावर कातळात खोदलेला राजमार्ग दिसून येतो. या किल्ल्याचे पहिला व दुसरा दरवाजा हा देखील कातळात कोरलेला आहे. यावरून गडाचे पुरातन वैभव आपल्या लक्षात येते. गड प्रवेश केल्यावर वाटेत बांधीव तळे आहे. याजवळच एक चिरेबंदी बांधणीचे सुंदर व मोठे श्री महादेवाचे मंदिर आहे. या मंदिरातील शिवपिंड व घडीव नंदी तर पाहण्या सारखा आहे. या मंदिराच्या गाभाऱ्या बाहेरील छोटेखानी सभामंडपात दोन कोनाडे आहेत. या मंदिराच्या डाव्या कोनाडयात गणपती तर उजव्या कोनाडयात मारुतीची मूर्ती आहे. तसेच दर वाज्याकडील उजव्या हाताच्या भिंतीवरील कोनाडयातील गरूड मूर्ती विलोभणीय आहे. या महादेव मंदिराच्या सभामंडपातील कोनाडयात असलेली श्री गजाननाची मूर्ती फारच सुंदर, अप्रतिम असून मूर्तीवरील दगडात नक्षीकाम केलेली महिरप फारच सुंदर आहे. या गणपती बाप्पाचे वर्णन करावे तेवढे कमी आहे. या बाप्पाच्या डोक्यावर मुकुट असून या मुकुटाच्या वर फणा काढलेला नागराज कोरलेला आहे. या बाप्पाच्या मागील दोन्ही हातावर फुलांचे बाजूबंद कोरलेले असून, मागील उजव्या हातात परशू तर डाव्या अंकुश आहे. तसेच पुढील उजवा हात हा उजव्या मांडीवर तर बाप्पाच्या डाव्या हातात प्रसाद आहे. मूर्तीच्या गळ्यात हार देखील कोरलेला आहे. तसेच मूर्तीच्या दोन्ही पायाची ठेवण फारच छान असून दोन्ही पायात तोडा आहे. एकंदरीत कलाकाराने बाप्पाची मूर्ती घडविताना फारच मेहनत घेतलेली दिसते. किल्ले हडसर वरील गुहा व कोठीवर देखील गणेशपटी कोरलेल्या आहेत. बालेकिल्याच्या पूर्वेस एक मंदिर व बुलंद बांधणीचा बुरुज आहे. या किल्याची एकंदर रचना, खडकातील खोदकाम, दरवाजांची रचनात्मक बांधणी पाहून हा किल्ला सातवाहन काळातील असावा असा अंदाज करता येतो.



गड गणेश

**सुरेश तरलगट्टी,**
शिवसुर्य प्रतिष्ठान पुणे



## बॉक्सिंग स्पर्धेत सृष्टी चोरगे विजयी

**पुणे :** ३६व्या पुणे फेस्टिव्हल अंतर्गत आयोजित पुरुष आणि महिला बॉक्सिंग स्पर्धेत सृष्टी चोरगे बेस्ट बॉक्सर ठरल्या. याशिवाय अभंग वायदंडे - मोस्ट प्रॉमिसिंग, रश्मी माने - बेस्ट चॅलेंजर, मनोज यादव - बेस्ट रेफ्री आणि योगेश भोरे - बेस्ट जज यांची निवड झाली. या स्पर्धा पुण्यातील भवानी पेठ येथील वस्ताद लहुजी साळवे स्टेडियमवर शनिवार, १४ सप्टेंबर रोजी रंगल्या. संपूर्ण दिवसभर झालेल्या या स्पर्धेत ४० पुरुष आणि ४० महिला खेळाडू विविध वजन गटांमध्ये सहभागी झाले होते. या जिल्हास्तरीय स्पर्धा पुणे जिल्हा बॉक्सिंग असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेचे उद्घाटन सकाळी माजी गृह राज्यमंत्री रमेश बागवे, माजी नगरसेवक अविनाश बागवे, पुणे फेस्टिव्हलचे मुख्य समन्वयक अॅड. अभय छाजेड व क्रीडा समन्वयक प्रसन्न गोखले यांच्या हस्ते संपन्न झाले. सायंकाळी बक्षीस वितरण मोटोक्रॉस विजेते संजय टकले यांच्या हस्ते झाले. यावेळी पुणे बॉक्सिंग असोसिएशनचे मदन वाणी, विजय गुजर, सुरेश गायकवाड आणि अशोक मेमजादे यांची विशेष उपस्थिती होती. ३६व्या 'पुणे फेस्टिव्हल'चे महाराष्ट्र पर्यटन विभागाचे पर्यटन संचालनालय आणि कोहिनूर ग्रुप हे मुख्य प्रायोजक असून, पंचशील, सुमा शिल्प लि.,भारत फोर्ज आणि नॅशनल एग्ज को–ऑर्डिनेशन कमिटी हे सहप्रायोजक आहेत. डॉ. डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी, बढेकर ग्रुप,अहुरा बिल्डर्स आणि सिंहगड इन्स्टिट्यूट हे उपप्रायोजक आहेत.

## ईशान किशनसाठी टीम इंडियाचे दरवाजे पुन्हा उघडले

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघ बांगलादेशविरुद्ध दोन कसोटी आणि टी-२० सामने खेळणार आहे. पहिला कसोटी सामना 19 सप्टेंबरपासून (गुरुवार) चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. दुसरा कसोटी सामना 27 सप्टेंबरपासून (शुक्रवार) ग्रीन पार्क, कानपूर येथे होणार आहे. यानंतर दोन्ही संघांमध्ये टी-20 मालिका होणार आहे. पहिला T20 6 ऑक्टोबर, दुसरा T20 9 ऑक्टोबर आणि तिसरा T20 12 ऑक्टोबरला खेळवला जाईल.

आता बांगलादेशविरुद्धच्या टी-20 मालिकेबाबत मोठी बातमी समोर आली आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, काहींना टी-20 मालिकेत विश्रांती दिली जाईल, जेणेकरून ते न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत पूर्णपणे ताजेतवाने राहतील. अशा परिस्थितीत उपकर्णधार शुभमन गिलला बांगलादेशविरुद्धच्या टी-20 मालिकेतून विश्रांती दिली जाऊ शकते. गिल व्यतिरिक्त वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज



यांना टी-20 मालिकेसाठी विश्रांती दिली जाण्याची शक्यता आहे.

ऋषभ पंतला टी-20 मालिकेसाठीही विश्रांती दिली जाऊ शकते, असेही अहवालात म्हटले आहे. अशा परिस्थितीत यष्टीरक्षक फलंदाज इशान किशनचे नशीबही बदलू शकते. ईशान अनेक महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर आहे. मानसिक थकव्याचे कारण देत ईशानने गेल्या वर्षी दक्षिण आफ्रिका दौऱ्यातून माघार घेतली होती. त्यानंतर देशांतर्गत क्रिकेट खेळण्यातही रस दाखवला नाही. यानंतर त्याला केंद्रीय करारातूनही मुक्त करण्यात आले.

## निरज चोप्राने ०.०१ मि च्या फरकाने जेतेपद गमावले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा याला डायमंड लीग फायनल २०२४ मध्ये १ सेंटीमीटरच्या फरकाने दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. त्याने तिसऱ्या प्रयत्नात ८७.८६ मीटर लांब भाला फेकला होता, जो ग्रॅनडाच्या अँडरसन पीटर्सपेक्षा ( ८७.८७ मी.) ०.०१ मीटर कमी अंतरावर पडला. अँडरसनने त्याच्या पहिल्याच प्रयत्नात इतक्या लांब भाला फेकला होता. जर्मनीच्या ज्युलियन वेबरला ८५.९७ मीटरसह तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. अन्य स्पर्धांप्रमाणे डायमंड लीगमध्ये पदक दिले जात नाही. इथे फायनलमध्ये अव्वल येणारा खेळाडूच विजेता ठरतो, परंतु त्याच्यासह अन्य सहभागी खेळाडूंना बक्षीस म्हणून काही रक्कम दिली जाते.



डायमंड लीग फायनलपूर्वी गतविजेत्या याकुब व्हॅड्लेचने माघार घेतली. त्यामुळे नीरजसमोर ग्रेनेडाच्या पीटर्स अँडरसन आणि जर्मनीच्या ज्युलियन वेबर यांचे कडवे आव्हान उरले होते. नीरजने २०२२ मध्ये डायमंड लीगचे अजिंक्यपद पटकावून इतिहास रचला होता. असा पराक्रम करणारा तो भारताचा पहिला खेळाडू ठरला होता. त्यानंतर २०२३ मध्ये त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. अँडरसनने त्याच्या पहिल्याच प्रयत्नात ८७.८७ मीटर लांब भाला फेकला. नीरजने पॅरिसमध्ये ८९.४६ मीटर लांब भालाफेक केली असल्यामुळे डायमंड लीग जिंकण्यासाठी त्याच्यासमोर अँडरसनने ठेवलेले अंतर फार आव्हानात्मक नव्हते. नीरजचे तिसऱ्या प्रयत्नात ८७.८६ मीटर लांब भाला फेकला. उर्वरित ३ प्रयत्नात तो बाजी मारेल असे वाटलेले, परंतु त्याला दुसऱ्या क्रमांकावर समाधानी रहावे लागले. पहिल्याच प्रयत्नात ८५.९७ मीटर लांब भालाफेक करणाऱ्या वेबरला तिसरे स्थान मिळाले...

## जॉन्टी ऱ्होड्स रोहित शर्माबद्दल नेमकं काय म्हणाला?


**नवी दिल्ली :** आयपीएलमधील मुंबई इंडियन्स संघाचे माजी फिल्डींग कोच जॉन्टी ऱ्होईस यांनी रोहित शर्माबरोबर काम करतानाचा अनुभव सांगितला. रोहित शर्माबद्दल बोलताना जॉन्टी ऱ्होईस यांनी रोहितच्या फलंदाजीबद्दल त्याच्या स्वभावाबद्दलही भाष्य केलं. जॉन्टी ऱ्होईसने असही सांगितलं की रोहित शर्मा नेटमध्ये सराव करताना सचिन तेंडुलकर इतका कठोर सराव करत नाही आणि त्याचं टेक्निकही (तंत्र) सर्वोत्तम नाही. भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने गेल्या काही वर्षांत सलामीवीर फलंदाज म्हणून प्रभावी कामगिरी केली आहे. हिटमॅनने मधल्या फळीतील फलंदाज म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती, परंतु २०१३ मध्ये माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीने त्याला सलामीवीराची जबाबदारी दिल्यानंतर रोहित शर्माची बॅट चांगलीच तळपली. रोहित आता दहा हजारांहून अधिक एकदिवसीय धावांसह भारतीय क्रिकेट इतिहासातील सर्वोतकृष्ट सलामीवीरांपैकी एक आहे. ऱ्होड्सने अलीना डिसेक्ट्सच्या YouTube पॉडकास्टवर बोलताना सांगितले की, "तो अजिबात बदलला नाहीय. माझ्या डोळ्यासमोर अजूनही ते चित्र आहे की तो (रोहित शर्मा) फलंदाजीचा सराव करण्यासाठी नेटमध्ये यायचा आणि तेव्ह काही थ्रो डाईन सेशन आणि शॅडो हिटिंग याचाही सराव करायचा. तो सचिन तेंडुलकरसारखा खूप वेळ किंवा कठीण सराव करायचा नाही हे खरं.

## महाराष्ट्राची दिव्या देशमुखचीही चमकदार कामगिरी

# भारतीय संघाचे पहिल्या चारही फेरीत वर्चस्व

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बुडापेस्ट येथे सध्या बुद्धिबळ ऑलिंपियाड ही प्रतिष्ठेची स्पर्धा सुरू असून भारताचे महिला आणि पुरुष असे दोन्ही संघ सहभागी झाले आहेत. भारताच्या दोन्ही संघांची सुरूवातही दमदार राहिली आहे. शनिवारी चौथ्या फेरीत दोन्ही संघांनी प्रत्येकी ३.५-०.५ असा विजय मिळवला. दोन्ही भारतीय संघांचे हे सलग चौथे विजय ठरले आहेत.



चौथ्या फेरीत भारतीय पुरुष संघाचा सामना सर्बियाविरुद्ध झाला होता, तर भारतीय महिला संघचा सामना फ्रान्सविरुद्ध झाला होता.

दरम्यान, चौथ्या लढतीत भारताच्या हरिकी द्रोणावल्लीचे पुनरागमन चांगले राहिले. तिसऱ्या फेरीत तिला स्वित्झर्लंडच्या अॅलेक्झँड्रा कोस्तेनिक हिच्याकडून पराभवाचा सामना करावा लागला होता. पण तिने चौथ्या फेरीत फ्रान्सच्या डायमंट ड्युलेट-कॉर्नेट हिला पराभूत केले.

तसेच आर वैशाली हिने सोफी मिलेटविरुद्ध ड्रॉ केला, तर महाराष्ट्राच्या दिव्या देशमुखने मित्रा हेजाजीपूर हिला पराभूत करत सगल चौथा विजय मिळवला. ताईना सचदेव हिने नताशा बेनमेस्बाहला पराभूत केले.

भारताच्या पुरुष संघामधील अर्जुन इरिगेसीनेही सलग चौथा विजय नोंदवला. त्याने अलेक्झांडर इंडजिकला पराभूत केले.

याशिलाय डी गुकेशने अलेक्झांडर प्रेडकेला आणि विदित गुजरातीने इव्हिक वेलीमिरला पराभूत केले. आर प्रज्ञानंदाने अॅलेक्सी सरानाविरुद्ध ड्रॉ केला.

दरम्यान, या स्पर्धेत अद्यापही ७ फेऱ्या बाकी आहेत. या स्पर्धेतील अव्वल मानांकीत भारतीय महिला संघाने याआधी जमैका, झेक प्रजासत्ताक आणि स्वित्झर्लंड या संघांना पराभूत केले आहे. तसेच दुसऱ्या मानांकित भारतीय पुरुष संघाने मोरोक्को, आईसलँड आणि हंगेरी या संघांना पराभूत केले आहे.

## टीम इंडियातून उपकर्णधार शुभमन गिलचा पत्ता कट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघ आता दीर्घ विश्रांतीनंतर पुन्हा मैदानात उतरणार आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया 19 सप्टेंबरपासून बांगलादेशविरुद्ध 2 कसोटी सामने आणि 3 टी-20 सामने खेळताना दिसणार आहे. दरम्यान, मीडिया रिपोर्ट्समध्ये असा दावा केला जात आहे की, टीम इंडियाचा उपकर्णधार शुभमन गिलला संघाबाहेर ठेवले जाऊ शकते.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, टीम इंडियाचा अनुभवी उपकर्णधार शुभमन गिलला बांगलादेशविरुद्धच्या 2 कसोटी सामन्यांच्या मालिकेनंतर विश्रांती दिली जाऊ शकते. बांगलादेशविरुद्धच्या टी-20 संघातून त्याला बाहेर ठेवले जाऊ शकते. बीसीसीआयच्या एका सूत्राने पीटीआयशी बोलताना ही माहिती दिली आहे. रिपोर्टनुसार, शुबमन गिलला बांगलादेशविरुद्धच्या टी-20 मालिकेत विश्रांती देण्यात येणार आहे, कारण शुभमन गिल झिम्बाब्वेनंतर श्रीलंका दौऱ्यावर गेला होता. यानंतर तो दुलीप ट्रॉफी 2024 मध्येही खेळला आणि आता कसोटी मालिकेत खेळणार आहे. त्यामुळे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे व्यवस्थापन गिल यांना ब्रेक देऊ शकते. पीटीआयच्या एका बातमीनुसार, शुभमन गिलसह जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांनाही विश्रांती दिली.

## श्रेयस अय्यरच्या संघाची सलग दुसऱ्या पराभवासह दुलीप ट्रॉफी जिंकण्याची संधीही हुकली

# मयंक अगरवालच्या टीमचा मोठा विजय!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दुलीप ट्रॉफी २०२४ स्पर्धेतील दुसरी फेरी रविवारी संपली. दुसऱ्या फेरीत अनंतपूरममधील रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट स्टेडियमवर इंडिया ए विरुद्ध इंडिया डी संघात सामना झाला. या सामन्यात मयंक अगरवाल कर्णधार असलेल्या इंडिया ए संघाने १८६ धावांनी मोठा विजय मिळवला. यासह इंडिया ए संघाला ६ महत्त्वाचे गुणही मिळाले आहेत. मात्र श्रेयस अय्यर कर्णधार असलेल्या इंडिया डी संघाला मात्र सलग दुसऱ्या पराभवाला



सामोरे जावे लागले आहे. त्यांमुळे दोन सामन्यांनंतरही त्यांच्या खात्यात शून्य गुण आहेत. अशात इंडिया डी संघाची आता दुलीप ट्रॉफी जिंकण्याची संधीही हुकली आहे.

या सामन्यात इंडिया डी समोर इंडिया ए संघाने ४८८ धावांचे मोठे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना इंडिया डी संघाला दुसऱ्या डावात ८२.२ षटकात सर्वबाद ३०१ धावाच करता आल्या.

इंडिया डी संघाकडून दुसऱ्या डावात रिकी भूईने ११३ धावांची खेळी करत चांगली लढत दिली. त्याला कर्णधार श्रेयस अय्यर (४१), संजू सॅमसन (४०) आणि यश दुबे (३७)यांची चांगली साथ मिळाली होती. मात्र खेळपट्टीवर स्थिरावल्याचे दिसत असतानाच या तिघांच्याही विकेट्स गेल्या. अखेर इंडिया डी संघाला पराभवाचा सामना करावा लागला.

यापूर्वी पहिल्या फेरीत इंडिया सी संघाने त्यांचा पराभव केला होता. दुसऱ्या डावात इंडिया ए संघाकडून तनुष कोटियनने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या, तर शम्स मुलानीने ३ विकेट्स घेतल्या. खलील अहमद आणि रियान पराग यांना प्रत्येकी १ विकेट मिळाली.

तत्पुर्वी या सामन्यात इंडिया ए संघाने प्रथम फलंदाजी केली होती. त्यांनी पहिल्या डावात ८४.३ षटकात सर्वबाद २९० धावा केल्या होत्या. इंडिया ए कडून शम्स मुलानी आणि तनुष कोटियन या मुंबईकर अष्टपैलू खेळाडूंनी अर्धशतके केली. मुलानीने ८९ आणि कोटियनने ५३ धावा केल्या. इंडिया डी संघाकडून हर्षित राणाने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या होत्या.

#रा